ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन १९३३
जानेवारी-मार्च २०१२/खंड ३५ अंक ४

अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी पाण्याचा इष्टतम वापर
भारतातील दारिद्र्य: एक ऐतिहासिक दृष्टिकोन
मानव संसाधन विकासातील आधुनिक प्रवाह
दारिद्र्याचे प्रतिबिंब: चिकित्सा
अनुदानित विहिरींचे आर्थिक विकासात योगदान
पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश
ज्ञानेश्वरीतील अर्थविचार
डोंगरी भागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची गरज
भारतीय अन्नसुरक्षा: स्वरूप व उपाय
अर्थ शब्दांची वाट पाहे: अंतर्प्रवर्तन
पस्तिसावे अधिवेशन: सूत्रसंचालकांचा अहवाल
कार्यवाहांचा अहवाल
अर्थसंवाद वार्षिक अहवाल
छत्तिसावे वार्षिक अधिवेशन: विषयांची रूपरेषा



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

National Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

# अर्थसंवाद

जानेवारी-मार्च २०१२ / खंड ३५ अंक ४

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ
(२००९-१२)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
संतोष कदम
शिवाजी अंभोरे

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश रामलाल निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म

- **अविनाश रामलाल निकम**, शहादा
  संपादकीय संवाद ........ ३०९
- **आप्पासाहेब पुजारी**, सांगोला
  महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी पाण्याचा इष्टतम वापर.. ३११
- **रावसाहेब जाधव**, गुहागर
  भारतातील दारिद्र्य: एक ऐतिहासिक दृष्टिकोन........ ३३२
- **शरच्चंद्र छापेकर**, जळगाव
  मानव संसाधन विकासातील आधुनिक प्रवाह........ ३३९
- **तेजस्विनी मुडेकर**, कोल्हापूर
  दारिद्र्याचे प्रतिबिंब: चिकित्सा ........ ३४४
- **नितिन वना जाधव**, अमळनेर, **राजेंद्र सरोदे**, भुसावळ
  अनुदानित विहिरींचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात योगदान. ३५१
- **चव्हाण सिमा रविंद्र**, श्रीरामपूर
  पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश ........ ३५९
- **मंजुषा मुसमाडे**, पुणे
  ग्रंथ परीक्षण: ज्ञानेश्वरीतील अर्थविचार ........ ३६८
- **खोत मल्लू राजाराम**, कोल्हापूर
  डोंगरी भागातील जनतेला सक्षम सार्व. वितरण व्यवस्थेची गरज. ३७१
- **एम. बी. अनंतकवळस**, सातारा
  भारतीय अन्नसुरक्षा: स्वरूप व उपाय ........ ३८१
- **ज.फा.पाटील**, कोल्हापूर
  अर्थ शब्दांची वाट पाहे: अंतर्प्रवर्तन ........ ३८७
- **पस्तिसावे वार्षिक अधिवेशन: सूत्रसंचालकांचा अहवाल**
  कैलास पाटील, बाळासाहेब माने, सुहास आव्हाड ........ ३८९
- **कार्यवाहांचा अहवाल: अनिल सूर्यवंशी** ........ ३९६
- **अर्थसंवाद वार्षिक अहवाल: अविनाश निकम** ........ ४०१
- **छत्तिसावे वार्षिक अधिवेशन: विषयांची रूपरेषा**
  आप्पासाहेब पुजारी, शर्मिष्ठा सातव, दी. मा. मोरे........ ४०५

मराठी अर्थशास्त्र परिषद
कार्यकारी मंडळ २०११-१२
अध्यक्ष
आप्पासाहेब गोविंद पुजारी (मंगळवेढा)

कार्याध्यक्ष
दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक-अर्थसंवाद
अविनाश रामलाल निकम (शहादा)

विश्वस्त
चारुदत्त गोखले (जळगाव)
ज.फा. पाटील (कोल्हापूर)
मधुकर शिंदे (इस्लामपूर)

सदस्य
रामकृष्ण टाले (नागपूर)
विकास सुकाळे (नांदेड)
ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
महंमद रफिक मुलाणी (बारामती)
तानाजी भोसले (सांगली)
श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)
श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
हसीम वलांडकर (वाळवा)
बाळासाहेब माने (इस्लामपूर)
विकास सुकाळे (स्थानिक कार्यवाह)

अक्षर रचना:
सुनील भांडारकर, शहादा.
मुद्रणालय:
सातपुडा ऑफसेट, जळगाव.

● कार्यालयीन पत्रव्यवहार:
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२९४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६

● वर्गणी:

- परिषदेचे सदस्य:
  - आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)
  - साधारण सदस्य: रु.३००/- (वार्षिक)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  - शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  - व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  - ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:
१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
*टिप:* म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवाद

## पस्तिसाव्या खंडपूर्तीच्या निमित्ताने !!!

जागतिकीकरणाच्या युगात जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारांच्या स्वरुपामध्ये व आर्थिक सिद्धांताच्या विकास प्रक्रियेत अनेक बदल घडून आले आहेत. या बदलांचे प्रत्यय येत आहेत. या बदलांचे परिणाम स्तिमीत करणारे आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेवरील आर्थिक मंदीचे सावट हा देशा-देशातील अर्थशास्त्राच्या अभ्यासकांचा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय झाला आहे. मोठ्या लोकसंख्येच्या देशातील मध्यमवर्गीयांची बाजारपेठ विस्तृत झाली आहे. याला आर्थिक विकासाचे नवीन पर्व मानले जात आहे. युरोपीय देशांची आर्थिक स्थिती डळमळीत होण्यास प्रारंभ झाला आहे. दुसऱ्या बाजूस आशिया व अफ्रिका खंडातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची दुर्दशा कायम आहे. अर्थव्यवस्था कोणत्याही देशाची असली तरी विकास दराचा दुहेरी आकडा कसा प्राप्त करावा यासाठी योजनांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. योजना कशा पद्धतीने राबविल्या जातात यावर योजनांचे बरेचसे यश अवलंबून असते. जागतिक व देशपातळीवरील अर्थव्यवस्थेतील मोठ्या आर्थिक घटना व स्थित्यंतरावर नामवंत अर्थशास्त्रज्ञ आपली विचारधारा स्पष्टपणे मांडताहेत. या चर्चेच्या लिखाणाची दखल राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालीके घेताहेत. नवीन आर्थिक घडामोडी, नवीन सिद्धांतांची दखल घेणे गरजेचे आहे. आर्थिक घटनांचा वेग स्तिमीत करणारा आहे. नवीन विस्तृत बनलेल्या, एकमेकांवर परिणाम करणाऱ्या अर्थव्यवस्थेतील समस्या गुंतागुंतीच्या आहेत. त्या सोडविण्याचे आव्हानही अत्यंत व्यापक स्वरुपाचे आहे. त्यामुळे संशोधनाची दिशा विस्तृत करावी लागणार आहे. संशोधन करतांना संशोधनाची नवीन साधने देखील विकसित करावी लागणार आहेत. विविध आर्थिक विषयांवरील संशोधनाचे अर्थव्यवस्थेस उपयोगी निष्कर्ष सर्वांसमोर विचारार्थ ठेऊन त्यानंतर अंमलबजावणीसाठी घ्यावे लागणार आहेत. हे सर्व लक्षात घेऊन अर्थव्यवस्थेतील नवीन बदलांचा वेध घेणारे लेख प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला आहे. पाहता-पाहता अर्थसंवादचा ३५ वा खंड पूर्ण झाला आहे. संपादक पदाची धुरा स्वीकारल्यानंतर सर्व माजी प्रमुख संपादकांनी आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही लेखकाचे

एकापेक्षा अधिक लेख वर्षभरात *अर्थसंवाद* मध्ये प्रसिद्ध केले नाहीत. त्यामुळे *अर्थसंवाद* च्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३५ व्या खंडात आहे. जास्तीत जास्त सदस्यांना *अर्थसंवाद* चे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह शोधनिबंधांच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने लेखांच्या संख्येने नवा उच्चांक गाठला. तसेच अंकाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सर्व भागातून शोधनिबंध यावेत ते प्रकाशित व्हावेत यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. चार पैकी तीन अंकांचे मुखपृष्ठ रंगीत घेतले. यापुढे *अर्थसंवाद* चा प्रत्येक अंक रंगीत करावयाचा मानस आहे. अंक वेळेत प्रकाशित करण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल.

अंकाचे पाकीट परंपरेने खाकी रंगाच्या साध्या कागदाचे होते. सन्माननीय सदस्यापर्यंत पोहोचतांना बऱ्याच वेळा ते फाटत असे यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकाप्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट आपण प्रथमच आणत आहोत. हे एक वर्षातील बदल आहेत. भविष्यात विचारपूर्वक टप्प्या टप्प्याने अनेक बदल करण्याची इच्छा आहे.

या अंकामध्ये विविध आर्थिक विषयावरील लेख, एक आंतरविद्याशाखीय लेख, अध्यक्षीय भाषण, ३५ व्या अधिवेशनातील सूत्रसंचालकांचे अहवाल, ३६ व्या वार्षिक अधिवेशनासाठी विषयांची रूपरेषा, कार्यवाहांचा अहवाल, अर्थसंवाद वार्षिक अहवाल, पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश, *अर्थ शब्दांची वाट पाहे* यांचा समावेश आहे. या अंकास अध्यक्ष डॉ. कैलास पाटील यांनी जाहिरात देऊन केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार. कार्यकारी मंडळ सदस्य, सन्माननीय सभासदांनी जाहिरातीसाठी आपले योगदान देणे गरजेचे आहे. या अंकासाठी अनेक सहकाऱ्यांकडून मजकूर मिळवायचा होता. परंतु काही सहकाऱ्यांनी *अर्थसंवाद* च्या फॉण्टमध्ये टाईप करुन मजकूर उपलब्ध केला नाही. यामुळे अंकास विलंब झाला आहे. यापुढे *अर्थसंवाद* साठी मजकूर ठरविलेल्या फॉण्टमध्ये पाठविला तरच त्याचा समावेश अंकात करता येईल, असे नम्रपणे नमुद करु इच्छितो. *अर्थसंवाद* च्या या अंकाचे वाचक स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

**- अविनाश रामलाल निकम**

प्रमुख संपादक, '*अर्थसंवाद*'

# महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी पाण्याचा इष्टतम वापर

**आप्पासाहेब पुजारी, सांगोला**
प्राचार्य, सांगोला महाविद्यालय, जिल्हा सोलापूर
भ्रमणध्वनी: ९९६०१२५०१५

*पीपल्स कॉलेज, नांदेड येथे संपन्न झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३५ व्या वार्षिक अधिवेशनात ७ नोव्हेंबर २०११ रोजी केलेले अध्यक्षीय भाषण.*

## १. प्रास्ताविक:

मित्र हो, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ३५ व्या वार्षिक अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून बहुमताने माझी निवड केल्याबद्दल मी आपल्या सर्वांचा आभारी आहे.

पाणी हे जीवन आहे. विकासाच्या प्रक्रियेत एक प्रमुख निविष्ठा (घटक) म्हणून त्याला ओळखले जाते. पाण्याच्या संदर्भात बहुस्पर्शी व बहुअंगाने महाराष्ट्रात आजअखेर अनेक स्तरांवर अभ्यास झाले आहेत व होत आहेत. यातूनच पाण्याच्या वापरासंबंधी अनेक नवीन विचार पुढे आले. महाराष्ट्राच्या विविध भागात उपलब्ध असलेले पाणी, त्याच्या समान वाटपाची स्थिती, त्याची घनता कमी करण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न, त्याच्या वापरासाठी क्रम कसा लावावयाचा, पाणीपुरवठ्याचे व वापराचे अर्थशास्त्र, पाण्याची उत्पादकता, पाणी वापरावरील कर धोरण असे अनेक प्रश्न आज आपल्या समोर चर्चेला आहेत. अलीकडे तर पाण्यासाठी तिसरे महायुध्द होईल येथपर्यंत चर्चेचा सूर पोहोचल्याचे दिसते. या संपूर्ण प्रक्रियेत शासन, शेतकरी, उद्योजक, स्वयंसेवी संस्था, अभ्यासक व इतर काही मंडळी आपापली विचारधारा घेऊन पुढे आली आहेत व येत आहेत. त्याच पध्दतीने मी देखील काही विचार माझ्या या पुढील विवेचनातून मांडणार आहे.

महाराष्ट्रातील सिंचनविषयक धोरण, महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धता, अवर्षणप्रवण भाग व येथील पाण्याची उपलब्धता, उपसा

सिंचन योजनेचे स्वरुप, पाण्याची उत्पादकता व त्याचे अर्थशास्त्र, सिंचन व्यवस्था व बाष्पीभवन, उपसा सिंचन प्रकल्पातील काही सुधारणा या विषयांना थोडा थोडा स्पर्श करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

पाणी हे निसर्गाचे वरदान असून त्याच्या उपलब्धतेसाठी निसर्गावरच अवलंबून रहावे लागते. विकासासाठी इतर निविष्ठांप्रमाणे पाण्याला गरजेनुसार बाजारातून विकत आणता येत नाही. तेव्हा पाण्याच्या उपलब्धतेविषयी माणसाचे हात बांधले गेले असले तरी उपलब्ध पाण्याचे सुनियोजित व कार्यक्षमतेने वापर करणे हे मात्र त्याच्या हाती आहे. नैसर्गिक साधनांच्या उपलब्धतेवर कोणत्याही प्रदेशाचा विकास करावयाचे ठरले तर त्यात पाणी हा महत्त्वाचा घटक ठरतो. विशेषतः अन्य संसाधनांची (उदा. खनिज पदार्थ, कोळसा, तेल इ.) मुबलक उपलब्धता नसलेल्या महाराष्ट्रासारख्या प्रदेशाचा विकास करतांना तर नियोजनामध्ये पाण्याची उपलब्धता हा निर्णायक घटक ठरतो. (महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल, खंड १, पृ. १५९, १९९९) त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्मितीनंतर विकासाच्या सिंचन प्रश्नावर अभ्यास करुन सिंचनविषयक धोरण व कार्यपद्धतीसंबंधी सूचना करण्यासाठी काही अभ्यास गट तयार करण्यात आले होते.

### १.१. पहिला सिंचन आयोगः

स.गो.बर्वे यांचे अध्यक्षतेखाली पहिल्या सिंचन आयोगाची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली होती. आयोगाने त्याचा अहवाल १९६२ मध्ये शासनास सादर केला व त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने गत ३५ ते ३६ (१९९९ पर्यंत) पाण्याचे व सिंचनाचे नियोजन करण्यात आले होते. राज्यातील प्रमुख खोऱ्यातील भूपृष्ठावरील पाण्याची उपलब्धता, तिचा वापर, सिंचन प्रकल्पाचा आराखडा, सिंचन क्षेत्राचा विकास, सिंचनाचे वित्तविषयक अंग, सिंचनाची पाणी वाटप व्यवस्था इ. विषयी २०० शिफारशी या आयोगाने केल्या होत्या. त्यातील बऱ्याचशा शिफारशी पूर्णतः व काही शिफारशी अंशतः स्वीकारल्या व त्याप्रमाणे दुसऱ्या सिंचन आयोगाच्या स्थापनेपर्यंत हे धोरण चालू राहिले.

### १.२. महाराष्ट्र जल व सिंचन आयोगः

दरम्यानच्या काळात झालेली प्रचंड लोकसंख्या वाढ, बदलेले राहणीमान व औद्योगिकीकरण यामुळे एकूणच पाण्याची गरज वाढली. पिण्याचे पाणी, कारखानदारी, विद्युत निर्मिती याकरिता पाण्याचे आरक्षण करावे लागले आहे. पाण्याच्या चौफेर मागणीमुळे पिण्यासाठी, सिंचनासाठी व कारखानदारीसाठी पाण्याच्या गरजांचा प्राधान्यक्रम ठरविणे अगत्याचे बनले आहे. आरोग्य विषयक व पर्यावरणीय जागृतीमुळे पाण्याच्या गुणवत्तेबाबतच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत व पाण्याच्या व्यवस्थापनातले त्याचे महत्त्व वाढले आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये विकासाबाबतची वाढती जागरुकता व तदनुषंगिक विकासाच्या असमतोलाचे व अनुशेषाचे प्रश्न, विकासाच्या गतीबरोबर भूजलाचा अमर्याद व अनिर्बंध उपसा, नागरी व औद्योगिक वापरामुळे होणारे जलस्त्रोतांचे व त्यामुळे जलाशयांचे व भूजलांचे प्रदूषण हे नवे प्रश्न गंभीर रुप धारण करीत आहेत. त्यामुळे जलविकासाचे व्यवस्थापन अधिकाधिक बिकट व गुंतागुंतीचे झाले आहे. (महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल, खंड

१, पृ. १, १९९९)

बदललेल्या या सर्व परिस्थितीचा विचार करता सिंचनविषयक प्रश्न आणि जलसंपत्तीच्या विकासाच्या संबंधात अद्ययावत अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मा.आ.चितळे यांच्या अध्यक्षतेखाली १९९५ मध्ये महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाची स्थापना केली. या आयोगाने १९९९ मध्ये ५ खंडात आपला अहवाल शासनास सादर केला.

**१.३. इतर समित्याः**

दरम्यानच्या काळात शासनाने पाण्याच्या व्यवस्थापनाविषयी अभ्यास करण्यासाठी अनेक समित्या नेमल्या.

१. अवर्षण प्रवण क्षेत्राची सत्यशोधन (सुखथनकर) समिती - १९७३
२. आठमाही पाणी वापर (देऊसकर, देशमुख, दांडेकर) समिती - १९७९
३. कोकण बृहत आराखडा (स्वामिनाथन) समिती - १९८१
४. कोकण सिंचन विकास उच्चाधिकार (खताळ) समिती - १९८०
५. सिंचन व्यवस्थापनाबाबत उच्चाधिकार (जैन) समिती - १९८१
६. राज्यातील प्रादेशिक अनुशेष विषयक (दांडेकर) समिती - १९८४
७. कसबेकर अभ्यास गट - १९८४
८. पिण्याच्या पाणीपुरवठा कार्यक्रमावरील १९९५ मधील श्वेतपत्रिका.

**तक्ता क्र. १**

**महाराष्ट्राची भौगोलिक विभागणी व पावसाचे प्रमाण (टक्केवारित)**

| भौगोलिक विभाग विभाग | सह्याद्री | पठार | खानदेश, कृष्णा व गोदावरी खोरे | घाटाकडील काही भाग, विदर्भ व मराठवाडा |
|---|---|---|---|---|
| एकूण क्षेत्र | १३ | १३ | ३४ | ४० |
| पावसाचे प्रमाण | २५ | १९ | २० | ३६ |

## २. महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धताः

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.७१ ह. चौ.कि.मी. असून गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व कोकण अशा पाच मुख्य खोऱ्यांमध्ये व २५ उपखोऱ्यांमध्ये विभागले आहे. राज्यात लहान - मोठ्या मिळून नद्यांची संख्या जवळजवळ ४०० इतकी आहे. राज्यभरातील पावसाच्या प्रमाणात विविधता असल्याने पाण्याची उपलब्धता देखील राज्यभर समान नाही हे तक्ता क्र. १ मध्ये दाखविले आहे.

सह्याद्री विभागात राज्याचे एकूण १३ टक्के क्षेत्र असून २५ टक्के पाऊस पडतो. पठारी भागात देखील सह्याद्रीइतकेच क्षेत्र असले तरी

केवळ ११ टक्के पाऊस पडतो, परंतु खानदेश, कृष्णा गोदावरी खोऱ्यातील क्षेत्र मात्र ३४ टक्के असून जेमतेम २० टक्के पाऊस पडतो. घाटाकडील काही भाग, विदर्भ व मराठवाडा या भागात जमिनीचे क्षेत्र व पडणारे पावसाचे प्रमाण जवळपास सारखे आहे.

महाराष्ट्रातील जिल्हावार पावसाच्या प्रमाणात देखील असमानता आढळते. ती तक्ता क्र. २ च्या अवलोकनाने स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. २ :**

**महाराष्ट्रातील जिल्हावार सरासरी क्षेत्र व पर्जन्यमान** (०१/१०/२०११ ची नोंद)

| जिल्हा | क्षेत्रफळ चौ.कि.मी | पाऊस (मि.मी) | जिल्हा | क्षेत्रफळ चौ.कि.मी | पाऊस (मि.मी) |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ६९ | | जालना | ७,७१८ | ५४१ |
| बृहन्मुंबई | ५३४ | | परभणी/हिंगोली | ११,०४१ | ६९३ |
| ठाणे | ९,५५८ | २,८१३ | बीड | १०,६९३ | ६८३ |
| रायगड | ७,१५२ | ३,७१२ | नांदेड | १०,५२८ | ६८६ |
| रत्नागिरी | ८,२०८ | ४,६७८ | उस्मानाबाद | ७,५६९ | ४६४ |
| सिंधुदुर्ग | ५,२०७ | ४,१४४ | लातूर | ७,१५७ | ६९५ |
| नाशिक | १५,५३० | ८५९ | बुलढाणा | ९,६६१ | ६२६ |
| धुळे / नंदुरबार | १३,१५० | ६७१ | अकोला / वाशिम | १०,५७४ | ६६३ |
| जळगांव | ११,७६५ | ६०३ | अमरावती | १२,२१० | ८५७ |
| अहमदनगर | १७,०४८ | ४४७ | यवतमाळ | १३,५८२ | ७७८ |
| पुणे | १५,६४३ | ८४२ | वर्धा | ६,३०९ | ९६५ |
| सातारा | १०,४८० | १,२२६ | नागपूर | ९,८९२ | ९३५ |
| सांगली | ८,५७२ | ३३७ | भंडारा/गोंदिया | ९,३२१ | १,१३९ |
| सोलापूर | १४,४९५ | ४०९ | चंद्रपूर | ११,४४३ | ९८३ |
| कोल्हापूर | ७,६८५ | २,०१२ | गडचिरोली | १४,४१२ | १,१८७ |
| औरंगाबाद | १०,१०७ | ५५९ | | | |

**तक्ता क्र.३**

**खोरेनिहाय एकूण क्षेत्रफळ, उपलब्ध नैसर्गिक जलसंपत्ती व लागवडीयोग्य क्षेत्र**

**उपलब्धता - द.ल.घ.मी.लागवडीयोग्य क्षेत्र - हजार हेक्टर**

| अ. नं. | खोऱ्याचे नाव | क्षेत्रफळ (चौ.की.मी) | ५० टक्के विश्वासार्हतेची उपलब्धता | ७५ टक्के विश्वासार्हतेची उपलब्धता | वार्षिक सरासरी उपलब्धता | लागवडी योग्य क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गादोवरी खोरे | १,५३,१०१ (४९.७५) | ३७,३०० | ४७,७०८ | ५०,८८० (३१.०५) | ११,२५६ (४९.९३) |
| २ | तापी खोरे | ५१,३०४ (१६.६७) | ६,९७७ | ९,७८० | ९,११८ (५.५६) | ३,७३१ (१६.५५) |
| ३ | नर्मदा खोरे | १,०४८ (०.३४) | ३१५ | ४८२ | ५८० (०.३५) | ६४ (०.२८) |
| ४ | कृष्णा खोरे | ६९.०३२ (२२.४३) | २८,३७१ | ३४,५०४ | ३४,०३२ (२०.७७) | ५,६२७ (२४.९६) |
| ५ | कोकण खोरे | ३३,२२८ (१०.७९) | ५८,५९१ | ६९,३०० | ६९,२१० (४२.२४) | १,८६४ (८.२६) |

*(टीप: कंसातील आकडे एकुणाशी टक्केवारी दर्शवितात)*

वरील तक्त्यावरुन असे दिसते की,

१) महाराष्ट्राचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान १,१६४ मि.मी.आहे.

२) कोकणाचे मुंबई वगळून ३,८३७ मि.मी.

३) कोकण भाग वगळता संपुर्ण महाराष्ट्रात कोल्हापूर पाण्याच्या दृष्टीने समृध्द जिल्हा आहे. त्या खालोखाल सातारा, गोंदिया, भंडारा व गडचिरोलीचा क्रम लागतो.

४) दुसऱ्या बाजूस नगर, सोलापूर, उस्मानाबाद या भागात सरासरी पावसाचे प्रमाण कमी.

५) येथे पाण्याच्या उपलब्धतेचा विस्तार काढला तर तो ४५५ ते ३,३६४ मि.मी.इतका येतो.

याच अनुषंगाने खोरेनिहाय पाण्याची उपलब्धी व एकूण क्षेत्रफळ यांचाही विचार तक्ता क्र. ३ मध्ये मांडला आहे. गोदावरी खोऱ्याने एकूण महाराष्ट्राची ५० टक्के जमीन व्यापली असता केवळ उपलब्ध पाण्यापैकी ३१ टक्के वाटा या खोऱ्याला आला आहे. तशीच परिस्थिती तापी खोऱ्याची आहे. कोकणाचे चित्र मात्र अगदी याच्या उलट आहे. एकूण जमीन ११ टक्के तर ४२ टक्के पाणी या जमिनीला उपलब्ध आहे. लागवडीयोग्य जमिनीचा विचार करता पुन्हा गोदावरी खोऱ्यात ती जवळ जवळ ५० टक्के, कृष्णा खोऱ्यात २४ टक्के तर कोकणात मात्र ८ टक्के इतकी आहे.

प्रति हेक्टरी पाण्याच्या उपलब्धतेच्या आधारे एकूण महाराष्ट्राचे पाच विभाग करता येतील.

तक्ता क्र.३(ब)

| अ.नं. | विभाग | प्रति हे. पाण्याची उपलब्धता | राज्याच्या एकूण लागवडी जमिनीचे प्रमाण (टक्केवारीत) |
|---|---|---|---|
| १ | अतितुटीचे क्षेत्र | १,५०० घ.मी. पेक्षा कमी. | १३ |
| २ | तुटीचे क्षेत्र | १,५००-३,००० घ.मी. | ३२ |
| ३ | सर्वसाधारण क्षेत्र | ३,०००-८,००० घ.मी | ३४ |
| ४ | विपुलतेचे क्षेत्र | ८,०००-१२,००० घ.मी. | ६ |
| ५ | अतिविपुलतेचे क्षेत्र | १२,००० घ.मी.पेक्षा जास्त | १५ |

अतितुटीच्या क्षेत्रासाठी पुढीलप्रमाणे काही नियम सुचविण्यात आले आहेत.

१) आर्थिक निकषावर आधारित आंतरखोरे पाणी स्थलांतराची आवश्यकता.

२) फक्त ठिबक सिंचनास व कमी पाणी लागणाऱ्या पिकास मंजुरी.

३) फळबागा व्यतिरिक्तच्या बारमाही पिकावर पूर्ण प्रतिबंध.

४) कमी पाणी लागणाऱ्या आर्थिक व्यवहारांना प्रोत्साहन.

## ३. अवर्षणप्रवण विभाग व पाण्याची उपलब्धता:

सुखथनकर समितीच्या मते ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी ७५० मि.मी.पेक्षा कमी पाऊस पडतो तो भूभाग म्हणजे अवर्षणप्रवण भाग होय. या निकषाच्या आधारे महाराष्ट्रातील १४ जिल्हे या भागात येतात. त्यातील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, नगर हे जिल्हे सह्याद्री रांगाशी सलग असल्याने त्यांच्या पश्चिमेकडील भागात पावसाचे प्रमाण समाधानकारक आहे. परंतु बहुतांश पूर्व भाग गंभीर स्वरुपाचा अवर्षणप्रणव आहे. धुळे, जालना, लातुर, उस्मानाबाद, बीड, बुलढाणा, जळगाव व सोलापुर हे अवर्षणप्रवण जिल्हे म्हणुन ओळखले जातात. यामध्ये १४ तालुक्यांचा समावेश असून त्याचे क्षेत्र १.५ लक्ष चौ.कि.मी. इतके आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या जवळ जवळ ५० टक्के इतके क्षेत्र आहे. या भागात सरासरी ४००-७०० मि.मी. पाऊस पडतो आणि जवळ जवळ ६० टक्के जमिनीवर वार्षिक खरिपाचेच पीक घेतले जाते. पुढीलप्रमाणे खोरेनिहाय अवर्षणप्रवण अंदाज घेता येईल.

अवर्षणप्रवण भागात पावसाचा प्रारंभ व शेवट अनिश्चित व प्रमाणही कमी असते. राज्याचे सरासरी वार्षिक पावसाचे प्रमाण १,३५७ मि.मी.असून त्यापैकी जवळजवळ ८८ टक्के पाऊस जून ते सप्टेंबर या काळात पडतो. यातून अवर्षणप्रवण भागातील मोठा भाग वगळला जातो. म्हणून या भागात आगमनापेक्षा परतीचा (सप्टेंबर) पाऊस अधिक पडतो. महाराष्ट्रात सरासरी पर्जन्य दिवसांची संख्या ही ५९ असून जून ते सप्टेंबरच्या

काळात सरासरी ४९ इतके असतो. (पडलेला पाऊस २.५ मि.मी. किंवा त्यापेक्षा ज्या दिवशी अधिक असतो त्या दिवसाची गणना पर्जन्य दिवस म्हणुन केली जाते.) महत्त्वाची बाब म्हणजे अवर्षणप्रवण भागात पावसाचे सरासरी दिवस केवळ सहा इतके आहे. हवामान मुख्यत्वे विषम स्वरुपाचे, तापमान ३६° ते ४१°-४४° सेल्सिअस, ऑगस्टमधील आर्द्रतेचे प्रमाण ८२ ते ८४ टक्के, तर एप्रिलमध्ये ते घटून १९ ते २६ टक्क्यांवर येते.

एकंदरीत, अवर्षणप्रवण भागात निर्सगाच्या पाण्याची उपलब्धी कमी आहे. म्हणून

तक्ता क्र.३(क)

| खोऱ्याचे नाव | नैसर्गिक पाण्याच्या उपलब्धतेनुसार केलेली गटवारी |
|---|---|
| निम्न गोदावरी (पैठण धरणाखाली) | तुटीचे क्षेत्र |
| पूर्णा (दुधनासहित) | तुटीचे क्षेत्र |
| मांजरा | तुटीचे क्षेत्र |
| पूर्णा (तापी) | तुटीचे क्षेत्र |
| गिरणा | तुटीचे क्षेत्र |
| मध्य तापी (दक्षिण) | तुटीचे क्षेत्र |
| ऊर्ध्व कृष्णा (पूर्व) | अतितुटीचे क्षेत्र |
| सीना-बोरी -बेनेतुरा | अतितुटीचे क्षेत्र |

विपुलतेच्या खोऱ्यातून पाणी उचलून वा प्रवाही पध्दतीने उपलब्ध करून देणे ही येथील लोकांची मुख्य मागणी आहे व भविष्यात ही मागणी अधिकाधिक बळकट होत जाणारी आहे. तेव्हा या मागणीच्या पूर्ततेसाठी शासन अनेक वर्षांपासून प्रयत्नही करीत आहे. त्यातच समान पाणीवाटपाचे धोरण हा महाराष्ट्रातील त्यातल्या त्यात अवर्षणप्रवण भागातील लोकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न ठरला आहे. ढोबळ मानाने पाण्याचे समान वाटप याचा अर्थ प्रत्येक शेतकऱ्याला काही ना काही प्रमाणात पाणी मिळणे होय. राज्यातील शेतीसाठी सध्या उपलब्ध असलेले आणि भविष्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा काटेकोरपणे व नियोजनबध्द वापर करुन वंशपरंपरागत बागायतदार वा कोरडवाहू शेतकरी या दोहोतील दरी कमी करण्याकडील वाटचाल म्हणजे समान पाणी वाटपाचे धोरण होय. तव्यासारख्या आकाराच्या खोऱ्यातील पाणी उचलून उंचावरील तुटीच्या खोऱ्यातील प्रदेशांना दिले जावे ही मुख्य कल्पना व पाण्याच्या पुनर्वितरणाचा मुख्य उद्देश यामागे आहे. महाराष्ट्रात पाण्याचे पुनर्वितरण करण्याची त्यातल्या त्यात अवर्षणप्रवण भागातील पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढील प्रमाणे सिंचन प्रकल्प राबविले आहेत.

तक्ता क्र.४

गटवार सिंचन प्रकल्पांची विभागणी

| गट | प्रति हेक्टर पाण्याची उपलब्धता | मोठे प्रकल्प | मध्यम प्रकल्प | लहान प्रकल्प | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| अतितुटीचे क्षेत्र | १,५०० घ.मी.पेक्षा कमी | १ | ३५ | ३५२ | ३८८ |
| तुटीचे क्षेत्र | १,५०० ते ३,००० घ.मी. | १२ | ६५ | ५९५ | ६७२ |
| सर्वसाधारण क्षेत्र | ३,००० ते ८,००० घ.मी | २५ | ४८ | ५५६ | ६२९ |
| विपुलतेचे क्षेत्र | ८,००० ते १२,००० घ.मी | ३ | २८ | १४६ | १७७ |
| अतिविपुलतेचे क्षेत्र | १२,००० घ.मी.पेक्षा अधिक | १२ | १८ | २१४ | २४४ |
| **एकूण** | | **५३** | **१९४** | **१,८६३** | **२,११०** |

वरील तक्त्याच्या आधारे पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत.

१) अतितुटीच्या क्षेत्रात एकूणच सिंचन प्रकल्पांची संख्या कमी.

२) मध्यम आणि लहान प्रकल्पधारणेत तो तिसऱ्या क्रमांकावर आहे.

३) सर्वसाधारण क्षेत्रात सर्वात जास्त सिंचन प्रकल्प आहेत.

४)प्रादेशिकदृष्ट्या विचार करता सिंचन प्रकल्पांच्या विभागणीतही समानता दिसत नाही.

वरीलप्रमाणे सिंचनाच्या आज अस्तित्वात असलेल्या व नियोजित सर्वच्या सर्व योजना सरकारी मालकीच्या आहेत. मोठ्या प्रमाणावरील (८ ते १० हजार घ.मी.पेक्षा) पाणी साठ्याच्या व सिंचनाच्या प्रकल्पात सहकारी वा खासगी प्रयोग आजअखेर महाराष्ट्रात झाले नाहीत.

## ४. सिंचन प्रकल्पाचे अर्थशास्त्र:

उपसा सिंचन प्रकल्पाच्या खर्चाचे "आस्थापन खर्च" (Establishment Cost) आणि "आवर्ती खर्च" (Recurring Cost ) असे दोन भाग पाडले जातात. कालवा खोदणे, वितरिका तयार करणे, पंप हाऊस तयार करणे, त्यातील सर्व उपकरणे खरेदी करणे व कायम स्वरुपातील नोकर वर्गाचा पगार यावरील सर्व खर्च हा पहिल्या प्रकाराच्या खर्चात मोडतो. या प्रकल्पासाठी जमीन संपादन करीत असतांना संबंधितांना शासनाने मोजलेली पैशातील किंमत देखील याच खर्चात समाविष्ट केली जाते. या संपूर्ण रकमेवर कमीत कमी १० टक्के व्याज आकारुन तीही रक्कम आस्थापन खर्चात मिसळावी. कालवा व वितरिकांची दुरुस्ती, वीज बिल, नोकरांवरील पगार इत्यादीवरील खर्च आवर्ती खर्चात मोडतात. या रकमेवरील देखील १० टक्के व्याज या खर्चात समाविष्ट करणे अपेक्षित आहे. या दोन्ही खर्चाचा विचार करुन प्रकल्पाचे अर्थशास्त्र मांडले जाते.

सिंचनविषयीच्या प्रत्येक प्रकल्पाचा आराखडा तयार करीत असतांना त्याचा लाभ-

व्यय - गुणोत्तर (Cost Benefit Ratio) मांडला जातो. यात आस्थापन खर्च व आवर्ती खर्चाचा विचार जरुर केला जातो. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कालावधी, बांधणीसाठी लागणाऱ्या निविष्ठांची सरकारी किंमत, प्रकल्पापासून लाभार्थ्यांच्या उत्पन्नात होणारी वाढ आणि त्या लाभार्थ्यांकडून कर रुपात किती व कसे पैसे वसूल करावयाचे या सर्वांचा खुलासा त्यात असतो.

आज तरी महाराष्ट्रातील सर्व उपसा सिंचन प्रकल्पांसाठी शासनानेच खर्च केला आहे. तेव्हा याचा बोजा प्रारंभी लाभार्थ्यांवर पडण्याचे कारण नाही, परंतु पुढे लाभार्थ्यांवरील करांच्या माध्यमातून वसूल करण्याचे तपशील मात्र वेगवेगळे आहेत. उपसा सिंचन प्रकल्पामध्ये आवर्ती खर्चातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे विजेवरील खर्च (तो साधारणतः ८० टक्के इतका असतो) उपसा सिंचन प्रकल्पासाठी ही वीज सवलतीच्या दरात (Subsidized Rate) प्रतियुनिट रु.०.३० प्रमाणे दिली जाते. परंतु प्रत्यक्ष बाजारात प्रतियुनिट विजेची किंमत सरासरी रु.५ च्या आसपास आहे. (Cost of generation) सवलतीच्या दरात दिल्या जाणाऱ्या विजेचा विचार करुन संबंधित उपसा सिंचन प्रकल्पाचे लाभ-व्यय-गुणोत्तर ठरविले जाते आणि त्यावरुन लाभार्थ्यांवर आकारावयाच्या कराचे दर निश्चित केले जातात. तेव्हा निश्चितच हे कराचे दर सवलतीचे दर असल्यामुळे लाभार्थ्यांना पाणी स्वस्त दरात मिळणे हे खरे. या सवलतीच्या दराचा प्रत्यक्ष बोजा लाभार्थ्यांवर जरी पडत नसला तरी अप्रत्यक्षरीत्या जनताच हे खर्च उचलणार आहे. गळती झालेल्या विजेचा उत्पादन खर्च भरुन काढण्यासाठी विजेची किंमत वाढवून ग्राहकांना आकारावी लागते आणि हे सर्वसामान्य पातळीवरील भाववाढीच्या स्वरुपात काही प्रमाणात प्रतिबिंबित झाल्यासारखे दिसते तेव्हा येथे प्रकर्षाने एक मुद्दा मांडावा असे वाटते की, जोपर्यंत ही सवलत धनात्मक (+सब्सीडी) स्वरुपाची आहे, तोपर्यंत खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांना पाणी स्वस्तात मिळेल, परंतु प्रत्यक्षात प्रस्तुत सवलत किती प्रमाणात धनात्मक आहे हे बारकाईने अभ्यासून पाहिले पाहिजे. कदाचित अभ्यासाअंती एक वेगळे चित्र देखील समोर येऊ शकेल.

वरील मुद्याला पुष्टी देणारे विधान महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या पहावयास मिळते. त्यात असे म्हटले आहे की, उपलब्ध पाण्याच्या पुरेपुर वापर करण्याच्या दृष्टीने व राज्यातील जास्तीत जास्त भागांना पाण्याचा लाभ देऊन न्याय प्रस्थापित करण्यासाठी येथून पुढे उपसा सिंचन अधिक प्रमाणावर करावे लागणार आहे. त्यासाठी योग्य आर्थिक निकष ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. अशा उपसा सिंचन योजनांची सफलता ठरवित असताना त्यावर होणारा विजेचा प्रत्यक्ष खर्च गृहीत धरणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना दिले जाणारे विजेचे सवलतीचे विशेष दर घेऊन लाभ -व्यय-गुणोत्तर काढणे तर्कसंगत नाही. सर्वसाधारणपणे पाणी उपशाची उंची ६० मी. पर्यंत व लांबी ४ की मी. पर्यंत असणाऱ्या योजनाच आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरु शकतील असे सकृत दर्शनी दिसते. तेव्हा त्यापेक्षा अधिक उंचीच्या व लांबीच्या योजना लाभ-व्ययाच्या तपशिलात आर्थिक तज्ज्ञाकडून तपासून घेणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल, खंड १, पृ. ३४४, १९९९) जर विजेची गळती थांबवून सरासरी विजेवरील आकारणी कमी झाली तर याहून अधिक उंचीचे व लांबीचे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम ठरतील.

अवर्षणप्रवण भागातील उपसा सिंचन

प्रकल्पाचे एक स्वरुप साधारण असे आहे की, पावसाळ्यात ज्यावेळी मुख्य नदीस पूर येतो (जेथून पाणी उचलले जाणार आहे) तेव्हा त्या पुराचे पाणी उचलून पहिल्या टप्प्यात लाभार्थ्यांच्या प्रदेशातील छोटे-मोठे पाण्याचे साठे भरुन घ्यावयाचे. दुसऱ्या टप्प्यात नैसर्गिक प्रवाही पध्दतीने ज्या ज्या लाभार्थ्यांना देता येईल तितक्यांना पाणी देणे आणि जेथे प्रवाही पध्दतीने पाणी देण्याचे अनुकूलता नाही तेथे पुन्हा पाणी उचलून (वीज वापरुन) लाभार्थ्यांना पोहोचवायचे. या लाभार्थ्यांचे दोन प्रकार करावसे वाटतात एक, साठयातून प्रत्यक्षात शेतापर्यंत पाणी मिळविणारा व दुसरा, साठ्याच्या झिरपणीतून पाणी मिळविणारा.

पाणी साठविण्याच्या प्रदेशापर्यंत मुख्य नदीच्या प्रवाहातून पाणी पोहोचविणे ही जरी सरकारची जबाबदारी असली तरी त्या साठ्यातून प्रत्यक्ष लाभार्थींच्या जमिनीपर्यंत पाणी नेण्याची जबाबदारी कोणावर राहील, याची स्पष्टता नाही. म्हणून येथे संदिग्धता निर्माण झाली आहे. संदिग्धता म्हणजे व्यवस्थापनातील गोंधळ, ज्यामुळे पाणी वाटपाच्या व्यवस्थापनावर विपरीत परिणाम होतो.

उपसा सिंचन प्रकल्पाची कार्यक्षमता सर्वसाधारणपणे पुढील गोष्टींवर अवलंबून आहे.

१) पुरेशी विजेची उपलब्धता

२) विजेचे दर (प्रत्यक्षातील दर, सवलतीचे दर)

३) अचुक व्यवस्थापन व नियोजन

४) वितरिका अद्ययावत ठेवणे

लाभार्थ्यांकडून वेळेवर कर वसूल करण्याच्या बाबतीतील अनुभवदेखील तितकासा समाधानकारक नाही. उदा. गेल्या दहा वर्षात ताकारी व म्हैसाळ प्रकल्पांतर्गत जवळजवळ १२ कोटी रुपये थकबाकी असल्याचे आढळते. बऱ्याच वेळेला या संदर्भातील निर्णय राजकीय मंचावर सोडविले जातात. झिरपणीतून पाणी मिळविणाऱ्या लाभार्थ्यांकडून करवसुलीच्या मोहिमेला असलेला प्रतिसाद देखील तपासून पाहिला पाहिजे. महाराष्ट्राच्या बाबतीतील एक सर्वश्रुत सत्य हे आहे की, हा प्रदेश दगड धोंडयांचा व चढउताराचा असल्यामुळे भारतातील इतर मैदानी प्रदेशातील सिंचन प्रकल्पापेक्षा महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांचा प्रतिहेक्टरी अधिक खर्च येतो. ही बाब लाभ-व्यव-गुणोत्तराने मोजली जाते. महाराष्ट्रांतर्गत विचार करावयाचा झाला तर नदीतटांचा किंवा डोंगर पठाराचा सलग सपाट प्रदेश तुलनेने कमी आहे. त्यामुळे राज्यात पाणी साठविण्यासाठी अनेक सोयिस्कर ठिकाणे असली तरी प्रवाही कालव्यांची रचना अधिक खर्चिक आहे. २००५-०६ च्या मापदंडानुसार (DSR) ताकारी उपसा सिंचनाचा प्रति हेक्टरी खर्च रु.२,४९,५६ तर म्हैशाळचा रु.१,८८,५२७ इतका आहे. तेव्हा महाराष्ट्रात उपसा सिंचन प्रकल्प तयार करित असताना महाराष्ट्राच्या भूरचनेची दखल घेणे गरजेचे आहे.

अलिकडे केंद्रीय जल आयोगाच्या नव्या निर्देशानुसार केवळ लाभ-व्यय-गुणोत्तराच्या आधारे संबंधित प्रकल्पाची स्वीकारार्हता न ठरविता आंतरिक परतावा दर (Internal Rate of Return) चा आधार घेऊन प्रकल्पाचे वास्तविक विकासमूल्य ठरवावे लागेल. ज्या व्याजदराने आजमितीस भावणारा गुंतवणुकीवरील वास्तविक लाभ हा गुंतवणुकीवरील भारापेक्षा अधिक होतो अशा दरास अंतर्गत परताव्याचा दर म्हणतात.

सिंचन प्रकल्पाचा आराखडा तयार करीत असताना त्याचा सरकारी हिशोब मांडून त्या आधारे पाण्याचे कर आकारण्याचे दर ठरविले जातात. वास्तवात आवर्ती खर्च, व्याजदर (१० टक्के) व घसारा (१ टक्का) हे घटक आधारभूत मानून

पाण्याचे दर ठरविले पाहिजेत. महाराष्ट्र व देशपातळीवरील विविध सिंचन प्रकल्पापासून मिळणाऱ्या पाण्याचे मूल्य ठरवित असताना काही शिफारशी व मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत. त्यातील नमुनादाखल दोन समित्यांचा आढावा येथे देत आहे.

**४.१. वैद्यनाथन समिती:**

४.१.१. प्रकल्पाची व्यवहार्यता ठरविण्यासाठी लाभ-व्यय-गुणोत्तराऐवजी अंतर्गत परताव्याच्या दराचा मापदंड वापरावा.

४.१.२. पाण्याचे सुधारित मूल्य असे असावे की, त्यामध्ये पूर्ण खर्चाची वसुली व्हावी, त्याचप्रमाणे पाण्याचा काटकसरीने वापर होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे.

**४.२. दहावा राष्ट्रीय वित्त आयोग:**

४.२.१. सिंचनाच्या पाण्याचा दर असा असावा की, त्यातून मिळणारी वसुली ही त्या योजनांना लागणाऱ्या देखभाल दुरुस्तीचा खर्च व भांडवली खर्चाच्या १ टक्के वार्षिक इतकी एकूण खर्चाचा परतावा प्राप्त करण्याइतपत असावी.

४.२.२. राज्यशासनाच्या सिंचन योजना राबविताना यंत्रसामुग्रीवरील दर वार्षिक खर्च हा उपलब्ध तरतुदीच्या २० टक्के पेक्षा अधिक असू नये.

**४.३. सुकथनकर समिती:**

४.३.१. सिंचनाचा फायदा ज्या जमिनीला मिळतो अशा सर्व प्रकारच्या जमिनीवर कर आकारणी करावी.

**तक्ता क्र.५**

**इ.स.२०३० सालाची विजेची गरज**

| अ.नु | महामंडळ | पूर्ण झालेल्या, बांधकामाधीन व भविष्य कालीन उपसा सिंचन योजनासाठी लागणारी अंदाजे वीज (मे.वॅ.) |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ | ७६५ |
| २ | विदर्भ विकास महामंडळ | १४० |
| ३ | तापी खोरे विकास महामंडळ | ४५६ |
| ४ | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ | नगण्य |
| ५ | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ | ६४ |
| | **एकूण** | **१,४२५** |

वरील आयोगाने महाराष्ट्रातील काही निवडक उपसा सिंचन योजनांची व्यवहार्यता (अर्थशास्त्र) पुढील प्रमाणे मांडली आहे.

## ४.४. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग:

प्रकल्प खर्चात आस्थापना खर्चानंतर आवर्ती खर्चातील मोठी खर्चाची बाब म्हणजे वीज होय. परंतु महाराष्ट्राची आजची वीजनिर्मितीची क्षमता व विजेची विविध अंगाने वाढणारी मागणी लक्षात घेता या दोहोत बरीच मोठी तफावत निर्माण झाली आहे. आज महाराष्ट्रात विजेची मागणी १५ ते १६ हजार मेगावॅट (दर दिवशी) इतकी असून पुरवठा मात्र १० हजार मेगावॅटच्या आसपास आहे. त्यातच तुटीच्या खोऱ्यात सिंचन प्रकल्प जसजसे हाती घेण्यात येतील तसतसा विजेच्या मागणीवरील ताणही वाढतच जाणार आहे. तेव्हा पाणी उपसा प्रकल्पासोबतच नवीन वीजनिर्मितीही होणे आवश्यक आहे. २०३० साली सिंचन प्रकल्पासाठी किती वीज लागणारी आहे त्याचा अंदाज महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने तक्ता क्र.५ (पृ.३२१) मध्ये वर्तविला आहे.

तक्ता क्र.६

**काही निवडक प्रकल्प व उपसा सिंचन योजनांचे लाभ - व्यय-प्रमाण अंतर्गत परतावा दर व आर्थिक अंतर्गत**

| अ.नु | प्रकल्प उपसा सिंचन योजना | लाभ -व्यय प्रमाण | अंतर्गत परतावा दर | आर्थिक अंतर्गत परतावा दर | शेरा आर्थिक दृष्ट्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | टेंभुर्णी मध्यम प्रकल्प | १ | १३ | १० | व्यवहार्य |
| २ | रांजणगाव लघु प्रकल्प | १ | १३ | १० | व्यवहार्य |
| ३ | आष्टी (उपसा) | १.४४ | २१ | १७ | खुप व्यवहार्य |
| ४ | बार्शी (उपसा) | ०.९५ | १३ | १० | व्यवहार्य |
| ५ | ब्राम्हगव्हाण (उपसा) | ०.७२ | ८ | ५ | अव्यवहार्य |
| ६ | एकरुख (उपसा) | १५३ | २४ | १९ | खुप व्यवहार्य |
| ७ | शिरापुर (उपसा) | ०.९१ | १३ | ९ | व्यवहार्य |

काही प्रकल्पांचे लाभ-व्यय-प्रमाण एकपेक्षा कमी असले तरी त्यांचा अंतर्गत परतावा दर १२ टक्केपेक्षा जास्त व आर्थिक अंतर्गत परतावा दर १० टक्केपेक्षा जास्त असल्याने ते प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरतात.

महाराष्ट्राच्या उपसा सिंचनाच्या लाभक्षेत्रातील पीकरचनेकडे नजर टाकल्यास त्यात मोठ्या प्रमाणात मूल्यवान पिके घेतली जातात असे दिसत नाही. महाराष्ट्रात आजही पाणी म्हणजे ऊस आणि ऊस हे मूल्यवान पीक समजले

जाते,परंतु उपसा सिंचनाचा अर्थशास्त्राशी मेळ घालावयाचा झाल्यास पाण्याच्या प्रत्यक्षातील खर्चाच्या तुलनेत (सवलतीचा दर वगळून) मूल्यवान पीकरचना शोधावी लागेल.

बहुतांश प्रमाणातील उपसा सिंचन प्रकल्पामध्ये मुख्य नदी स्त्रोतातील पावसाळ्यातील पुराचे पाणी उचलुन तुटीच्या भूप्रदेशातील पाण्याचे साठे भरावयाचे आहेत. याचा अर्थ ही बारमाही व खात्रीच्या पाण्याची सुविधा नाही. तसेच मुख्य नदी स्त्रोतातील पुराच्या पाण्यावर म्हणजेच त्या वर्षातील पावसाच्या प्रमाणावर ही योजना अवलंबून आहे. हे उचल पाणी लाभक्षेत्राला प्रामुख्याने पावसाळ्यातच मिळणार असल्याने साधारणपणे पावसाळ्यात भुसार मालाची पिके घेण्याइतपत तेथे पाऊस पडतो. त्यावेळी उचल पाण्याची किती आवश्यकता भासते हे पहावे लागेल. परंतु बोर, डाळिंब, सीताफळ यासारख्या काही निवडक फळबागा वगळता इतर फळपिकांना बारमाही पाण्याची आवश्यकता आहे. तेव्हा भुसार पिकांना पर्याय म्हणून नव्याने किती मुल्यवान पिके या भागात येऊन रूजतात त्यावरच या उपसा सिंचन प्रकल्पांची लाभकारकता अवलंबून राहील.

## ५ सिंचन व्यवस्था व बाष्पीभवन:

पाण्याच्या नियोजनात पाण्याच्या बाष्पीभवनाचा हिशोब ही संकल्पना आज अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. प्रकल्प तयार करीत असताना जो पाण्याचा साठा अपेक्षित धरलेला असतो त्यातून जी अनेक कारणासाठी पाण्याची तूट होत असते त्यात बाष्पीभवनाचे प्रमाण अधिक असते. जलाशयातून, कालव्यातून, सिंचन क्षेत्रावरुन बाष्पीभवनाने जे पाणी उडून जाते त्याचा नेमका हिशोब करता यावा म्हणून राज्य व देशपातळीवर काही प्रयोग झाले आहेत बाष्पीभवन मोजण्यात शास्त्रशुध्दता आणण्याचे प्रयत्न होत आहेत. तरीही त्याची मोजणी व मांडणी या बाबतचे आणखी पुरेसे प्रमाणीकरण व्हावयास पाहिजे. पाण्याची कमतरता जोपर्यंत जाणवत नव्हती तोपर्यंत बाष्पीभवन या संकल्पनेकडे फारसे लक्ष गेले नव्हते. परंतु आज जलचक्राचा तो एक प्रभावी घटक म्हणून पुढे येत असल्याने त्याच्या विषयी शास्त्रशुध्दपणे तपशीलवार विचार करण्याची आवश्यकता आहे. आज अस्तित्वात असलेल्या मोजमाप तंत्राच्या सहाय्याने अलिकडे जी मोजणी झाली आहे त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्रात मोठया सिंचन प्रकल्पातून होणाऱ्या बाष्पीभवनाचे प्रमाण हे १४ टक्के इतके आहे. मध्यम स्वरुपातील धरणाच्या संदर्भात हे प्रमाण २३ टक्के तर लहान धरणाच्या संदर्भात सर्वात जास्त म्हणजे २४ टक्के इतके आहे.

तक्ता क्र. ७ मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात सरासरी प्रतिवर्षी होणाऱ्या बाष्पीभवनाचे दर दर्शविले आहेत.

रत्नागिरी जिल्हयात बाष्पीभवनाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १,४७८ मि.मी.इतके आहे. धुळे, जळगाव येथे हे प्रमाण बरेच जास्त म्हणजे २,४७५ मि.मी. इतके आहे. अमरावती, अकोला व बुलढाणा या जिल्ह्यात हा दर २,३६७- २,४७२ मि.मी.पर्यंत आहेत. महाराष्ट्रात सर्वात जास्त बाष्पीभवन अमरावती व जळगाव येथे होते. हवामानाप्रमाणे बाष्पीभवनात बदल होतो. वायुवेग व तापमान कमी असून आर्द्रता जास्त असल्यास बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होते. सर्वसाधारणपणे बाष्पीभवनाचे प्रमाण जुलै, ऑगस्ट महिन्यात कमी असून एप्रिल, मे महिन्यात अधिक आढळते.

तक्ता क्र.७

जिल्हावार सरासरी बाष्पीभवन (मि.मी.मध्ये)

| जिल्हा | कमाल | किमान | वार्षिक सरासरी |
|---|---|---|---|
| बृहन्मुंबई | २४७ | ५४ | १६५१ |
| ठाणे | २४८ | ५४ | १६५३ |
| रायगड | २६५ | ७७ | १८७४ |
| रत्नागिरी | २१० | ५१ | १४७८ |
| सिंधुदुर्ग | २४३ | ६१ | १७३४ |
| नाशिक | ३०१ | ११७ | २१५६ |
| धुळे | ३१० | ११३ | २३६७ |
| जळगांव | ३१८ | १२१ | २४७२ |
| अहमदनगर | २३९ | ९९ | १७५७ |
| पुणे | २६९ | ९१ | १७९३ |
| सातारा | २३४ | ९२ | १६०७ |
| सांगली | २३४ | ७३ | १६१४ |
| सोलापूर | २६९ | ७९ | १६६१ |
| कोल्हापूर | २१६ | ७८ | १५१० |
| औरंगाबाद | २५७ | ४१ | २०३२ |
| जालना | २४९ | १२७ | २०२४ |
| परभणी | २५४ | १२३ | १९८७ |
| बीड | २४४ | १२१ | १९२८ |
| नांदेड | २५८ | ११६ | १९४९ |
| उस्मानाबाद | २५१ | १०१ | १७७४ |
| लातूर | २३९ | १३२ | १९८५ |
| बुलढाणा | ३१७ | १३२ | २३६७ |
| अकोला | ३८२ | १२५ | २३६९ |
| अमरावती | ४१३ | १२० | २४१६ |
| यवतमाळ | २९८ | ९५ | १८८० |
| वर्धा | ३२५ | ८१ | १८५४ |
| नागपूर | ३३५ | ८९ | १८६९ |
| भंडारा | ३३९ | ९३ | १८७६ |
| चंद्रपूर | ३०१ | १०० | १७४० |
| गडचिरोली | २७६ | ८३ | १६९५ |

महाराष्ट्र राज्याचे सरासरी बाष्पीभवनाचे प्रमाण १,९०० - ३,१७० दरम्यान आहे. महाराष्ट्रातील पर्जन्यमानाची एकच सरासरी असणाऱ्या वेगवेगळया ठिकाणी बाष्पीभवनात बरेचसे अंतर पडू शकते. उपलब्ध पाणी आणि वातावरणातील बाष्पशोषकता यामुळे पाण्याचे वाफेत रुपांतर होऊन त्याची अदलाबदल करण्याची क्षमता यावर बाष्पीभवन तसेच पर्णोत्सर्जन ठरविले जाते.

कोणत्याही पिकाला पुढील दोन कारणासाठी पाणी लागते. एक पर्णोत्सर्जनासाठी, दोन स्वतःचे अन्न तयार करण्यासाठी. यात पिकाने जमिनीद्वारे उचललेल्या एकूण पाण्यापैकी ९८ टक्के पाणी पर्णोत्सर्जनासाठी जाते व उर्वरित दोन टक्के पाणी साठवून अन्न तयार करण्यासाठी वापरले जाते. (जोगळेकर, विजय, ३० सेंमी पाण्यात बाराही महिने फायदेशीर शेती, अवर्षणप्रवण क्षेत्रातील जलव्यवस्थापन (शोधनिबंध संच) ६ वी महाराष्ट्र सिंचन परिषद, पृ.३.,२००५)

अवर्षणप्रवण भागात मुळातच पावसाचे प्रमाण सरासरीने कमी आहे. सोबतच पावसाचे दिवसही कमी आहेत. सरासरी उष्णता अधिक असणाऱ्या दिवसांची सरासरी संख्याही अधिक. त्यामुळे या भागातील जमिनीत ओलावा अगदीच नगण्य स्वरुपात असतो. तेव्हा पावसाच्या ज्या म्हणून हलक्या सरी येतात त्याचे पाणी बाष्पीभवनाचे मोठया प्रमाणावर उडून जाते. बँकेतील खात्यावर पैसे जमा झाल्यासारखे दिसतात, परंतु पैसे काढायला गेल्यावर खात्यावर पैसे शिल्लक नसल्याचे कळावे अशी परिस्थिती अवर्षणप्रवण भागातील पावसाची व पाण्याच्या उपलब्धतेची झाली आहे.

या भागाला फळझाडासारख्या पिकांची शिफारस करीत असताना सद्य परिस्थितीतील बाष्पीभवनाचे प्रमाण हिशोबात घेणे गरजेचे आहेच. शिवाय लाभकारकता अवलंबून राहील. फळझाडांची लागवड झाल्यानंतर झाडांचे व बागांचे आकारमान जसजसे वाढत जाईल तसतसे बाष्पीभवनाचे अधिक पाणी उडून जाणार आहे. सिंचनाचे नियोजन करीत असताना हेही लक्षात घेणे तितकेच आवश्यक आहे.

## ६. पाण्याची उत्पादकता वाढविणे:

प्रारंभी नमूद केल्याप्रमाणे मागणीप्रमाणे पाण्याचा पुरवठा येत नाही. तसे महाराष्ट्रात विविध भागात असलेला पाण्याचा पुरवठा (उपलब्धी) असमान आहे. या संदर्भातील समानता प्रस्थापित करण्यासाठी विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात पाणी नेणे हा तर सर्रास मार्ग पूर्वीपासूनच अवलंबिला आहे. उपसा सिंचनाच्या माध्यमातून अति तुटीच्या खोऱ्यातील पाण्याच्या मागणीची पूर्तता काही प्रमाणात केली आहे व अजूनही होत आहे, परंतु या सर्व प्रयत्नांना काही टप्प्यानंतर मर्यादा आहेत. तेव्हा वाढीव पाण्याची मागणी काही प्रमाणात पूर्ण करण्यासाठी पाण्यासाठी बचत म्हणजेच पाण्याची निर्मिती (पाण्याचा काटकसरीने वापर) ही संकल्पना लोकमानसामध्ये खोलवर रुजणे आवश्यक आहे. सिंचन प्रकल्प हाती घेण्याचे निर्णय राजकीय मंचावर न घेता आर्थिक मंचावर घेण्याबरोबरच पाण्याची उत्पादकता वाढविण्याकडे व त्यासाठीचे कोटेकोर नियोजन करण्याकडे अधिक लक्ष देणे आता काळाजी गरज बनली आहे. ढोबळ मानाने पाण्याची उत्पादकता वाढविणे म्हणजे कमीत कमी पाणी देऊन

अधिकाधिक परतावा मिळविणे होय. म्हणजेच पाणी या मूल्यवान व दुर्मिळ साधन संपत्तीचे नियोजन, विकास व संधारण असे करावे की, ज्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखून वाढत्या पाण्याची गरज अधिकाधिक समाधानकारक रीतीने भागविता येईल. तेव्हा भविष्यकाळात पाण्याची दुर्मिळता लक्षात घेता पाणी व्यवस्थापन हा कृषी व्यवस्थापनात प्रमुख भाग बनू इच्छितो.

महाराष्ट्रात आज ज्या ज्या भूप्रदेशात आधुनिक पध्दतीने शेती केली जाते ती पाण्याची उत्पादकता वाढविण्याच्या दिशेने टाकलेले पाऊलच म्हणावे लागेल. पाण्याची उत्पादकता वाढविण्यासाठी काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**६.१ पीक पद्धतीच्या रचनेत बदल:**

बर्वे आयोगाने पिकांच्या निवडी बाबत शेतकऱ्यांवर बंधने नसावीत, फक्त जास्त पाण्यामुळे जमिनी खराब होऊ नयेत याची काळजी घ्यावी असे मत व्यक्त केले होते. त्यानंतर सुखथनकर समितीने मात्र अवर्षणप्रवण क्षेत्रामध्ये कमी कालावधीत कमी पाण्यावर जास्त उत्पादन देणाऱ्या पिकांची निवड करण्याबाबत सुचविले होते. जास्त शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ व्हावा हा त्यामागचा हेतू होता. राष्ट्रीय सिंचन आयोगानेही पाण्याची उपलब्धता कमी असलेल्या खोऱ्यामध्ये दर घनमीटरला अधिकाधिक उत्पादन हाच निकष सुचविला होता. महाराष्ट्राच्या एकूण लागवड क्षेत्राशी आज प्रमाण कमी असले तरी फळबाग, फुलशेती, भाजीपाला, दुभत्या जनावरांना चारा यासारख्या पीक पद्धती रुढ होत आहेत. याचे प्रमाण जसे वाढत जाईल तसे पाण्याची उत्पादकता देखील वाढत जाणार आहे.

**६.२. जमिनीची प्रत व पोत आणि पाणी यांची योग्य सांगड:**

जमिनीची प्रत व पोत लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या पाण्याचा अधिकाधिक उपयोग करुन प्रती एकर अधिक परतावा मिळविण्याचे अनेक प्रयोग मुख्यत्वे करुन अवर्षणप्रवण भागात प्रगतिपथावर आहेत. त्यामुळे जमिनीच्या उत्पादकतेबरोबरच पाण्याची उत्पादकताही वाढत आहे. सीताफळ, बोर, आवळा, डाळिंब यासारख्या फळपीक लागवड मोहिमेने या संदर्भात अधिक मुसंडी मारली आहे. या संदर्भातील एक बोलके उदाहरण येथे देऊ इच्छितो की ज्यामुळे गेल्या वीस-पंचवीस वर्षात तालुक्याचा आर्थिक चेहरामोहरा बदलून टाकला आहे. ते म्हणजे सांगोला तालुक्यातील बोर आणि डाळिंबाची शेती. ऊस, द्राक्ष, केळी या पिकांच्या तुलनेत कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या मूल्यवान नवीन संकरित जातीच्या डाळिंब व बोर फळपीकांची निवड केली. फळधारण प्रक्रियेच्या सहा महिन्यांच्या काळात मोजके पाणी देऊन एकरी रु. एक लाखापासून ते तीन ते चार लाखापर्यंत उत्पन्न मिळविले आहे. आज या शेती व्यवसायापासून तालुक्यात वार्षिक सरासरी रु. २२५ ते २५० कोटीपेक्षा अधिक उलाढाल होत असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**६.३. पाणी देण्याच्या पद्धतीत बदल:**

पिकाला पाणी देण्याच्या पद्धतीत आज जो जाणवण्याइतपत बदल होत आहे तो सर्व पाण्याची कार्यक्षमतेने वापर करण्याकडील वाटचालच आहे. ठिबक, तुषार जमिनीअंतर्गत ठिबक, डियुजर, सेडनेट, प्लास्टिकचे कागद

अंथरुण पीक घेणे अशा अनेक प्रयोगामुळे कितीतरी प्रमाणात पाण्याची बचत होत आहे. म्हणजे पर्यायाने पाण्याची निर्मितीच होत आहे. हे सर्व बाष्पीभवनरोधक उपाय आहेत. या पद्धतीमध्ये पाणी नेमके झाडाच्या अन्न तयार करणाऱ्या मुळापर्यंत पोहोचत असल्यामुळे पाण्याची व जमिनीची उत्पादकता वाढविण्यास मदत होते. काही प्रमाणात शेतीचे उत्पादन खर्चही वाचविता येतात. सुधारित पाणी देण्याच्या पद्धतीमुळे परंपरागत पद्धतीच्या तुलनेत किती पाणी वाचू शकते हे सिंचन अहवालातील एका तक्त्यावरुन लक्षात घेता येईल.

**तक्ता क्र.८**

**निवडक पिकांना सुधारित पध्दतीने पाणी दिल्याने झालेली पाण्याची बचत**

| पिकाचे नाव | उत्पादनात वाढ (टक्केवारी) | पाण्याची बचत (टक्केवारी) |
|---|---|---|
| केळी | ५२ | ४५ |
| द्राक्ष | २३ | ४८ |
| मोसबी | ५० | ६१ |
| डाळिंब | ९८ | ४५ |
| ऊस | ३३ | ६५ |
| कापूस | २७ | ५३ |
| मिरची | ४४ | ६२ |

**६.४. पिकांची पाण्याविषयीची संवेदनशील पहावी:**

पावसाचा हंगाम व पाण्याची उपलब्धता पाहून पिकांची निवड करावी. पिकामध्ये काही कमी संवेदनशील आहेत, तर काही मध्यम संवेदनशील तर काही अतिसंवेदनशील आहेत.

**६.५ इस्राईलचे उदाहरण**

पाण्याच्या व शेतीच्या बाबतीत आपण बऱ्याच वेळा इस्राईलचे उदाहरण देतो. तर त्या राष्ट्राने पाण्याचे अर्थशास्त्र व पाण्याची उत्पादकता या दोन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. तेथील शेतकरी पाण्याची उपलब्धता, त्याचे मूल्य हे लक्षात घेऊनच पीक रचना निश्चित करतो. तेथे पाण्याच्या विविध मागण्यासाठी वेगवेगळे दर आकारले जातात. किंबहुना शेतीला पावसाळ्यात सिंचन प्रकल्पातून पाणी पाहिजे असेल तर वेगळा दर आकारला जातो, तर उन्हाळ्यात वेगळा दर आकारला जातो. बाष्पीभवनाचे प्रमाण कमी करण्यासाठी सुर्योदयाच्या अगोदरच आपल्या शेतातील पिकांना पाणी देतो. भविष्यात कायद्याचा आधार घेऊन यातील काही मार्ग आपल्याला देखील अवलंबावे लागतील. त्यात प्रामुख्याने अवर्षणप्रवण भागात.

१. भर उन्हात पिकांना पाणी देण्यावर बंदी घालणे.

२. पाटाने पाणी देण्याची पद्धत संपुष्टात आणणे.
३. उसासारख्या पिकाचे निसर्गाच्या विरोधात जाऊन शेती करण्यास पायबंद घालणे.
४. हंगामानुसार सिंचन प्रकल्पातील पाण्याचे दर निश्चित करणे.

पर्जन्याधारित किंवा सरितामानाधारित नियोजनावर आता अवलंबून राहणे शक्य नाही. भूजलाचे चलन, बाष्पीभवन, भूपृष्ठातून / भूस्तरातून होणारा झिरपा, पाण्यातील रासायनिक घटकांची विद्राव्यता अशा अनेक गुणधर्मांची नीट माहिती घेऊनच पाण्याचे संख्यात्मक व गुणात्मक नियोजन करावे लागेल. (महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल, खंड १, पृ. ८७,१९९९)

**६.६. जलसाक्षरतेचे प्रमाण वाढविणे:**

पाण्याचे नियोजनबध्द व कार्यक्षमतेने वापर करण्याचे मार्ग अवलंबणे म्हणजे जलसाक्षरता वाढविणे. पाण्याची उपलब्धी व पिकांची संवेदनशीलता यांची योग्य मेळ घालणे, थेट पिकांच्या मुळापर्यंत पाणी देण्याची व्यवस्था अवलंबणे, ज्या-ज्या ठिकाणी बाष्पीभवनाची क्रिया रोखता येईल तेथे ती रोखणे, पाण्याची व जमिनीची उत्पादकता वाढविणे इत्यादी गोष्टी जलसाक्षरतेचे विविध पैलू मानावे. अत्यंत प्रभावीपणे ही मोहीम राबविणे आता काळाची गरज आहे आणि पाण्याची उपलब्धी वाढविण्यामधील हा एक प्रभावी मार्ग वाटतो.

**७. उपसा सिंचनाच्या स्वरुपात काही बदल:**

आज महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या व नियोजित उपसा सिंचन योजना या मुख्यत्वेकरुन समृध्द खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात पाण्याच्या पुनर्वितरणाच्या स्वरुपातील आहेत आणि हे सर्व शासनाच्या मालकीचे आहेत. काळाच्या ओघात या प्रक्रियेत काही प्रमाणात बदल करण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांच्या अर्थशास्त्रा विषयी, लाभ-व्यय-गुणोत्तराविषयी, विजेच्या उपलब्धतेविषयी, पाणी वाहून नेणाऱ्या कालव्यांच्या लांबी व उंचीविषयी अनेक समस्यांवर बरीच चर्चा झाली आहे आणि आजही होत आहे. त्यातून एक सामान्य सूर असा बाहेर पडतो की, विजेच्या पुरेशा उपलब्धतेच्या अभावी या योजना भविष्यात चालू राहणार का ? पाण्याच्या पुनर्वितरणासाठी भविष्यात शासन या प्रकारचे प्रकल्प हिरीरीने हाती घेईल का ? या सर्वांचा विचार करता काळाच्या ओघात या प्रक्रियेत काही प्रमाणात बदल होण्याची आवश्यकता वाटते.

**७.१.उपसा सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्राचे आकारमान लहान करावे:**

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्राच्या नद्यांची व उपनद्यांची खोरी पाहिली तर जिल्ह्याचे क्षेत्र विविध उपखोऱ्यामध्ये विस्तारलेले आहे, पण तालुक्याचे बहुतांश क्षेत्र एकाच मोठ्या खोऱ्यात आहे. त्यामुळे पाण्याच्या नियोजनामध्ये "तालुका" हा नैसर्गिक रचनेचा असलेला घटक दिसतो. तेव्हा सिंचन प्रकल्पाचे लाभ क्षेत्र यापुढे तालुका हा घटक मानून तयार करण्यात यावे. म्हणजे समान पाणी वाटपाचे न्यायतत्त्व अमलात आणण्यास सोपे होईल.

तालुका या घटकाबरोबरच पहिल्यांदा गाव हा घटक (क्षेत्रफळ) मापदंड मानावा. महाराष्ट्रात साधारणपणे एका तालुक्यात सरासरीने १२५ गावे येतात आणि एक-एका गावाचे सरासरी क्षेत्रफळ (ढोबळमानाने) ८०० हेक्टर इतके आहे. तेव्हा सिंचन प्रकल्पाचा आराखडा तयार करीत असतांना पहिल्यांदा क्षेत्र निवडावे, नंतर व्यक्तिसमुहाला प्राधान्य द्यावे व त्यानंतर व्यक्तीकडे यावे.

**७.२.पाण्याचा ताळेबंद मांडणारे नकाशे तयार करावेत:**

गाव, तालुका व जिल्हा (पर्यायाने खोरे) हे क्षेत्र मापदंड मानून सर्वात अगोदर पाण्याचा ताळेबंद मांडणारे नकाशे तयार व्हावेत. ग्रामपंचायतीच्या हद्दीत दरवर्षी पावसाच्या माध्यमातून मिळणारे पाणी आणि छोट्या ओघळी, नाल्याद्वारे खेडयांची हद्द ओलांडून बाहेर पडणारे पाणी याचा अंदाज घेण्यात यावा. या पद्धतीने तालुक्याचे, जिल्ह्याचे व पर्यायाने राज्याच्या पाण्याचा नकाशा तयार करुन पाण्याची नैसर्गिक आवक मांडावी.

प्रस्तुत नकाशाच्या आधारे संपूर्ण गावाला हे समजून येईल की, आपल्या हद्दीतील पावसाचे पाणी आपली हद्द ओलांकडून कोणत्या दिशेनी व किती प्रमाणात बाहेर जात आहे. तेव्हा पहिल्या टप्प्यात यातील बहुतांश पाणी अडवून, जिरवून व उचलून त्या प्रदेशाची तेवढ्या प्रमाणातील पाण्याची भूक भागवावी.

**७.३. पाणी अडवा व पाणी उचला हे धोरण राबवावे:**

खोऱ्यांचा आकार नेहमी तव्यासारखा असतो. कडेच्या उंचवट्यावरील पावसाचे पाणी वाहून खालच्या स्तरावर असलेल्या मुख्य नदीच्या प्रवाहात जाऊन मिसळते. म्हणजेच तुटीच्या खोऱ्यातील पाणी विपुलतेच्या खोऱ्याकडे वाटचाल करते. तेव्हा पहिल्या टप्प्यात पाण्याचा हा प्रवास थांबवावा. जागोजागी पाणी उचलून त्या त्या भागातील पाण्याचे साठे भरावेत. हे सर्व छोट्या आकाराचे प्रकल्प राहतील. लांबी आणि उंची कमी राहील. अशा प्रकारच्या उपसा सिंचन प्रकल्प तयार करुन सहकारी तत्त्वावरील उपसा सिंचनाचे गट तयार करुन त्यांना देखभाल व कर वसूल करण्याची जबाबदारी सोपवावी. तेव्हा तुटीच्या खोऱ्यातील सर्व पाणी गावपातळीवर तिथल्या तिथे अडविण्याची प्रक्रिया प्राधान्याने हाती घ्यावी. या प्रक्रियेत पाणी अडवा व पाणी जिरवा या लोकप्रिय मोहिमेच्या जोडीला पाणी अडवा व पाणी उचला ही संकल्पना आता अधिक प्रमाणात लोकमानसात रुजविण्याची आवश्यकता आहे. महत्त्वाचे म्हणजे अवर्षण प्रवण भागात हे पाणी अडवून उन्हात वाळत टाकण्याचे स्वरुप त्याला प्राप्त होता काम नये. बाष्पीभवनाचे प्रमाण जितके कमी करता येतील तितके कमी करण्याचे सर्व उपाय येथे योजावे लागतील.

**७.४. लोकांचा सक्रिय सहभाग वाढविणे:**

या संदर्भात लाभार्थ्यांना या प्रक्रियेत सामील करुन घ्यावे. भौगोलिक रचनेचा अंदाज घेऊन सलग प्रवाही पध्दतीने पाणी देता येईल अशा जमिनीच्या शेतकऱ्यांचा लहान गट तयार करुन त्या गटाच्या प्रदेशाच्या उंच भागावर उचल पाणी आणून सोडावे वा साठे भरुन घ्यावेत. या गटाची कायदेशीर नोंद करुन घ्यावी व पाणी वापराच्या संदर्भात करारही करुन घ्यावेत. या योजनेत आस्थापना खर्च शासनाने करावा व नंतरचा आवर्ती खर्च लाभार्थ्यांनी करावा. येथे पाण्याचे मोल लाभार्थ्यांना कळले पाहिजे. नाहीतर पाण्याचे अर्थशास्त्र, पाण्याची उत्पादकता या संकल्पना कृषी उत्पादन प्रक्रियेत सक्रीय होणार नाहीत.

सार्वजनिक स्वरुपातील साठे वा तळी भरली की, त्यानंतरचा पाणी उचलण्याचा खर्च सोसण्यासाठी सहसा लाभार्थी तयार होत नाहीत व नंतर त्याचे देखभालीचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न तयार होतात. याचे मुख्य कारण म्हणजे या मध्ये लाभार्थी निश्चित व दृश्य स्वरुपात नसतो. या भावनेतून तो त्या प्रकल्पाविषयी आपली

जबाबदारी उचलण्यास तितकासा राजी नसतो.

अवर्षणप्रवण भागात अनेक ठिकाणी असे पहावयास मिळते की, बंधाऱ्याच्या शेजारी वा जिथे अधिक पाणी झिरपते त्या ठिकाणी विहीर खोदून १० ते १५ कि.मी. पर्यंत स्वखर्चाने पाणी नेणारे अनेक शेतकरी पुढे येऊ लागले आहेत. तेव्हा परिसरातील तळी व मोठे पाण्याचे साठे भरुन झाल्यानंतर या शेतकऱ्यांना स्वखर्चाने पाणी उचलण्यास प्रवृत्त करावे.

**७.५.शेततळी योजनेला अधिक प्रोत्साहन मिळावे:**

लोकांच्या सक्रीय सहभागातील हा एक महत्त्वाचा प्रकल्प मानावा. या योजनेला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाल्यास शेतकऱ्यांच्या शेताजवळील ओढ्या-नाल्यातील पाणी अडवून ते भरुन घेणे सोपे होईल. खर्च कमी येईल, १० ते २० शेतकऱ्यांचा एक गट करुन पावसाळ्यात महिना-दीड महिना वाहणाऱ्या ओढ्या-नाल्यातून ही तळी भरुन घेतल्यास उपसा सिंचनाविषयीचा शासनावरील ताण तेवढ्या प्रमाणात कमी होईल. लाभार्थी दृश्य स्वरुपातील असल्यामुळे करआकारणी व वसुली सोपी होईल.

**८. पाण्याशी निगडित नसलेल्या पर्यायांना प्राधान्य:**

महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने अवर्षण प्रवण भागासाठी सुचविलेली एक महत्त्वाची शिफारस म्हणजे महाराष्ट्राच्या सिंचन विकासाचा जेव्हा संकलित आराखडा तयार होतो तेव्हा प्राकृतिक रचनेमुळे काही तालुक्यांना आत्यंतिक अनुकूलता तर काहींना आत्यंतिक प्रतिकूलता आहे. सिंचनात आर्थिक लाभ-व्ययाचाही प्रश्न असल्यामुळे अशा सर्व अवघड जागेतल्या तालुक्यांना सिंचनाच्या संदर्भात एकाच पातळीवर आणणे शक्य होईल असे वाटत नाही. त्यासाठी आर्थिक समृद्धीचे व विकासाचे पाण्याशी निगडित नसलेले पर्याय प्राथम्याने योजावे लागतील. या संदर्भातील दोन-तीन बोलकी उदाहरणे आपल्यासमोर ठेवतो.

पाण्याने समृद्ध असलेल्या प्रदेशातच (उदा.कोल्हापूरसारखे) दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात रुजल्याचे आपल्यासमोर चित्र होते, परंतु आज दुष्काळी भागात देखील या व्यवसायाने भरीव प्रगती केली आहे. वर्षाकाठी रु. १२५ कोटी पेक्षा अधिक उलाढाल करणारे दुष्काळी भागातील काही तालुक्यांचा (सांगोला) अनुभव आपल्या समोर आहे. जेमतेम स्वरुपात मिळणाऱ्या पाण्यापासून भुसार पिके घेण्याऐवजी दुभत्या जनावरांना चारा तयार करुन अधिक मिळकत मिळविण्याची व्यवस्था निर्माण केली. पाणी वापरात बदल करुन पाण्याची उत्पादकता वाढविली. तेव्हा पाणी नसतांना देखील भरीव रोजगार व उत्पादन निर्माण करणाऱ्या अशा व्यवसायाला त्या-त्या ठिकाणी प्रोत्साहन मिळावे.

पाण्याला पर्याय म्हणून अवर्षण भागात सूतगिरण्यांसारखे अनुकरणीय आर्थिक प्रयत्न दुष्काळी भागात आहेत. एकाच तालुक्यात ५-६ सूतगिरण्या निघतात. हजारो कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करतात. मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवून देतात आणि उत्पादन व उत्पादकतेत देश पातळीवर नाव कमवितात. निसर्गातील हवामानाचा वापर करुन आर्थिक घडामोडीचे केंद्र बनत असल्याची (द्राक्षापासून मनुके तयार करणे) काही उदाहरण दुष्काळी भागात आहेत.

**९. निष्कर्ष:**

सिंचनाची सुविधा ही ग्रामीण जीवनातील विषमता वाढविणारा घटक आहे. अवर्षणप्रवण

क्षेत्रात सिंचनाच्या आधारे शेतीला किमान आर्थिक स्थैर्य येईल व तसे होत असतांना विषमता मात्र कमीत कमी राहील या दृष्टीने उपलब्ध मर्यादित पाण्याचे शेतीसाठी विस्तृत क्षेत्रावर वाटप होणे आवश्यक आहे. प्रारंभी केवळ अन्नधान्य उत्पादनासाठी संरक्षण देण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या सिंचनाच्या व्यवस्थेकडून आता सर्वंकष ग्रामीण अर्थव्यवस्थेची फेरजुळणी, सामाजिक व आर्थिक परिवर्तनामधून होऊ लागलेली आहे. (महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल, खंड १, पृ.८, १९९९) तुटीच्या व अतीतुटीच्या उपखोऱ्याकरिता करावयाच्या कार्यवाहीचे स्वतंत्र निकष या अहवालात सुचविले आहेत. त्यांची प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे.

सिंचन प्रकल्पाचा आराखडा तयार करीत असतांना आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता स्थापत्य अभियंत्यांचा वाटा मोठा असतो आणि तो स्वाभाविकही आहे, परंतु सिंचन प्रकल्प हळूहळू आंतरशाखीय (Interdisciplinary) विषय बनत असल्याने त्याचा आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत अर्थतज्ज्ञ, पर्यावरणाचे अभ्यासक, कृषितज्ज्ञ, हवामानशास्त्रज्ञ आदी समाजातील इतर घटकांची देखील मदत व मते घ्यावीत.

शेतमालाच्या प्रत्यक्षातील किमती, त्याविषयक शासनाचे धोरण, शेतीचे व्यवस्थापन या प्रक्रियेत अजुनही पाण्याची उत्पादकता ही संकल्पना अस्पष्टच वाटते. तेव्हा शेतमालाच्या उत्पादन प्रक्रियेत पाण्याची उत्पादकता याचे एक पक्के स्थान निश्चित व्हायला हवे.

महाराष्ट्रात पाणी वाटपाचा क्रम पिण्यासाठी, सिंचनासाठी आणि उद्योगासाठी असा ठरविण्यात आला आहे. या कायद्यानुसार विपुलतेच्या खोऱ्यात पाण्याच्या पुनर्वाटप प्रक्रियेत फारशी अडचणी येण्याचे कारण नाही, परंतु तुटीच्या व अतितुटीच्या खोऱ्यात कारखानदारी वाढीसाठी या नियमामुळे अडचणी निर्माण होतील. तेव्हा या संदर्भात राज्यभर एकच नियम न करता त्या-त्या खोऱ्यातील जनतेच्या मागणीचा विचार करुन कायद्याला खोरेनिहाय स्वरुप देण्याविषयी फेरविचार व्हावा.

वरील विचार मांडण्यात पुढीलप्रमाणे मान्यवर व्यक्तींशी झालेली चर्चा, मुलाखत, संदर्भग्रंथ व इतर प्रकाशने यांची मोलाची मदत झाली.

१) मा. आ. चितळे (अध्यक्ष, महाराष्ट्र जल व सिंचन आयोग)
२) दि. मा. मोरे (सचिव, महाराष्ट्र जल व सिंचन आयोग)
३) विजय जोगळेकर (सिंचनविषयक अभ्यासक)
४) प्रगतीशील, प्रयोगशील व अनुभवी शेतकरी
५) महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, अहवाल (पाच खंड) १९९९
६) ६ वी महाराष्ट्र सिंचन आयोग परिषद, अवर्षण प्रवण क्षेत्रातील जल व्यवस्थापन (शोधनिबंध संच) २००५
७) अर्थसंवाद
८) कृष्णा कोयना उपसासिंचन योजनेचा आराखडा
९) सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रीया संघ मर्या. सोलापूर, २९ वा वार्षिक अहवाल, २०१०-११
१०) शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या. सांगोले, ३२ वा वार्षिक अहवाल, २०१०-११
११) शेतकरी महिला सहकारी वस्त्रनिर्माण सूतगिरणी मर्या., सांगोले, १७ वा वार्षिक अहवाल २०१०-११

# भारतातील दारिद्र्यः एक ऐतिहासिक दृष्टिकोन

**रावसाहेब जाधव**, गुहागर
प्राचार्य, पाटपन्हाळे महाविद्यालय, जिल्हा रत्नागिरी
आजीव सदस्य क्र. १२९३
भ्रमणध्वनी: ९४२११२३५९४०

**प्रस्तावनाः**

दीर्घकाळाचा विचार करता अर्थशास्त्रज्ञ व सामाजिक विचारवंतांमध्ये दारिद्र्याच्या प्रमुख कारणाबाबत सातत्याने मतभेद राहिलेले आहेत. दारिद्र्य उद्‌भवण्याच्या प्रमुख कारणाबाबत विचारवंतांमध्ये मतैक्य नसल्याने भारतात योजना कालावधीमध्ये दारिद्र्य निवारण्यासाठी प्रभावी उपायांचा अवलंब होऊनसुध्दा दारिद्र्याची तीव्रता फारशी कमी झालेली नाही. त्यामुळे दारिद्र्य निवारण्याची संभाव्य उपाययोजना अधिक प्रभावी व्हावी ह्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने ऐतिहासिक दृष्टीकोनातून दारिद्र्याचे प्रमुख कारण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. शोधनिबंधात निसर्ग अवस्था, प्राचीन कालावधी, मध्ययुग व ब्रिटीश तसेच स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर कालावधीचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्येः

१. दारिद्र्याच्या स्थितीबाबत ऐतिहासदृष्ट्या आढावा घेणे.
२. दारिद्र्याचे प्रमुख कारण शोधणे.
३. दारिद्र्य निवारण्याच्या संभाव्य उपाय सूचविणे.

## संशोधन पध्दतीः

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना संशोधकाने निसर्ग अवस्थेपासून जागतिकीकरणाच्या कालावधीपर्यंत दारिद्र्याचा आढावा घेण्यासाठी विविध प्रकाशित साहित्यांचा-(संदर्भग्रंथ) दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेतला आहे.

गृहिते:

१. भारतातील मानवी मूल्यातील घसरण हे दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

२. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता भारतामध्ये मानवी मूल्यात घसरण झाली आहे.

३. दारिद्र्य निवारणासाठी मूल्याधिष्ठीत धोरणाचा अवलंब आवश्यक आहे.

वरील पार्श्वभूमीवर भारतातील दारिद्र्याचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून विविध टप्प्यातून आढावा घेतला आहे.

## १) निसर्ग अवस्था:

मानवी जीवनातील संक्रमण-विकासाबरोबर उद्भवलेली दारिद्र्य ही एक आर्थिक घटना आहे. निसर्ग अवस्थेमध्ये पृथ्वीवर होत असलेले उत्पादन सामान्यतः सर्वांच्या निर्वाहासाठी होते. सर्वांच्या उदरनिर्वाहाची काळजी निसर्गानेच घेतली होती. सर्वांची जोपासना हे त्या कालावधी मधील मूल्य होते. सामाजिक कराराच्या माध्यमातून समाजाची स्थापना झाल्यानंतर माणसाच्या मालमत्तेचे रक्षण करणे[१] हाच कराराचा प्रधान हेतू होता. त्यामुळे जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला निर्वाहाचा नैसर्गिक हक्क होता. त्याला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या कॅलरीज पुरविण्याची जबाबदारी निसर्ग अवस्थेत घेतली होती. जॉन लॉकने प्रतिपादन केल्याप्रमाणे, देवाने मानवाच्या मूलांना पृथ्वी दिली.

त्यामुळे पृथ्वी सर्वांच्या हक्काची आहे. पृथ्वीवर मानवाने निर्माण केलेली मालमत्ता, ही सुध्दा परमेश्वराने सर्वांना समान तत्त्वावर दिलेली आहे. कारण त्या मालमत्तेवर कराराच्या आधी सर्वांचे समान अधिकार होते. सामाजिक करारापूर्वी त्या मालमत्तेवर सर्वांचा नैसर्गिक हक्क होता. लॉकच्या मते, पृथ्वी आणि तिचे उत्पादन परमेश्वराने सर्वांना सामान्य वापरासाठी दिलेले आहे. त्यामुळे पृथ्वीवर सर्वांचा हक्क आहे. त्यामुळे तिच्यावर निर्माण करण्यात आलेल्या उत्पादनावरसुध्दा सर्वांचा समान हक्क आहे. कारण ती निसर्गाची निर्मिती आहे.[२] त्यातून असे स्पष्ट होते की, निर्वाहाचा नैसर्गिक हक्क हे त्या परमेश्वर निर्मित पध्दतीने प्रमुख वैशिष्ट्य होते. जगण्यासाठी पुरेशा प्रमाणात अन्नधान्य व इतर घटकांची आवश्यकता असते. त्यामुळे निसर्ग अवस्थेत निर्वाहाकरिता अन्नाचा हक्क मान्य केला होता. ते एक मूल्य म्हणून स्वीकारले होते आणि त्याची जोपासना करण्याची जबाबदारी राज्यावर होती. माणसाची मूलभूत मालमत्ता म्हणजे तो स्वतः आणि त्याच्या श्रमाचे फलीत. निसर्ग अवस्थेत मालमत्ता असुरक्षित झाल्याने समाज निर्माण झाला. हेच सामजिक कराराचे प्रधान कार्य होते.[३] लोकांचा जगण्याचा नैसर्गिक हक्क किंवा त्यांचा निर्वाह टिकविण्यासाठीच समाज किंवा राज्य निर्माण करण्यात आले. लोकांच्या निर्वाहाची जबाबदारी राज्यास झिडकारता येणार नाही. कारण गरीबांच्या किमान गरजा पुरविण्याचे बंधन राज्यावर आहे. व्यक्तीचे रक्षण केले जाईल, ह्या अटींवर मूळ सामाजिक करारावर लोकांनी स्वाक्षऱ्या केलेल्या होत्या. निर्वाहाबरोबरच इतर स्वातंत्र्य अबाधित राहिल याची लोकांना खात्री होती. पल्पसच्या मते सामाजिक कराराच्या वेळी लोकांनी करारात दारिद्र्य व अतिव विषमता मान्यता केलेली नाही. त्याच्या मते लोकांना मूळ सामाजिक करारात दिलेले काही हक्क राज्याचा प्रमुख हिरावून घेऊ शकत नाही.[४]

यावरुन असे स्पष्ट होते की, लोकांचा निर्वाहाचा हक्क त्यांच्यापासून कधीही काढून घेता येणार नाही. त्यामुळे निसर्ग अवस्था व त्यानंतर सामाजिक करार झाल्यानंतरच्या कालावधीत लोकांचा निर्वाह टिकवून ठेवणे किंवा जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न हा एक नैसर्गिक हक्क किंवा मानवी मूल्य म्हणून राज्याकडून त्याची जोपासना व्हायची. त्यामुळे समाजात दारिद्र्याचे निवारण झाले होते.

## २) प्राचीन काळ:

प्राचीन काळात दारिद्र्य अस्तित्वात होते, मात्र उपासमारीसारखया त्याच्या विपरित परिणामाची काळजी त्या काळातील मूल्य व्यवस्थेने घेतली होती. समाजात कोणीही उपाशी किंवा भुकेले राहणार नाही हे त्या काळातील मूल्य होते. त्यामुळे समाज उपासमार किंवा दारिद्र्यापासून मुक्त होता. अशा प्रकारची मूल्यव्यवस्था रामायण, महाभारत काळात अस्तित्वात होती. तथापि, जातीव्यवस्था व गुलामगिरीमुळे समाजातील दुर्लक्षित घटक किंवा गरिबांची पिळवणूक होत असे. मात्र समाजातील प्रत्येक सदस्यांच्या निर्वाह गरजांची काळजी घेतली जायची. अर्जुनदास या विचारवंताने रामायण, महाभारत, मनुस्मृती, कौटिलिय अर्थशास्त्राचा संदर्भ देऊन म्हटलेले आहे की, प्राचीन काळात सामाजिक व आर्थिकदृष्ट्या भारत अत्यंत प्रभावशील, चिरंतन, संपन्न व प्रगतीशील असा देश होता. यज्ञासारखा त्यागाचा एक सामान्य प्रकार होता. त्यात केवळ आध्यात्मिक दृष्टीकोनच नाही तर आर्थिक बाजू सुध्दा होती. रोख रक्कम, अन्नधान्य वगैरेचे दान केले जायचे.[५] आर्थिक नियमापेक्षा नैतिक मूल्यावर व्यवस्था आधारलेली होती. वितरणाच्या बाबतीत सुध्दा आर्थिक तत्त्वापेक्षा नैतिक मूल्याचा दर्जा मोठा होता. प्रत्येक व्यक्तीला त्याचा वाटा वापरण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते आणि त्याची अतिरिक्त रक्कम समाजातील दुर्लक्षित घटकांच्या अस्तित्त्वावर खर्च व्हायची, त्यातून संपत्तीचे समान वितरण व्हायचे. भगवद्गीतेमध्ये सुध्दा याबाबतचा उल्लेख आहे. मनूने सुध्दा कामगारांना त्याच्या पगाराशिवाय प्रत्येक महिन्याला धान्य द्यायला हवे असे म्हटले. वेतन निश्चितीमध्ये सामाजिक न्याय व मानवतेचा विचार केलेला होता. खासगी मालमत्तेबरोबर समानता हे त्या व्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. प्राचीन काळातील विचारवंतांनी विषमतेचे निवारण करण्यासाठी देणगी किंवा दान ही संकल्पना प्रतिपादन केली होती. दान किंवा देणगी याबाबत सिध्दांत होता. त्यानुसार गरिबीचे निवारण व्हायचे. कायदे करुन दारिद्र्याचे निवारण होणार नाही तर दारिद्र्याच्या निवारण्यासाठी सामाजिक सहकार्य आवश्यक असल्याचे तत्कालीन विचारवंतांना मान्य होते. त्यामुळे गरीब गरजूंसाठी दान व्यवस्था अस्तित्वात होती. आर्थिक विषमता चिरंतर राहील त्यामुळे श्रीमंतांनी सामाजिक दुर्बल घटकाकरिता स्वेच्छेने त्याग करावा. कररुपाने दिलेल्या रकमेतून उपासमारीत असलेल्या लोकांना जगविणे आवश्यक आहे असे विचारवंतांनी प्रतिपादन केले. प्राचीन काळातील सरकारची भूमिका समाजकारणातून निर्माण झाली. महत्तम सामाजिक हित साध्य करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. महाभारतामध्ये सुध्दा गरिबांचे रक्षण व त्यांना मदत हे सरकारचे कर्तव्य मानले आहे. अनाथांना सरकारने जगविले पाहिजे असे कौटिल्याचे मत होते. त्याच्यामध्ये सामाजिक सुरक्षेसाठी सामाजिक उपाययोजना करणे ही केवळ सरकारचीच

जबाबदारी नाही, तर ते समाजाच्या प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे. निराधार व असक्षम लोकांच्या बाबतीत सरकारने जबाबदारी मान्य केली होती. वृध्द व गरीब लोकांना मदत व त्यांचे संरक्षण हे सरकारने आपले कर्तव्य मानले होते. लोकांच्या कल्याणकारी कामासाठी राजाच्या व्यक्तीगत जीवनाचे विनीयमन करण्यात आले. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था आणि न्यायाचे प्रशासन याबरोबरच लोकांच्या आर्थिक व नैतिक जीवनाचा मार्गदर्शक म्हणून राजा कार्य करत असे. राजा समाजाचा विश्वस्त होता. कौटिल्याच्या मते रॉयल किचन हा सार्वजनिक खर्चाचा एक घटक होता. शुक्राच्या मते साधारणत: ८.७५% सरकारचे उत्पन्न विश्वस्त व दान व्यवस्थेवर खर्च होत असे. त्यामध्ये त्याग, धार्मिक कामगिरी, गरीबांना मदत यावरील खर्चाचा समावेश होता. एकंदरित नैतिक व आर्थिक मूल्ये व्यवस्थेत स्वीकारलेली असल्याने ती व्यवस्था अत्यावश्यक तत्त्वावर आधारित होती.[६] त्यामुळे कोणीही भुकेला असल्यास त्याच्या निर्वाहाची काळजी समाजाने घेतली होती. दारिद्र्य निवारण झाले होते. वरील सर्व स्पष्टीकरणावरुन असे म्हणता येईल की, प्राचीन काळात दारिद्र्य होते, मात्र राज्य कारभार व समाजव्यवस्थेत प्रचलित मूल्यांचा स्वीकार केलेला असल्याने दारिद्र्याचे निवारणही झालेले होते.

### ३) मध्ययुगीन कालावधी:

प्राचीन काळातील संस्कृती फार मोठ्या प्रमाणात टिकवून ठेवण्याचे कार्य मध्ययुगीन काळात हिंदू व मोगल राजांनी केले. दारिद्र्य अस्तित्वात होते, मात्र मूल्य व्यवस्थेने कमी अधिक प्रमाणात त्याचे निवारण केले होते. समाजातील सर्वजण परमेश्वराची लेकरे आहोत या विश्वासावर सर्वांच्या निर्वाहासाठी अन्न-असे नीतिमूल्य आणि दान व्यवस्था ह्यासारखी प्राचीन काळात असलेली व्यवस्था या मध्ययुगीन काळात सुध्दा होती. त्यामुळे समाजातील लोकांच्या जीवन आवश्यकतांची सामुहिक तरतुद असल्याने दारिद्र्याची काळजी घेतली होती. उदाहरणार्थ, मध्ययुगीन काळातील अनेक राजांनी अन्नछत्र व लोकांसाठी विश्वस्त व्यवस्था चालवता याव्यात म्हणून मंदिरे व धार्मिक सदस्यांना अनुदाने दिलेली आहेत. सरकार किंवा राजाचा तो एक नैतिक व आर्थिक व्यवहार होता. थोडक्यात[७] दारिद्र्य अस्तित्वात होते मात्र त्याचा विपरित परिणाम-उपासमारीची समाजात प्रचलित असलेल्या मूल्य व्यवस्थेने काळजी घेतली होती.

### ४) ब्रिटीश कालावधी:

ब्रिटीश कालावधीत भारताच्या मूल्य व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाले. निर्वाहापासून नफा प्राप्तीसाठी माणसा-माणसात स्पर्धा सुरु झाली. समाजातील साधनसामग्री सर्वांच्या निर्वाह आवश्यकता ऐवजी अमर्याद गरजांचा पाठलाग करण्यासाठी संक्रमित झाली. त्याचा परिणाम म्हणून दारिद्र्याची तीव्रता फार वाढली. भारतात ब्रिटीश कालावधीमध्ये संपत्तीचा संचय करु इच्छिणाऱ्या लोकसंख्येच्या नवीन वर्गास प्रोत्साहन देण्यात आले. निर्वाह आवश्यकता पुर्तीधिष्ठीत अर्थव्यवस्थेचे नफाप्रेरीत अर्थव्यवस्थेत रुपांतर झाले. त्याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांचा वर्ग आणि खासगी मालमत्तेच्या अधिकारास मूर्त स्वरुप आले. त्यामुळे सामाजिक चालीरीती लोप पावल्या आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पृथ्वीच्या

उत्पादनावरील सर्व सदस्यांचा दावा अमान्य करण्यात आला. क्रमशः मूल्यात अशा रीतीने बदल झाले ज्यामध्ये निर्माण झालेले उत्पन्न जीवनाच्या आवश्यकता पूर्ती ऐवजी अमर्याद गरजांचा पाठलाग करण्यासाठी वापरले जावू लागले.[७] यामुळे नैसर्गिक निर्वाह अवस्था अमान्य झाली. विज्ञान व तंत्रज्ञानातील विकासाबरोबरच नवीन औद्योगिक रचना निर्माण होवून समाजाची नव्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय जडणघडण झाल्याने मूल्य व्यवस्थेत बदल झाला. त्यामुळे दारिद्र्याची तीव्रता वाढून ती एक भारतीय अर्थव्यवस्थेची नियमित समस्या म्हणून पुढे आली.

### ५) स्वातंत्र्योत्तर कालावधीः

स्वातंत्र्यानंतर भारतात स्वतंत्र राज्यघटना (सामाजिक करार) तयार करण्यात आली. समस्यांचे निवारण करण्यासाठी राज्याची मार्गदर्शक तत्त्वे त्यामध्ये समाविष्ट झाली. आर्थिक नियोजनाबरोबरच लोकशाही समाजवाद व मिश्र अर्थव्यवथेचा स्वीकार केला. त्याद्वारे समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे ठरले. दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले. मात्र सरकारने अवलंबिलेल्या कल्याणकारी धोरणाचा परिणाम म्हणून मृत्यूदर घटल्याने दारिद्र्याची समस्या अधिकच गंभीर बनली. तथापि ह्या सर्व प्रयत्नात मूल्य व्यवस्थेकडे फारसे लक्ष न दिल्याने दारिद्र्य निमुर्लनास अपयश आले. योजना कालावधीत सरकारने अनेक वेतन, स्वयंरोजगार व कल्याणकारी कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. त्यातून उत्पन्न निर्मिती सुध्दा बऱ्यापैकी झाली. पण लाभार्थींनी वाढीव उत्पन्न उष्मांक पातळी किंवा जीवनमान उंचावण्यास खर्च करण्याऐवजी अनेकांनी मादक पदार्थांच्या सेवनावर नियमितपणे वाढीव उत्पन्न खर्च केल्याने कार्यक्रमांचा फारसा प्रभावीपणा राहिला नाही.[९] जागतिकीकरणाच्या काळात तर भारतीय अर्थव्यवस्था अधिक अंशाने भांडवलशाही प्रणाली समान बनल्याने दारिद्र्याची समस्या अधिकच गंभीर झाली.

### ६) मूल्यांची घसरण(दारिद्र्याचे मूलभूत कारण):

समाजाच्या निर्मितीपासून संपूर्ण मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये समाजात दारिद्र्य होते. मात्र दारिद्र्याच्या विपरीत परिणामाची काळजी त्या-त्या काळातील मूल्य व्यवस्थेने घेतली होती. विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती आणि त्यामुळे प्रस्थापित झालेली नवीन औद्योगिक रचना आणि त्यातून समाजाची झालेली आर्थिक, सामाजिक व राजकीय जडणघडण यामुळे मूल्य व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाला. सध्या प्रचलित असलेले कोणतेही मूल्य दारिद्र्याची काळजी घेवू शकत नाही. तसेच प्राचीन काळात अस्तित्वात असलेली मूल्य व्यवस्था सुध्दा आपण आज पुन्हा आणू शकत नाही. मात्र आपल्यासारख्या लोकशाहीप्रधान व कल्याणकारी व्यवस्थेमध्ये दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी सरकारच्या अंदाजपत्रकात मूल्यांचा स्वीकार करणे शक्य आहे.[१०] स्विडीश अर्थशास्त्रज्ञ गुन्नार मिड्रासच्या मते, समाजाला दारिद्र्यातून बाहेर काढायचे असेल तर अधिकाधिक समानता प्रस्थापित करणे आवश्यक ठरते.[११] दारिद्र्याच्या बाबतीत चांगली कामगिरी केलेल्या देशासंदर्भात अमर्त्य सेन यांनी असे प्रतिपादन केले आहे की, अशा देशामध्ये

उत्पन्नाचे मानवतावादी विवरण केलेले असते.[१२] गुणवत्ता वस्तूंची तरतूद, समानता, उत्पन्नाचे मानवतावादी विवरण वगैरे मूल्याधिष्ठीत व्यवस्थेचे महत्त्वाचे घटक आहेत. अशा स्वरुपाच्या व्यवस्थेची स्वतंत्रपणे उकल करता येईल. सारांश भारतीय अर्थव्यवस्थेत मूल्यांची झालेली घसरण हे एक दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

## निष्कर्ष:

१) मानवी समाजाच्या निर्मितीपासून प्राचीन मध्ययुगीन काळापर्यंत भारतात मानवी मूल्याधिष्ठीत व्यवस्था होती. मूल्य व्यवस्थेने दारिद्र्याची काळजी घेतली होती.

२) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती व औद्योगिकीकरणामुळे समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय रचना बदलल्याने मूल्याची घसरण झाली.

३) मूल्यांची घसरण हे भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे.

४) भारत सरकारने दारिद्र्य निमूलनासाठी अंदाजपत्रकाद्वारे मूल्य व्यवस्थेचा स्वीकार केलेला नाही.

५) प्राचीन काळातील मूल्यव्यवस्था परत निर्माण करता येणार नाही. मात्र अंदाज पत्रकामध्ये मूल्यांचा स्वीकार करुन भारतातील दारिद्र्याची तीव्रता कमी करणे शक्य आहे.

## संदर्भ:


1. माणसाचा उदरनिर्वाह व त्याच्या संपत्तीचे रक्षण.
2. Locke, J. 1946, *"An essay concerning the True original extent and the end of the Civil Government"*, In Backer, S. E, (ed.), Social Contract, Essays by Locke, Hume and Rousseau, Oxford University Press, P. P. 23.
3. Backer, S.E. 1946 : *'Social Contract : Essays by Locke, Hume and Rosseau'*, Oxford University Press, P. P. 23 - 42.
4. Masgrave R. A., *'The Theory of Public Finance: A study in Public Economy'*, Mcgraw Hill, Kogakusha Ltd., Tokyo P.P. 65.
5. Phelps, E.S. 1973 : *'Economic Justice'*, Penguin Education, Australian Limited, Ringwood, P. P. 21.
6. Arjuna Was 1986 : *'Economic Philosophy of Ancient India'*, Agam Kala Prakash an, Delhi P. P. 3 - 186.
7. Kurein, C.T. 1978, *'Poverty, Planning & Social Transformation'*, Allied Publications Private Limited, New Delhi P.P. 08. As he says, it is that system in which values are central to solve economic problems, efforts are made in this system to meet survival needs rather than unlimited wants.
8. Kurein, C.T., Chapter IV : *'The Dynamics of Development'*, especially P. P. 57 - 61. Also see for changing values, Jain, M. K. 1989 : Rural Banks and Rural Poor, Printwell Publishers, Jaipur, P. P. 36.

9. Tobin, J. 1970: *'On limiting the Domain of Inequality'*, in Phelps, E.S. (ed), 1973: Economics Justice, Perjuin Education, Australian Limited, Ringwood, P.P. 460. NIRD, 1985, summaries of studies conducted in 1984-85, P.P. 34-36.
10. Masgrave R. A. P.P. 67-68.
11. Khan & Lee (ed), 1984, *'Poverty in Rural Asia'*, ILO, Bangkok, P.P. 08.
12. Sen A. 1982: *'An Essay on Entitlement and Deprivation'*, Oxford University Press, New Delhi, P.P.08.



National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

# अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२१४
मो.९०११३३९१०६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# मानव संसाधन विकासातील आधुनिक प्रवाह

शरच्चंद्र छापेकर, जळगाव
मू. जे. महाविद्यालय.
आजीव सभासद क्र. ४६३
भ्रमणध्वनी: ९८२३२६७२२५

जागतिकीकरणाच्या आजच्या संदर्भात औद्योगिक संघटनांची भूमिका बदलली आहे. गुणवत्ता, दर्जा आणि सर्वोत्कृष्टता ही वैशिष्ट्ये असणाऱ्या संघटना आज केवळ आजच्या स्पर्धेच्या परिस्थितीत टिकून राहू शकतात. ही वैशिष्ट्ये विकसित करावयाची तर त्यांनी आपल्या कार्यपध्दतीत बदल करणे आणि व्यवस्थापनाने जागतिक दृष्टिकोनाचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे.

सर्वोत्कृष्टतेचा ध्यास घेऊन जागतिक स्पर्धेत सातत्यपूर्ण वाटचाल करण्यासाठी आधुनिक उद्योग व्यवसायांजवळ केवळ एकमेव पर्याय आहे आणि तो म्हणजे त्यांच्याजवळ असणाऱ्या मानव संसाधनांचा विकास. मानव संसाधन विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून संघटनेजवळ असणाऱ्या मनुष्य बळाच्या व्यक्तिगत आणि सांघिक विकासाच्या माध्यमातून कौशल्ये, क्षमता, श्रध्दा, विश्वास, दृष्टिकोन, वृत्ती आणि अभिवृत्ती यांच्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ती प्रक्रिया आहे. या माध्यमातून संघटनेच्या पूर्वनियोजित ध्येयांची आणि उद्दिष्टांची अपेक्षित वेगाने आणि पातळीवरून पूर्तता करून घेणे एवढेच मानव संसाधनाचे उद्दिष्ट नसून त्या पलीकडे संघटनेतील मानव संसाधनाचा परिपूर्ण विकास घडवून आणणे त्याच बरोबरीने सामाजिक आणि राष्ट्रीय विकासाचे उद्दिष्ट गाठणे हे मानव संसाधन विकासाचे उद्दिष्ट असते.

मानव संसाधन विकास ही एक गतिमान प्रक्रिया आहे. कर्मचाऱ्यांजवळ असणाऱ्या व्यक्तिगत क्षमतांचा शोध घेणे, त्यांच्या नियोजित भूमिकेला योग्य न्याय देऊन ती यथार्थतेने पार पाडता येईल या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या क्षमता आणि विकास घडवून आणणे; त्यांच्यात संघ भावना जोपासणे; वरिष्ठ आणि कनिष्ठ यांच्यातील संबंध अधिक सौहार्दपूर्ण होतील यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करणे, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि अभिप्रेरण याकडे लक्ष पुरविणे आणि बदलत्या परिस्थितीला योग्य ठरेल, परिस्थितीवरील आव्हानांवर मात करण्याची क्षमता निर्माण करू शकेल अशी अनुकूल वातावरण निर्मिती

करणे याकरिता मानव संसाधन विकासाच्या प्रक्रियेत खालील बाबींचा सहभाग अत्यावश्यक ठरतो:

१. संघटनेमध्ये अध्ययनशील वातावरण निर्मिती करणे म्हणजेच प्रत्येक कर्मचाऱ्याला सोपविलेल्या भूमिकेच्या संदर्भात अद्ययावत ज्ञान ग्रहण करण्यासाठी तसेच त्या-त्या क्षेत्रातील नवी तंत्रे, संकल्पना, विचारप्रवाह यांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याची मानसिकता निर्माण करणे.

२. प्रत्येक कर्मचाऱ्याला विकासोन्मुख करण्याचे प्रयत्न करणे व त्यासाठी विकासाची आवश्यक ती संधी उपलब्ध करून देणे.

३. कर्मचाऱ्यांजवळ सुप्त स्वरूपात असणाऱ्या क्षमतांचा शोध घेणे आणि त्यांच्या विकासासाठी संधी देणे.

४. त्यांची प्रचलित भूमिका आणि त्यांना नजिकच्या भविष्यकाळात स्वीकारावी लागणारी भूमिका सुयोग्य रीतीना पेलता यावी या दृष्टीने त्यांच्याकडून अपेक्षित असणाऱ्या कौशल्यांचा विकास घडवून आणणे या करिता आवश्यक ते प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

५. त्यांना अधिक कार्यप्रवण करण्याच्या हेतूने त्यांचे अभिप्रेरण करणे.

६. कर्मचारी व्यवस्थापन यांच्यातील मालक-नोकर या प्रकारच्या संबंधांच्या जागी सहकारी आणि सहभागीदार या प्रकारचे संबंध प्रस्थापित होतील असे वातावरण निर्माण करणे.

७. संघटनेमधील कर्मचाऱ्यांची गुंतवणूक वाढावी यासाठी व्यवस्थापन प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेणे, निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढवणे.

८. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्याबाबत, कार्यप्रणाली बाबत कार्यपध्दतीच्या स्वीकारा बाबत पुरेसे स्वातंत्र्य देणे.

९. संघटनेमधील समस्या, आव्हाने, संघटनेची बलस्थाने, संघटनेपुढे असणाऱ्या संधी यांचे विश्लेषण करण्याची संधी देऊन या संदर्भातील त्यांच्या सूचना व शिफारसी व्यवस्थापनापर्यंत पोहोचविण्याचे स्वातंत्र्य आणि संधी उपलब्ध करून देणे, त्यासाठी खालून वर जाणाऱ्या संज्ञापनाच्या अनुकूल पध्दती विकसित करणे, त्यांचे मनोधैर्य उंचावण्याचे प्रयत्न करणे आणि बदल स्वीकारायची मानसिकता जोपासून बदलत्या परिस्थितीशी समायोजन करण्याची त्यांची क्षमता वाढविणे.

१०. कर्मचाऱ्यांचा कार्य जीवन दर्जा उंचावण्याचे सर्वतोपरी प्रयत्न त्यांच्या सहकार्याने करणे. ते अधिक समाधानी राहतील, त्यांच्या संघटनेविषयीच्या आत्मीयतेची आणि बांधिलकी भावना जोपासली जाईल आणि संघटनेसाठी आपले महत्तम योगदान देण्यासाठी ते सिध्द होतील यासाठी त्यांना प्रवृत्त करणे.

एकूणच बदलत्या व्यावसायिक वातावरणाशी संघटनेला आणि पर्यायाने कर्मचाऱ्यांना स्वत:चे समायोजन करता येईल अशा पध्दतीचे निकोप, अध्ययनशील वातावरण आणि मानव संसाधन विकासासाठी पोषक वातावरण संघटनेत निर्माण करणे हे आज व्यावसायिक संघटनांपुढील मोठे आव्हान आहे. व्यवस्थापन जेवढे दूरदर्शी आणि

प्रागतिक असेल, पुरोगामी असेल त्या प्रमाणात हे आव्हान पेलण्याची क्षमता वाढेल. सकारात्मक विचारसरणीने युक्त असलेली सृजनशील आणि विकासोन्मुख अशी विधायक आणि आदर्श कार्यसंस्कृती निर्माण करणे हे केवळ मानव संसाधन विकासाच्या माध्यमातूनच उद्योग-संस्था साध्य करू शकतील.

आजच्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मानव संसाधन विकासाची उद्दिष्टचे साध्य करावयाची असल्यास कालबाह्य पध्दतींचा त्याग करावा लागेल. व्यापक दृष्टिकोनावर आधारित असलेल्या मूल्याधिष्ठीत आणि वैश्विक मान्यता असलेल्या मानव संसाधन विकास पध्दतींचा अवलंब आजच्या स्थितीत उपयुक्त ठरू शकेल. जागतिक स्तरावर गेल्या दशकापासून मानव संसाधन विकासाची जी नवी मॉडेल्स विकसित झाली आहेत; त्यांचा अभ्यास करुन आपआपल्या स्तरावर योग्य मॉडेलचा अवलंब करणे किंवा आवश्यकता निर्माण झाल्यास नवी मॉडेल्स विकसित करणे हा आधुनिक संघटनांपुढील उपयुक्त पर्याय ठरेल.

आधुनिक काळात व्यवस्थापनाचे स्वरुप खूपच बदलले आहे. ते अधिक गतिमान झाले आहे. त्यामुळे मानव संसाधन विकासाच्या क्षेत्रातही जे कालसापेक्ष बदल घडून येत आहे. ते जाणून घेण्याची आवश्यकता आहे. मानव संसाधन विकासासंबधीचे प्रचलित दृष्टिकोन, उपक्रम आणि प्रवाह यांच्यात जर खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवून आणायचे असेल तर या क्षेत्रातील बदलत्या प्रवाहांचे चिंतन, मनन आणि उपयोजन ही अपरिहार्य बाब ठरेल. मानव संसाधन विकासातील जे आधुनिक विचार प्रवाह सध्या प्रामुख्याने पुढे येत आहेत त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे -

१) सद्यस्थितीत क्षमता आणि ज्ञानावर आधारित अशा कार्यसंधी वाढत आहेत. तर मर्यादित कौशल्यावर असणाऱ्या कार्यसंधी झपाट्याने कमी होत आहेत. त्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या कार्यसंधींसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा आणि क्षमतांचा विकास करण्याचे प्रयत्न आवश्यक आहे.

२) जागतिक स्तरावर आयएसओ ९००१, ९००४ या मानकांमध्ये प्रमाणित केल्यानुसार ग्राहककेन्द्री संघटना निर्माण होणे गरजेचे वाटते. ग्राहकांशी बांधिलकी ठेवून त्यांना महत्तम समाधान देऊ शकणाऱ्या संघटना निर्मितीचे उद्दिष्ट मानव संसाधन विकासाच्या माध्यमातून झाले पाहिजे.

३) चार्ल्स हँडी यांनी सुचविलेल्या नव्या एचआरडी मॉडेल्सचा अवलंब एचआरडी मॅनेजर्सने करायला हवा. जसे Shamrock, Federal & III Organizational Models चा अवलंब करता येईल. आजच्या अनिश्चिततेच्या वातावरणात टिकून राहण्याच्या दृष्टिकोनातून आणि सातत्यपूर्ण प्रगतीसाठी Six Sigma Practices चा अवलंब करुन श्रेष्ठ दर्जाच्या वस्तू व दोष विरहित वस्तू आणि सेवा कमीत कमी किमतीला कशा उपलब्ध करुन देता येईल यासाठी वापरल्या जाव्यात.

४) श्रेष्ठ दर्जाच्या उत्पादनांसाठी आणि सेवांसाठी BPO आणि KPO यांचा अवलंब करण्याकडे दिसून येणारा वाढता कल हा आधुनिक मानव संसाधन विकासातील एक नवा प्रवाह आहे. Bank of America

सारख्या संस्थांनी या पध्दती वापरल्या आहेत.

५) श्रेष्ठ गुणवत्ताधारक व्यक्तींची नियुक्ती आणि अशा व्यक्ती संघटनेत टिकून राहतील, सकुशल व्यक्तींची नवी फळी तयार होईल यासाठीची धोरणनिश्चिती अंमलबजावणी याबरोबरच आणखी काही नवे विचारप्रवाह असे -

अ) व्यावसायिक परिस्थितीतील जोखीम आणि कौशल्य यांचा महत्तम उपयोग करुन घेण्याबाबतच्या व्यूहरचनांचा स्वीकार

ब) दैनंदिन कामकाजाच्या पध्दतींमध्ये बदल घडवून आणण्याच्या विधायक आणि उपयुक्त सूचना करणाऱ्या उपक्रमशील कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्याची योजना.

क) TQM, प्रशिक्षण, विकास, समुपदेशन, गुणवत्ता मंडळे याद्वारे सातत्यपूर्ण गुणवत्ता वाढीचे प्रयत्न.

ड) संघटनेमधील कार्याचे आणि जबाबदारीचे विकेंद्रीकरण आणि त्याद्वारे वस्तू आणि सेवा यांच्या वितरणविषयक सेवांमधील दर्जा सुधारण्याचे प्रयत्न जे मोटोरोला सारख्या कंपन्यांनी स्वीकारले आहे. या कंपन्यांचे उत्पादन आयुष्यचक्र त्यांच्यासाठी उपयुक्त आहे.

इ) आयबीएम, कोडॅक, झेरॉक्स यासारख्या कंपन्यांमधील Layoff वर गेलेल्या कर्मचाऱ्यांमधून संघटनेद्वारा आलेल्या तक्रारींचे निवारण आणि त्यांच्यातील संवादांमधून पुन:श्च सेवायोजन यासारखी धोरणे ही उपयुक्त ठरावीत.

अलिकडच्या काळात आधुनिक कंपन्यांच्या व्यवस्थापनांनी मानव संसाधन विकासाच्या संदर्भात ज्या प्रमुख बाबींकडे लक्ष पुरविणे अंगिकारले आहे ते असे-

अ) धोरणे, मोकळेपणा, विश्वास, समानता आणि पारदर्शकता यावर आधारित धोरण निश्चिती.

ब) अभिप्रेरण - कर्मचारी अधिक उत्साहाने आणि उमेदीने यशस्वी होण्याच्या आकांक्षेने काम करू शकतील असे वातावरण.

क) बदलाचा मध्यस्थ म्हणून (Change Agent) काम करण्याची व स्वीकारावयाची भूमिका, कर्मचाऱ्यांच्या विविध शंका-निशंकांचे निराकरण करून प्रभावी उद्‌बोधनाद्वारे नवे बदल स्वीकारण्याचे, त्याने कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण करावयाची मानसिकता.

ड) सर्वोत्कृष्टता आणि गुणवत्ता याबाबतची जाणीव आणि जागृती निर्माण करण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न, त्या द्वारे यशाची शाश्वती येईल.

या व अशा बहुविध विचार प्रवाहांना आज मानव संसाधन विकासाच्या प्रणालीमध्ये निश्चित स्थान मिळत आहे. देशविदेशातील विविध कंपन्यांनी आपआपल्या पातळीवर वेगवेगळ्या पर्यायांचा स्वीकार यापूर्वी केलेला आहे आणि प्रस्थापित उपक्रमांमध्ये कालसापेक्ष बदलही केले जात आहेत. आधुनिक काळात सर्वोत्कृष्टतेला पर्याय नाही. इलेक्ट्रॉनिक मिडियाचा वाढता प्रसार आणि जागतिकीकरण, माहिती आणि ज्ञानाचा होणारा स्फोट यांना तोंड देण्यासाठी खालील

स्वरुपाची वैश्विक कौशल्ये विकसित करु शकणारे प्रयत्न मानव संसाधन विकासाद्वारे अपेक्षित आहे.

१) सांस्कृतिक प्रतिसाद: विविध प्रकारच्या संस्कृतींची ओळख करुन घेण्याचे प्रयत्न.
२) सांस्कृतिक स्वीकारार्हता वाढविण्याचे प्रयत्न: विविध प्रकारच्या सांस्कृतिक आणि भिन्न कार्यसंस्कृतीच्या वातावरणामध्ये काम करण्याची क्षमता वाढविण्याचे प्रयत्न.
३) आंतर सांस्कृतिक सहकार्याची भावना रुजविण्याचे प्रयत्न आणि कर्मचाऱ्यांचे त्या पध्दतीचे संघ बनविण्याचे प्रयत्न.
४) आंतर सांस्कृतिक कर्मचारी संघांची क्षमता वृध्दिंगत करण्याचे प्रयत्न.
५) ज्ञानयुक्त कर्मचारी उपलब्ध करुन घेणे व त्यांना टिकविण्याचे प्रयत्न.

मानव संसाधनाच्या विकासातून वैश्विक दृष्टिकोन लाभलेले परंतु स्थानिक पातळ्यांवर असणाऱ्या परिस्थितीशी समायोजन करू शकणारे मनुष्यबळ निर्माण करणे ही आजची प्राथमिकता आहे, यात संदेह नाही.

**संदर्भ ग्रंथ:**


1) Human Resource Management by R.Jaigopal.
2) Human Resource Development by P.V.Rao.
3) Indian Journal of Human Relation.
4) Report of the Working Group on Human Resource Policy for Short Term Co-opertive Credit Structure.
5) Human Resource Development Review, 2005.



**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2011 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2012. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C., Jalgaon-425001.*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# दारिद्र्याचे प्रतिबिंब: चिकित्सा

**तेजस्विनी बी. मुडेकर, कोल्हापूर**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, कमला कॉलेज
आजीव सभासद क्र. ६१७
भ्रमणध्वनी: ९६०४३४३४००

**प्रस्तावना:**

कोणतीही कला ही समाजसापेक्ष असते आणि साहित्य हा कलाविष्कार आहे. साहित्य आणि समाज यांच्यातील अत्यंत निकटच्या संबंधाचा अभ्यास सर्वप्रथम इ. स. १८०० मध्ये फ्रान्समधील 'मादाम स्ताईल' या विदुषीने केला.[१] समकालीन सामाजिक, आर्थिक घडामोडींचे प्रतिबिंब साहित्यात पडते. तसेच साहित्याच्या स्वरूपामध्ये होणारे विविध प्रकारचे बदल, हे समाजामध्ये होणाऱ्या बदलानुषंगाने होतात ही कार्ल मार्क्स यांची प्रमुख भूमिका होती. म्हणजेच प्रथम वास्तव निर्माण होते व नंतर त्या अनुषंगाने कल्पना, विचार विकसित होतात असे मार्क्स यांचे मत होते. फ्रेडरिक एंगल्स, रशियन समीक्षक प्लेखानोव्ह, लेनिन, जागतिक किर्तीचे ललित लेखक मॅक्झिम गॉर्की यांनीही साहित्याचा स्वतंत्र व समाजनिरपेक्ष विचार केलेला नाही.[२]

वरील सर्व विदेशी तज्ज्ञांच्या मतांचा मतितार्थ काढला असता असे दिसते की साहित्य आणि समाज हे एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नाही. मराठी साहित्याची समीक्षा करणाऱ्या समीक्षकांनीही असेच मत व्यक्त केले आहे. *साहित्य ही काल्पनिक निर्मिती नसते व काल्पनिक समस्या मांडण्याची लेखकाची प्रवृत्ती नसते, सामाजिक जीवनात जे जसे आहे ते तसे मार्मिकपणे दाखवून देण्याचा त्याचा प्रयत्न असतो* [३], असे मत रा. ग. जाधव यांनी आपल्या *'साहित्य आणि सामाजिक संदर्भ'* या ग्रंथात व्यक्त केले आहे. साहित्याची समाजसापेक्षता डॉ. रवींद्र ठाकूर यांनी *'साहित्य - समीक्षा आणि संवाद'* या ग्रंथात, आनंद यादव यांनी *'१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह'* या ग्रंथात, डॉ. वि. स. जोग यांनी *'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य'* या ग्रंथातून व्यक्त केली आहे.

समाजाशी निगडित असणाऱ्या अनेक आर्थिक बाबींचे (उदा.

दारिद्र्य, बेकारी, शहरीकरण, कामगार संघटना इत्यादी) चित्रण साहित्यात आढळते. प्रस्तुत लेखात दारिद्र्य व साहित्य हा विषय हाताळला आहे. दारिद्र्याविषयी प्रभावी चित्रण एमिल झोलाच्या *'जर्मिनल,' 'ए टेल ऑफ टू सिटीज,* स्टेन बॅक यांच्या *'ग्रेप्स ऑफ द राथ,* शेले, बायरन, हॅझलिट यांच्या साहित्यातून आढळते.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या मराठी साहित्याचा अभ्यास करता असे दिसून येते की 'दारिद्र्य' हा साहित्याने हाताळलेला स्वतंत्र विषय आहे. दारिद्र्याचे अनेक आयाम मराठी कादंबरीकारांनी आपल्या कादबऱ्यांमधून प्रस्तुत केले आहेत. म्हणूनच अशा साहित्याचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

## वाङ्मय प्रकाराची निवड:

वाङमयाच्या कथा, कविता, नाटक, कादंबरी या ठळक चार प्रकारांपैकी अभ्यासासाठी 'कादंबरी' हा प्रकार निवडला आहे. कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे. ती विस्तृत असल्याने मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरूपात घडविता येते.[४] कादंबरीत व्यक्तीचा भूतकाळ-वर्तमानकाळ चित्रित करताना, कालसंबंध घडामोडींच्या अनेकविध आयामांचा आधार घेतला जातो. त्यामुळे अभ्यासासाठी 'कादंबरी' या प्रकाराची निवड करण्यात आली आहे.

## संशोधन पध्दती:

संशोधन करताना पूर्णत: ग्रंथालयाचा वापर केला आहे. तसेच सुप्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, मराठी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक व समीक्षक रा. ग. जाधव, गंगाधर पानतावणे, म. द. हातकणंगलेकर, डॉ. रवींद्र ठाकूर या तज्ज्ञांशी विचार विनिमय करून ज्या कादंबऱ्यांमधून दारिद्र्याचे विश्लेषण आले असून कादंबऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

## दारिद्र्याची संकल्पना:

दारिद्र्य हे एक वास्तव असून ती एक आर्थिक व सामाजिक घटना आहे. ज्या व्यक्तीस मूलभूत गरजांची पूर्तता करता येत नाही ती व्यक्ती दरिद्री समजली जाते.

दारिद्र्यामध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

१.मूलभूत गरजा : अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य विषयक सुविधा व शिक्षण यांच्या पूर्ततेसाठी उत्पन्नाची कमतरता.

२.राज्यशासन व समाजाच्या विविध संस्थात्मक व्यवस्थांमध्ये समर्थपणे व अभिव्यक्तीसह सहभागी होण्याच्या क्षमतेचा अभाव.

३.प्रतिकूल परिस्थितीला तोंड देण्याच्या क्षमतेच्या कमतरतेमुळे सातत्यपूर्ण असुरक्षिततेची भावना.

## दारिद्र्याची व्याख्या :

**गिलीन आणि गिलीन** : "दारिद्र्य ही अशी अवस्था आहे की ज्यात व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नामुळे असो, की अयोग्य खर्चामुळे असो, ज्या समाजात ती व्यक्ती राहते तेथील राहणीमानाचा दर्जा गाठू शकत नाही की, जो त्याची शारीरिक व मानसिक कार्यक्षमता वाढवेल."[५]

**गोडार्ड** : "दारिद्र्य म्हणजे स्वत:वर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचे पालनपोषण करण्यासाठी;

तसेच निरोगी, उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरूरीच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा होय.''[६]

**वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट** (२०००-२००१) नुसार - ''दारिद्र्य म्हणजे योग्य पध्दतीचे अन्न व निवारा यांचा अभाव, ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पध्दतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही.''[७]

## दारिद्र्याचा आधार :

१. दारिद्र्य म्हणजे अपूर्तता : अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या शैक्षणिक, बौध्दिक व सांस्कृतिक गरजांची पूर्तता न होणे.

२. विषमता व दारिद्र्य : जितकी विषमता अधिक तितके सामाजिक कल्याण कमी. विषमतेमुळे दारिद्र्याची तीव्रता वाढते.

३. गरिबांचा असहभाग : अज्ञानामुळे गरिबांना सरकारच्या विविध योजनांची माहिती नसते त्यामुळे ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात. विकासाच्या प्रकियेत सहभागी होऊ शकत नाही.

४. सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था व दारिद्र्य: भारतीय समाज दोन गटात विभागला आहे, ग्रामीण व शहरी. **अ.** ग्रामीण भाग : ग्रामीण भागातील लघु व सीमान्त शेतकरी व शेतमजूर. ज्यांच्याकडे जमीन अत्यंत कमी असते किंवा नसते असे लोक दारिद्री असतात. **ब.** शहरी भाग: शहरी भागातील कामगारांकडे कोणत्याही प्रकारची उत्पादनाची साधने नसतात ते श्रम विकतात. त्यांचे उत्पन्न अत्यंत अल्प असते. असे लोक दरिद्री असतात. सामाजिक स्तराचा विचारकरता खालच्या किंवा कनिष्ठ जातीचे लोक सामान्यतः दरिद्री असतात.

५. कौशल्याचा, शिक्षणाचा अभाव व दारिद्र्य: कौशल्याचा, शिक्षणाचा, प्रशिक्षणाचा अभाव असल्याने ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकले जातात.

६. मानवी व्यक्तिमत्त्व व दारिद्र्य : मानसशास्त्रज्ञांनी दारिद्र्याचा मानवी व्यक्तिमत्व व मानवी स्वभावाशी संबंध जोडला आहे. उदा. स्थानिक नियंत्रण / स्थितीचा अभाव, बदला बद्दल तटस्थता, समजून घेण्याची कमी कुवत, बुध्दी प्रामाण्यवादाची अक्षमता यातून दारिद्र्य निर्माण होते. स्वतःच्या उत्कर्षाचा दृष्टीकोन नसणारे, नकारात्मक दृष्टीकोनाचे लोक दारिद्री रहातात.

७. लोकसंख्येचा ताण व दारिद्र्य : राष्ट्रीय उत्पन्न वाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर अधिक असेल तर दारिद्र्य वाढते हे दारिद्र्य पुन्हा अर्थव्यवस्थेला दारिद्र्याच्या दुष्टचक्रात ढकलते.

८. भाववाढ व दारिद्र्य : भाववाढीने खरेदी शक्तीत घट होते. त्यामुळे मुळच्या दारिद्र्यात वाढ होते.[८]

## दारिद्र्याचा साहित्यिक अविष्कार:

मराठी साहित्यात अनेक कादंबरीकारांनी शहरी व ग्रामीण भागातील दारिद्र्य, उपासमार, भूक यांचे प्रभावी चित्रण केले आहे. कादंबरी मधून ही समस्या आकडेवारीच्या आधारे मांडता येत नसली तरी तितक्याच समर्थपणे त्याचे गांभीर्य वाचकांपर्यंत पोहचविता येते. कादंबरी आणि काही

आत्मकथनांचा अभ्यास करता दारिद्र्याच्या खालील निकषांचे प्रामुख्याने चित्रण आढळते.

(अ) पुरेशा अन्नाचा व पोषक आहाराचा अभाव, उपासमार, (ब) वस्त्रांची कमतरता, (क)योग्य निवाऱ्याचा अभाव, (ड)आरोग्य विषयक सोयींची अनुपलब्धता, (इ) शिक्षण सुविधांचा अभाव, (फ) इतर बाबी.

**अ. पुरेशा अन्नाचा व पोषक आहाराचा अभाव, उपासमार :**

उध्दव शेळके यांनी आपल्या '**धग**'[९] या कादंबरीत शेतमजूर स्त्री आपल्या मुलांना सेवनासाठी जे अन्न देते त्यामध्ये भाकरी बरोबर कधी भाजी असे कधी नसे, त्यावेळी ती जवसाचे तेल किंवा तिखटाची बुकणी वाढत होती, असे वर्णन आहे. जयवंत दळवी यांनी आपल्या '**चक्र**'[१०] कादंबरीत शहरी भागात झोपडपट्टीत असणारे दारिद्र्य वाचकांपुढे मांडले आहे. पोटाची आग शांत करण्यासाठी अन्न मिळविण्याची धडपड व्यक्त करताना, धान्य घेऊन जाणाऱ्या ट्रक मधल्या काही पोत्यांना भोक पडून सांडलेले गहू येणाऱ्या जाणाऱ्या मोटारी चुकवित रस्त्यावर बसून कोंबडी प्रमाणे वेचणाऱ्या झोपडपट्टीतील मुलांचे वर्णन केले आहे. तसेच जे काही मिळेल ते पोटात ढकलून ही मुले रात्री झोपी जातात असाही उल्लेख यात आहे. मधु मंगेश कर्णिक यांनी आपल्या '**माहिमची खाडी**'[११] या कादंबरीत शहरी भागातील झोपडपट्टीतील अन्नाची कमतरता व पिण्याच्या पाण्याच्या सोयींच्या अभावाचे वर्णन केले आहे. वांद्र्याहून माहिमकडे जाणाऱ्या फुटलेल्या पाण्याच्या पाईपमधून माहिमची झोपडपट्टी तहान भागवित असे. 'येसू' च्या दारिद्र्याचे वर्णन दोन दिवस चूल न पेटल्याने उपासमारीचा राक्षस चिमुकल्या झोपडीत मावेनासा झाला होता असे केलेले आढळते. येसूचे बाळ मेल्याने दूध पाजण्यासाठी तिच्या जवळ बाळ नव्हते, अशा वेळी ते दूध मोठ्या मुलाला पाज तेवढेच अन्न त्याच्या पोटात जाईल अशी तिची सासू सूचविते. रा. रं. बोराडे यांच्या '**पाचोळा**'[१२] कादंबरीत ग्रामीण भागातील व्यावसायिकांच्या दारिद्र्याचे वर्णन आढळते. दुधात कुस्करलेला रोटीच्या तुकडा मागितला म्हणून मार खाणारे लेकरू यात आहे. दया पवार यांच्या '**बलुतं**'[१३] या कादंबरीच्या घाट असणाऱ्या आत्मकथनात तर त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेली अन्नासाठीची वणवण व उपासमार वर्णलेली आहे. महारवाड्यातील लोक मेलेल्या ढोराचे मांस खात. उरलेले मांस वाळवून खात असत. बुरा आलेली भाकरीही भिक्षेत मिळे ती ही खात असत. असा उल्लेख या कादंबरीत सापडतो. लक्ष्मण माने यांच्या '**उपरा**'[१४] या आत्मकथनातही अभ्यासाविषयीचे मुद्दे सापडल्याने तिची निवड केली आहे. अत्यंत दरिद्री अवस्थेतील कैकाडी समाजाचे वर्णन येथे सापडते निकृष्ट अन्नाचे सेवन व उपासमारीचे अनेक उल्लेख '**उपरा**' मध्ये आहेत. वाळलेली शिळीपाकी भाकरी हे कायमचे जेवण. कोरड्यास नसल्याने मिठाच्या पाण्यात किंवा चिंचेच्या पाण्यात भाकरी चुरून खाल्ली जायची, आई चार चार दिवस उपाशी असायची, असाही उल्लेख लेखक करतो तर लग्नात पंगत उठल्यानंतर टाकलेल्या उष्ट्या पत्रावळ्यांवरील खरकटे कुत्री खायच्या आत अन्नासाठी मुले झडप घालत अशी समस्येची तीव्रता येथे वर्णिलेली आहे. मधू मंगेश कर्णिक यांनी आपल्या '**भाकरी आणि फूल**'[१५] या कादंबरीत भारताने स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव

साजरा केला तरी दलितांचे दारिद्र्य हटले नाही याचे वर्णन केले आहे. शिवनाक महाराच्या घरी एक डवली पेज आणि कुळथाचे पाणी घालून भिजवलेले पीठ, नाचणीची अंबिल, मृत बैलाचे मांस यांचे सेवन करून भूक भागविली जायची. शरणकुमार लिंबाळेंच्या '**अक्करमाशी**'[१६] या आत्मचरित्रात ग्रामीण दारिद्र्याचे मूर्तिमंत चित्र उभे केले आहे. नेहमीच अर्धी भूक ठेवून जेवणावरून उठावे लागे. जनावरांच्या शेणातील न पचलेले दाणे धुवुन वाळवून त्याची भाकरी करून खाल्ली जायची. एक मूल जेवले की दुसरे उपाशी रहायचे. बुरशी आलेली भाकरी पुसून पुसून खाल्ली जायची असाही उल्लेख आढळतो. नामदेव कांबळे यांनी '**राघववेळ**'[१७] या कादंबरीत एका मांग कुटुंबाची भूक, उपासमार वर्णिलेली आहे, खायला कधी नुसतीच भाकरी तर कधी नुसतीच भाजी असायची. मेलेल्या म्हशीचे मांस खाल्ले जायचे लवकर विटणाऱ्या भाज्या कालवण, भात, आंबील कालवून भिजवून तो 'ठोंबरा' आठ - आठ दिवस खात असत. गिरणीत खाली सांडलेले ज्यात दगडाचे बारीक कण असत अशा पिठाची भाकरी खायला मिळे. जयवंत दळवी यांनी आपल्या '**बाजार**'[१८] कादंबरीत शहरी दारिद्र्याचे वर्णन केले आहे 'देऊ' या नायकाकडे पैसे नसल्याने पोटात चार - चार दिवस अन्नाचा कण नसायचा, सडलेल्या काकड्या, लिबलिबीत टोमॅटो खाऊन भूक भागविली जायची.

**ब. वस्त्रांची कमतरता** : मधु मंगेश कर्णिक यांनी '**भाकरी आणि फूल**' मध्ये शिवनाक महाराची बायको दुसऱ्यांनी दिलेली फाटकी जुनेरं नेसायची. दहा वर्षात एक सुध्दा नवीन कपडा शिवनाक त्याची बायको आणि लहान मुलगा यांनी अंगात घातलेला नाही. जयवंत दळवी यांनी '**चक्र**' कादंबरीत गरीबीमुळे स्त्रियांना लज्जा रक्षणापुरतेही कपडे मिळत नाहीत तर झोपडपट्टीत लहान मुले कपडे नसल्याने उघडी नागडी फिरतात याचे वर्णन केले आहे. नामदेव कांबळे यांच्या '**राघववेळ**' या कादंबरीत सीताराम व रघू दोघे भाऊ फाटके शर्ट आणि ठिगळे लावलेल्या चड्ड्या घालून शाळेला जातात असा उल्लेख आहे. जयवंत दळवी यांच्या '**बाजार**' या कादंबरीत बाकीट दुसऱ्याची जुनी पँट, शर्टवरच गुजराण करीत असे असा संदर्भ आहे.

**क. योग्य निवाऱ्याचा अभाव** : जयवंत दळवी यांच्या '**चक्र**' कादंबरीत बांबूचे तट्टे, सिमेंटची पोती, जाहिरातींच्या बॅनरच्या छोट्या छोट्या झोपड्यांचा उल्लेख आहे. तसेच स्त्रियांना फूटपाथवरच्या नळाखालीच आंघोळ करावी लागत असे म्हणजेच या मूलभूत गरजाही भागविल्या जात नाहीत. मधु मंगेश कर्णिक यांच्या '**माहिमची खाडी**' या कादंबरीतही नासके पाणी, खुरटी वनस्पती, घाणेरडा चिखल यांच्या कचाट्यात माणसांना पाय नि डोके टेकण्यापुरता आधार देणारी शेकडो खुजी घरटी असा निवाऱ्याचा संदर्भ आहे. पोकळ पाईप मधूनही माणसे रहात, झोपडीत खाडीचे पाणी चार चार दिवस रहात असे असाही उल्लेख सापडतो. दया पवार यांच्या '**बलुत**' मध्येही दहा बाय बाराच्या खोलीत दहा - बारा माणसे रहात व पावसाळ्यात सर्वच खोल्या जागोजागी गळत असा संदर्भ सापडतो. जयवंत दळवी यांच्या '**बाजार**' कादंबरीत दारात कचऱ्याचा ढिग असणारी राधीची खोली असा उल्लेख आहे. इतरत्र निवारा नसलेले लोक रात्री कुठेही झोपायचे असे वर्णन आढळते.

**ड. आरोग्य सुविधेचा अभाव** - उध्दव शेळके यांच्या **'धग'** कादंबरीत स्त्रियांना प्रसुती काळात योग्य सोई मिळत नाहीत. झाडाच्या आडालाच प्रसूती केली जाते. तसेच पैशाच्या अभावाने लहान मुलावर औषधोपचार करणे शक्य नसते असा उल्लेख आहे. जयवंत दळवी यांच्या **'चक्र'** कादंबरीत दारिद्र्यामुळे औषधोपचारा अभावी पंडुरोग झालेली व्यक्ती, कडकीने आजारी असलेली 'लक्ष्मी', दम्याने श्वास कोंडून गुदमरणारी व खरजेने कुजलेली 'धोंडी', पुन्हा बाळंतपणात बाळंतरोग झालेली 'लक्ष्मी' अशी गांजलेली पात्रे सापडतात. मधु मंगेश कर्णिकयांच्या **'माहिमची खाडी'** मध्येही अनारोग्य, बालमृत्यू अस्वच्छते मुळे होणारी रोगराई, वेश्यागमनामुळे भिकाला जडलेला गुप्तरोग असे संदर्भ सापडतात. नामदेव कांबळे यांच्या **'राघववेळ'** मध्ये दारिद्र्यामुळे योग्य औषधोपचार अभावी नायिकेचा पती दम्याने जर्जर होऊन मृत्यूमुखी पडतो याचा उल्लेख आढळतो.

**इ. शिक्षण सुविधेचा अभाव** : उध्दव शेळके यांच्या **'धग'** मध्ये शालेय पुस्तकांसाठी पैसे नसल्याने शाळा सोडावी लागते असा उल्लेख आहे. तर पुस्तके नसल्याने गुरुजी वर्गात बसू देत नाहीत हेही दुःख मांडले आहे. मधु मंगेश कर्णिक यांनी **'माहिमची खाडी'** मध्ये झोपडपट्टीत जन्म झालेल्या पोरांना नाय शाळा, नाय मास्तर असे वाक्य नायिकेच्या तोंडी टाकले आहे. लक्ष्मण माने यांच्या **'उपरा'** मध्ये गावोगावी भटकणाऱ्या ज्या गावात जायचं त्या गावची शाळा असे. पाटी पुस्तकही घेता येत नव्हते, छोटे छोटे धंदे करून लेखकाने शिक्षण पूर्ण केले असा उल्लेख आढळतो **'राघववेळ'** या कादंबरीत नामदेव कांबळे यांनी जवळ असलेल्या पैशातून खरेदी करताना कपडे की पुस्तक हा प्रश्न मांडला आहे. **'बाजार'** मध्ये जयवंत दळवी यांनी शिक्षणाच्या अभावामुळे चांगले उत्पन्न मिळविण्याची उत्पन्नाची संधी उपलब्ध होऊ शकत नाही हे दुष्ट चक्र दर्शविले आहे.

**फ. इतर बाबी** : दारिद्र्याचा निदर्शक असणाऱ्या इतर बाबीही कादंबऱ्यांमधून मांडलेल्या आहेत. दारिद्र्यामुळे बालमजूर निर्माण होतात. शिक्षणाच्या अभावामुळे लोकसंख्यावाढ, मुलाच्या मरणाचे दुःख न होता आपल्याला पैसे किती मिळतील याचा विचार (भाकरी आणि फूल) या दारिद्र्याच्या पैलूंचे उल्लेख सापडतात.

**निष्कर्ष** : दारिद्र्याचा अभ्यास करताना अन्नाचा अभाव, उपासमार भूक, पोषक आहाराचा अभाव, अयोग्य निवाऱ्याची व्यवस्था, शिक्षण सुविधांचा अभाव हे दारिद्र्याचे निकष, यांची वास्तवता कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांमधून मांडून विचारांची तीव्रता समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ:**


१. जोग वि. स. (१९८१) *'मार्क्सवाद आणि मराठी साहित्य'*, विजय प्रकाशन, नागपूर पृ. १९

२. तत्रैव पृ. २४, २५, ३१, ३३, ३४, ४७, ४८

३. जाधव रा. ग. *'साहित्य आणि सामाजिक संदर्भ'*, १९९६ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. ७०, ७१

४. भागवत श्री. पु., रसाळ सुधीर, पाडगावकर

मंगेश, तेंडुलकर शिल्पा, कीर्तने अंजली संपादित *'साहित्य : अध्यापन आणि प्रकार'* १९८७ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ.२५३

५. Dr. Shandilya T. P., *'Poverty : A Danger to prosperity'* IEA 86th conference, volume 2003 Page No. 152

६. Dr. Shandily T. P. Page. No. 152

७. Dr. Ghadge S. K. *'Causes, Trends and Alleviation of poverty In India'* IEA 86th conference volume 2003 Page NO. 117

८. Dr. Gadage R. S. Ph.D.Thesis: 'A Critical Review of literature on concepts causes measurements and Estimates of Poverty in India.' Page. No. 9,10

९. शेळके उध्दव, *'धग'*, प. आ. १९८३ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१०. दळवी जयवंत, *'चक्र'*, प. आ. १९८३ मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.

११. कर्णिक मधु मंगेश : *'माहिमची खाडी'*, तृ. आ. १९८३, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.

१२. बोराडे रा. रं. *'पाचोळा'*, पुनर्मुद्रण विद्यापीठ आ. १९७७ मौज प्रकाशन, मुंबई.

१३. पवार दया, *'बलुतं'*, चौ. आ., १९८५ ग्रंथाली, मुंबई.

१४. माने लक्ष्मण, *'उपरा'*, १९८०, ग्रंथाली, मुंबई.

१५. कर्णिक मधु मंगेश, *'भाकरी आणि फूल'*, १९८२, मॅजेस्टिक बूक स्टॉल, मुंबई.

१६. लिंबाळे शरणकुमार, *'अक्करमाशी'*, १९८४ श्री विद्याप्रकाशन, पुणे.

१७. कांबळे नामदेव चं., *'राघववेळ'*, तृ. आ. १९८६, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि. पुणे.

१८. दळवी जयवंत, *'बाजार'*, १९८६ मनोरमा प्रकाशन, मुंबई.

# अनुदानित विहिरींचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात योगदान

**नितीन वना जाधव**, अमळनेर
व्यावसायिक अर्थशास्त्र व बँकिंग विभाग प्रमुख
प्रताप महाविद्यालय, जि.जळगाव
आजीव सदस्य क्र.७३०
भ्रमणध्वनी: ९४२१७०३५३१

**राजेंद्र मधुकर सरोदे**, भुसावळ
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख
दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालय
आजीव सदस्य क्र.१५२४

## प्रस्तावना:

देशाप्रमाणेच महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार शेती हाच आहे. महाराष्ट्र हे देशातील औद्योगिक दृष्ट्या प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. मात्र राज्यातील शेती व्यवसाय देशातील इतर राज्यांच्या तुलनेत खूप मागे आहे. महाराष्ट्रातील बहुतांश उद्योग हे कृषीप्रधान आहेत म्हणून राज्यांतील कृषी क्षेत्राचा विकास झाल्यास औद्योगिक विकासाच्या वेगात आणखी वाढ होईल आणि आर्थिक विकासातील आपली घोडदौड महाराष्ट्राला सतत सुरू ठेवता येईल.

महाराष्ट्रातील शेती प्रामुख्याने कोरडवाहू आहे. ती नैऋत्य मोसमी पावसावर अवलंबून आहे. शेती व्यवसाय आणि जलसिंचन यांचे अतूट नाते असते. महाराष्ट्रातील शेतीस बारमाही पाणीपुरवठा करणाऱ्या जलसिंचनाच्या सोयी अतिशय अल्प प्रमाणात उपलब्ध असल्याने आजही महाराष्ट्रातील शेती व्यवसाय मान्सूनच्या पावसावरील जुगार मानला जातो. महाराष्ट्रातील १४८ तालुके अवर्षणाच्या विळख्यात आहेत. म्हणून दुष्काळाचे अस्मानी संकट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या डोक्यावर सारखे घिरट्या घालत असते. राज्यातील शेतकऱ्याला या संकटातून मुक्त करावयाचे असेल तर शेतीस बारमाही जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध होणे अतिशय गरजेचे आहे.

शेतीस पाणीपुरवठा करणारे विहिरी, कालवे, तलाव हे महत्त्वाचे स्त्रोत मानले जातात. यातील विहिरी हा सर्वात महत्त्वाचा जलस्त्रोत आहे. महाराष्ट्रातील शेतकरी कमालीचा दारिद्री आहे. त्याच्याकडे जमिनीचे धारणक्षेत्र अतिशय लहान आहे. परिणामी तो आपल्या शेतात विहीर सुध्दा खोदू शकत नाही. महाराष्ट्र शासनाने राज्यातील दारिद्र्याची समस्या सोडविण्यासाठी अनेक कल्याणकारी व अभिनव अशा योजना राबविल्या आहेत. यातील एक महत्त्वाची योजना म्हणजे शेतकऱ्यांना विहिरीसाठी १००% अनुदाने देण्याची योजना होय. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना १००% अनुदाने देऊन विहिरी वितरित केल्या आहेत. या अनुदानीत विहीर योजनांमुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाला मदत झाली आहे. त्यात बहुतांश भाग अवर्षणाच्या विळख्यात असलेल्या जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात या अनुदानित विहिरीचे मोठे योगदान ठरले आहे.

**राज्यातील १४८ तालुके अवर्षणाच्या विळख्यात:**

राज्यात वेगाने पायाभुत सुविधांची झालेली निर्मिती व वाढ, सिंचनाच्या सोयींची निर्मिती, औद्योगिक व सेवा क्षेत्राचा सतत वाढत जाणारा हिस्सा, तंत्रज्ञान व ऑटोमोबाईल क्षेत्राची सतत प्रगतीकडे झेप इ. अनेक क्षेत्रात महाराष्ट्र राज्याच्या विकासाची घोडदौड सुरू असल्याच्या नोंदी महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या अहवालातून पहावयास मिळतात. मात्र असे असले तरी महाराष्ट्रातील ३५५ पैकी १४८ तालुके आजही अवर्षणप्रवण क्षेत्राला तोंड देत असल्याची विदारक स्थिती उजेडात आली आहे. राज्यांतील ३०७.५८ लाख हेक्टर पैकी १५९.२३ लाख हेक्टर क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. राज्यांतील नाशिक विभागात सर्वाधिक ४५.३७ लाख हेक्टर तर नागपूर विभागात सर्वात कमी ७.३८ लाख हेक्टर क्षेत्र अवर्षण प्रवण क्षेत्र असल्याची स्थिती कृषी आयुक्तालयाने समोर आणली आहे. दुष्काळग्रस्त स्थिती आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य, कायम भूजल पातळी कमी राहणे, सिंचन पुरेसे न होणे परिणामी उत्पादनात घट, जनावरे व पशुपक्ष्यांची संख्या रोडावणे, रोजगाराचा अभाव, मजुरांना कामे न मिळणे, पर्यावरणाचा ढासळता समतोल आदी विविध समस्यांशी १४८ अवर्षण प्रवण तालुके सामना करीत आहेत. यात जळगाव जिल्ह्याचा प्रामुख्याने समावेश आहे.

**महाराष्ट्र - अवर्षण प्रवण क्षेत्राची स्थिती:** (आकडे लाख हेक्टर मध्ये)

| अ.नं. | विभाग | भौगोलिक क्षेत्र | अवर्षण प्रवणक्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ५८.६७ | ४५.३७ | ७७ |
| २ | पुणे | ५४.३९ | ३९.८२ | ७३ |
| ३ | औरंगाबाद | ६४.४३ | ३२.१४ | ५० |
| ४ | अमरावती | ४७.९७ | ३४.५३ | ७२ |
| ५ | नागपूर | ३५.७० | ७.३८ | २१ |
| | एकूण | २६१.५८ | १५९.२३ | ६१ |
| | राज्य | ३०७.५८ | १५९.२३ | ५२ |

### आर्थिक विकासात जलसंपत्तीचे महत्त्व:

कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासात जलसंपत्ती महत्त्वाची मानली जाते. पाणी म्हणजे जीवन! सजीवांना जीवन जगण्यासाठी, उद्योग, वीजनिर्मिती इ. अनेक क्षेत्रात पाण्याची आवश्यकता असते. महाराष्ट्रातील मान्सूनच्या लहरी पावसावर अवलंबुन असणाऱ्या शेती व्यवसायाला वाचविण्यासाठी जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध होणे गरजेचे आहे. सिंचनाच्या सोयी प्रामुख्याने दोन प्रमुख जलस्त्रोतातून निर्माण होतात.

१ भूपृष्ठावरील जलस्त्रोत

२ भूपृष्ठाखालील जलस्त्रोत

हे दोन्ही जलस्त्रोत पावसाच्या पाण्यातूनच निर्माण होतात. भूपृष्ठावरील जलस्त्रोतात धरणे, बंधारे, कालवे, के.टी. वेअर्स इ. चा तर भूगर्भातील जलस्त्रोतात विहिरी व कूपनलीका यांचा अंतर्भाव होतो. भूपृष्ठावरील व भूपृष्ठाखालील दोन्ही स्त्रोतांद्वारे शेतीस पाणीपुरवठा करण्याचे तीन मार्ग आहेत.

१. विहीरी व कूपनलिका

२. कालवे

३. तलाव

महाराष्ट्रात या तिन्ही मार्गांचा विकास होत गेला आहे. त्यांची संख्या व सिंचन क्षमताही वाढत आहे यातील सर्वात कमी खर्चाचा व त्वरित लाभ देणारा प्रकार म्हणजे विहिरी व कूपनलीका होय.

### विविध स्त्रोतानुसार जलसिंचन:

महाराष्ट्रात विहिरी हा जलसिंचन करणारा महत्त्वाचा स्त्रोत असून इतर साधनांच्या सहाय्याने देखील शेतीस जलसिंचन केले जाते.

**१)विहिरी:** महाराष्ट्रात विहिरींचा जलसिंचन क्षेत्रात १९६१ ते २००१ पर्यत सुमारे ४० वर्षात सतत वाढ होत गेली आहे. १९६१ साली महाराष्ट्रात विहिरींखालील जलसिंचन क्षेत्र फक्त ५.५ लाख हेक्टर होते. त्यानंतर २० वर्षांनी म्हणजे १९८०-८१ साली विहिरींचे सिंचन क्षेत्र १८.३५ लाख हेक्टरपर्यंत वाढले. तर आणखी २० वर्षांनी २०००-२००१ मध्ये ते २२.६२ लाख हेक्टर होते आणि आजपावेतो विहिरींद्वारा जलसिंचनाचे सर्वात जास्त क्षेत्र आहे. यानंतर पुढील वर्षी विहिरीद्वारा होणाऱ्या जलसिंचन क्षेत्रात थोडी घट झाली. मात्र यानंतर त्यात पुन्हा सावकाश वाढ होत गेली. २००७-०८ साली विहिरींद्वारा जलसिंचनाचे क्षेत्र २१.५१ लाख हेक्टर होते. या नंतरही त्यात वाढच होत गेली आहे.

**२) इतर साधनांद्वारा जलसिंचन:** यात कालवे, तलाव इ. द्वारा होणाऱ्या जलसिंचनाच्या स्त्रोतांचा एकत्रितपणे विचार केला जातो. १९६१ साली या मार्गांनी होणारे जलसिंचनाचे क्षेत्र फक्त ४.७७ लाख हेक्टर होते. ते ३० वर्षांनी १९९०-९१ मध्ये ९.१९ लाख हेक्टरपर्यंत वाढले. पुढील पाच वर्षांनी इतर साधनांद्वारा होणारे जलसिंचन क्षेत्र साधारणपणे १० ते १०.६ लाख हेक्टर होते. २००७-२००८ साली ११.६ लाख हेक्टरपर्यत या गटांतील जलसिंचन क्षेत्रात वाढ झाली.

**विहिरी- शेती जलसिंचनाचा महत्त्वाचा स्त्रोत:** महाराष्ट्रात धरणे, कालवे, तळे, बंधारे, कूपनलिका, विहिरी या वेगवेगळ्या मार्गांनी शेतीला पाणीपुरवठा केला जातो. या सर्व प्रकारांपैकी विहिरी हा जलसिंचनाचा महत्त्वाचा स्त्रोत मानला जातो. विहिरींद्वारा मोठ्या प्रमाणात शेतीस जलसिंचन केले जाते. राज्यातील एकूण स्थूल सिंचन क्षेत्राच्या ५३% क्षेत्र तर निखळ सिंचन क्षेत्राच्या ६५% क्षेत्र विहिरींद्वारा भिजविले जाते. जळगाव जिल्हा

अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडला जातो. जिल्ह्यात बारमाही वाहणाऱ्या नद्या नाहीत. पर्यायाने शेतीस जलसिंचन करणारा विहिरी हाच महत्त्वाचा मार्ग ठरतो.

**महाराष्ट्रात शासकीय पातळीवर विहिरी वितरीत करण्याची आवश्यकता:** विहिरी हा जलस्रोत इतर जलस्रोतांपेक्षा सोयिस्कर असतो. विहिरींचे पाणी गरजेनुसार, प्रमाणानुसार, ऋतूमानानुसार व पसंतीप्रमाणे केव्हाही देता येते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेतात विहीर असावी असे वाटते. परंतु महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकऱ्यांकडे जमिनीचे धारणक्षेत्र अतिशय लहान आहे. शिवाय शेतकरी कमालीचा दरिद्री असल्याने तो आपल्या शेतात विहीर खोदण्यास असमर्थ असतो. परिणामी जिरायती जमिनीचे बागायती जमिनीत रुपांतर होत नाही. यासाठी शासकीय पातळीवर योजना राबविली जावी असे ज्या-ज्या तज्ज्ञांना व नियोजनकारांना वाटले त्यातूनच महाराष्ट्रात शासकीय पातळीवर विहिरी वितरित करण्याची योजना राबविण्यास सुरुवात झाली. यात जवाहर विहीर योजना, जीवनधारा विहीर योजना, दशलक्ष विहीर योजना इ. विभिन्न योजना महाराष्ट्र शासनाने राबविल्या आहेत. या योजनांअंतर्गत शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून विहीर खोदणे व विहिरीचे बांधकाम करणे यांसाठी १००% अनुदाने दिली जातात. दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे हा या योजनांमागील शासनाचा प्रमुख उद्देश आहे. नेहमीच दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या अनुदानित विहिरी वरदान ठरल्या आहेत.

**अनुदानित योजना राबविण्याचे उद्देश:**

महाराष्ट्र देशातील औद्योगिकदृष्ट्या प्रथम क्रमांकाचे राज्य असले तरी शेती क्षेत्रात बरेच मागे आहे. देशात १९९१ पासून जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेने वेग घेतला आहे. भारताने १९९५ पासून जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) सदस्यत्व स्वीकारले आहे. या जागतिक स्पर्धेत देशातील विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. शेतकरी सारखा कर्जाच्या गर्तेत लोटला जात आहे. महाराष्ट्रात दररोज असे कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. याचे मुख्य कारण महाराष्ट्रातील शेती व्यवसाय निसर्गाच्या लहरी पावसावर अवलंबून आहे. राज्यात बारमाही जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध नाहीत अशा दारिद्री शेतकऱ्यास व लयास गेलेल्या शेती व्यवसायाला वाचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना विहिरींसाठी अनुदाने देऊन अनुदानित विहीर योजना राबविली आहे. या योजनेचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. जिरायती जमिनीचे बागायती जमिनीत रुपांतर करणे. २.शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे व त्याचे जीवनमान उंचावणे. ३. ग्रामीण भागांतील रोजगारात वाढ घडवून आणणे व रोजगारासाठी खेड्यातून शहरात येणारे लोंढे थांबविणे. ४. शेतीला पाणी देण्याच्या आधुनिक पध्दतीचा वापर करुन मर्यादीत पाण्याचे नियोजन करणे व पीक रचनेत बदल घडवून आणणे इ.

**जळगाव जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित विहीरी:** जळगाव जिल्ह्यातील कापूस व केळी ही प्रमुख पिके आहेत. त्यांना मोठ्या प्रमाणात जलसिंचनाची गरज असते. जिल्ह्यात बारमाही वाहणाऱ्या नद्या नसल्याने कालव्यांद्वारे होणाऱ्या

जलसिंचनाच्या सोयींचा जिल्ह्यात फारसा विकास झालेला नाही. परिणामी शेतीस पाणीपुरवठा करणारा विहिरी हाच एकमेव मार्ग आहे. मात्र जिल्ह्यातील शेतकरी आपल्या शेतात विहीर खोदण्यास सुध्दा असमर्थ आहे. अशा शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाकडून अनुदानित विहिरी वितरीत करण्यात आल्या आहेत. या विहिरींमुळे जिल्हयातील जिरायती जमिनीचे बागायती जमिनीत रुपांतर झाले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे.

**जळगाव जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत वितरीत झालेल्या विहिरी**

| वर्ष | मंजुर विहिरी (संख्या) | पूर्ण झालेल्या विहिरी (संख्या) | नामंजूर झालेल्या विहिरी (संख्या) |
|---|---|---|---|
| २०००-२००१ | ७०० | ६३८ | ६२ |
| २००२-२००३ | ४०३ | ३८४ | १९ |
| २००४-२००५ | ८४० | ७८२ | ५८ |
| २००७-२००८ | २०१३ | काम सुरू आहे | - |

सन २०००-०१ पूर्वी महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील शेतकऱ्यांना जीवनधारा व दशलक्ष योजनेअंतर्गत विहिरी वितरित करण्यात आल्या आहेत. सन २०११-१२ या वर्षापासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिरी वितरित करण्यात येत आहेत. २०११-१२ या वर्षी धरणगाव तालुक्यात १०६० तर अमळनेर तालुक्यात ८५० विहिरींना मंजुरी देण्यात आली आहे. या विहिरींचे वाटप करतांना जिरायती जमिनीचे बागायती जमिनीत रुपांतर करणे या उद्देशाबरोबरच ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे हा देखील एक उद्देश आहे. या योजनेअंतर्गत विहीर मंजूर झाल्यापासून १०० दिवसांच्या आत संबधित लाभार्थी शेतकऱ्याने विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करणे आवश्यक असते. हे काम कंत्राटी पध्दतीने न करता मजूरांकडून रोजंदारी पध्दतीने काम करण्यात यावे. मजुरांना त्यांच्या कामाचा मोबदला (मजुरी) देताना ती धनादेशाद्वारे देण्यात यावी.

**जळगाव जिल्हयात शेती उत्पादनातील बदल :**

महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित विहीर योजनांचा लाभ जळगाव जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांना झाला आहे. सन २०११-२०१२ पासून शासनाने या योजनेची व्याप्ती वाढविली आहे. महाराष्ट्र शासनाने फेब्रुवारी २०१२ मध्ये सादर केलेल्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष दिले आहे. जिल्ह्यातील जिरायती जमिनीचे बागायती जमिनीत रुपांतर झाले आहे. जिल्हयात पीक रचनेत सुध्दा बदल घडून आला आहे. जिल्ह्यातील शेतकरी पारंपरिक पिकांऐवजी फळबाग, केळी, कापूस, तेलबीया, भाजीपाला इ. पिकांचे उत्पादन घेऊ लागला आहे. जळगाव जिल्हा केळीचे आगार म्हणून प्रसिद्ध आहे. यात शासनाच्या या योजनेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. जिल्ह्यात केळीच्या उत्पादनात ४ ते ५ पट तर कापसाच्या उत्पादनात ५ ते ७ पटीने वाढ झाली आहे. फळबागा व भाजीपाल्याच्या उत्पादनातील वाढ देखील अशीच नजरेत भरण्याइतकी आहे.

जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात जिल्ह्याच्या सरासरी पर्जन्यापेक्षा कमी पाऊस पडतो. तालुक्यातील विहिरी एप्रिल, मे, जून महिन्यापर्यंत पूर्णपणे कोरड्या असतात. मे महिन्यात कापसाची लागवड करताना शेतकरी दुसरीकडून पाणी टँकरने कोरड्या विहीरीत टाकतो आणि ठिबक सिंचनाच्या माध्यमाने कापसाची लागवड करतो. पावसाळा सुरू झाल्यास पाण्याची फारशी गरज नसते. पावसाळ्यात विहिरींच्या पाण्याची पातळी वाढते. अशा पध्दतीने कापसाचे उत्पादन घेणाऱ्या अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनमानात झपाट्याने सुधारणा झाली आहे.

**प्रश्न भूगर्भातील मर्यादित जलसाठ्याचा:**

महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित विहीर योजनांमुळे दिवसेंदिवस विहिरी व कूपनलिकांची संख्या वाढत आहे. आधीच अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडल्या जाणाऱ्या जळगाव जिल्ह्यात या योजनांमुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे. त्यामुळे भूगर्भातील मर्यादित जलसाठ्यावर ताण पडत आहे. यासाठी भूगर्भातील जलसाठ्याचा कार्यक्षम व पर्याप्त वापर होण्याच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या आधुनिक पध्दती विकसित झाल्या आहेत. यात प्रामुख्याने पुढील ३ पध्दतींचा समावेश होतो.

**१.आलटून पालटून पाणी देण्याची पध्दत:** प्रवाही पध्दतीने शेतीस पाणी दिल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होतो. त्यावर उपाय म्हणून ही पध्दत विकसित झाली यात क्रमाक्रमाने सारा भिजवितात या पध्दतीत दोन इलेक्ट्रॉनिक्स टायमरचा वापर करुन झाडपांच्या सहाय्याने पाणी आपोआप सोडण्याची व्यवस्था केली जाते. ही पध्दत अमेरिकेत मोठ्या प्रमाणात वापरली जाते.

**२. फवारा सिंचन (तुषार सिंचन) पध्दती:** पंपाच्या सहाय्याने नळीतील पाण्यास आवश्यक तो दाब देऊन नळीतील पाणी नोझलच्या सुक्ष्म छिद्राद्वारे फवाऱ्याच्या रुपाने पिकांना देण्याच्या पध्दतीस तुषार सिंचन असे म्हणतात.

**३.ठिबक सिंचन पध्दती:** पाण्याचा काटकसरीने वापर करुन दररोज किंवा एक दिवसाआड आवश्यक तेवढे पाणी कमी बळाने झाडाच्या ३० ते ४०% क्षेत्रावरच पाणी देणे यास ठिबक सिंचन असे म्हणतात.

वरील तिन्ही पध्दतींपैकी तुषार व ठिंबक सिंचन पध्दतींचा महाराष्ट्रात शेतजामिनीस पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. जळगाव जिल्ह्यातील केळी, कापूस व फळबागांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात या आधुनिक पध्दतीने क्रांती घडवून आणली आहे.

**तुषार व ठिंबक सिंचनासाठी महाराष्ट्र शासनाकडून अनुदाने :**

भूगर्भातील मर्यादित जलसाठ्याचा अतिशय कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी तुषार व ठिंबक सिंचन पध्दतींचा वापर केला जातो. यामुळे पाण्याचे कार्यक्षम नियोजन होते मात्र त्या पध्दती खर्चिक असल्याने शेतकऱ्यांना परवडणाऱ्या नाहीत. म्हणून महाराष्ट्र शासनाने तुषार व ठिबक सिंचनासाठी सुध्दा अनुदाने देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील शेतकरी या पध्दतींचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. त्यामुळे केळी, कापूस, फळबागांच्या उत्पादनात जिल्ह्यात

लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र भूगर्भातील मर्यादित पाण्याचा विहिरीद्वारे सारखा उपसा होत असल्याने भूगर्भातील पातळी दिवसेंदिवस खालावत आहे याचा विचार करण्याची नितांत गरज आहे अन्यथा भविष्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य अधिक जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भूगर्भातील पाण्याचा अमर्याद प्रमाणात होणारा उपसा थांबविण्यासाठी अलिकडे महाराष्ट्र शासनाने अधिक पाण्याची आवश्यकता असणाऱ्या उदा.केळी, ऊस, कापूस, फळबागा इ. पिकांचे उत्पादन शेतकऱ्यांनी घेऊ नये यासाठी महाराष्ट्र शासन कायदा करण्याच्या तयारीत आहे.

## जिल्ह्यात मृद व जल संधारण :

भूगर्भातील मर्यादित जलसाठ्याचा विचार करता शासनाने पाणलोट क्षेत्रातही जल मृदसंधारणाची व्यापक मोहीम हाती घेतली आहे. ही मोहीम जळगाव जिल्ह्यात व्यापक प्रमाणात राबविण्यात येत आहे. मृद व जलसंधारण पुढील पध्दतींद्वारे केले जाते.

**१.जैविक पध्दतीचे मृद व जलसंधारण :** ही पध्दती कमी खर्चिक व अधिक लाभ देणारी आहे. यात समतल मशागत, उगवते तंत्रज्ञान, रुंद वाफेसरी पध्दती, खस गवत, समपातळी लागवड, पट्टा पेरणी पध्दती, वनीकरण, कुरणविकास, जैविक गाळण पट्टे, समपातळीतील जैविक पट्टे, नाल्याच्या काठाने वृक्ष लागवड इ.

**२. अभियांत्रिकी पध्दतीचे मृद व जलसंधारण:** या पध्दतीने करावयाची जलसंधारणाची कामे जास्त खर्चिक असतात. या पध्दतीत सिमेंट नालाबांध, मातीचे जलबांध, समपातळीवर बांध बंदिस्ती, गली प्लॅनिंग, समपातळीतील चर, नाला सरळीकरण ब्रश वूड डॅम, लूज बोल्डर, स्ट्रक्चर शेततळी, गॅबियन स्ट्रचर, पाझर तलाव, गाव तलाव व वसंत बंधारे इ. गोष्टी येतात. या दोन्ही पध्दतींचा वापर जळगाव जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात करीत आहेत. निसर्गाचे पडणारे पाणी अडवून जिरवण्याचे प्रयत्न देखील व्यापक प्रमाणात होत आहेत. अवर्षणाच्या विळख्यात असलेल्या जळगाव जिल्ह्यात या कार्याची व्यापकता वाढविणे अतिशय गरजेचे आहे. हे काम प्रचंड मोठे आहे. यात स्थानिक लोकांचा (शेतकऱ्यांचा) सहभाग महत्त्वाचा असतो. हे अहमदनगर जिल्हयातील राळेगणसिध्दी, औरंगाबाद जिल्ह्यातील आडगाव, पळसखेड आणि पुणे जिल्ह्यातील नायगाव या गावांनी सिध्द करून दाखविले आहे.

## सूचनाः

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी अनुदानित विहिरी योजना सुरू केल्या. त्याचा लाभ असंख्य शेतकऱ्यांना झाला आहे. विशेषत: जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या योजना वरदान ठरल्या आहेत. मात्र योजना शासकिय पातळीवर राबविल्या जात असल्याने त्यात काही त्रुटी आहेत. त्या घालविण्यासाठी आणि योजनेचे लाभ लाभार्थी शेतकऱ्यांना व्यापक प्रमाणात कसे मिळतील यासाठी पुढील सूचना करता येतील.

१. योजनेची व्यापकता वाढविण्यात यावी.
२. योजनेच्या लाभार्थींची निवड करताना अनेक गैरप्रकार होतात. अशा असंख्य शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. ते गैरप्रकार थांबविण्यात यावेत.
३. या योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान वाढत्या

खर्चाच्या मानाने तोकडे पडते; त्यात वाढ करण्यात यावी.

४. विहिरीच्या मंजूरीसाठी खूप विलंब लागतो. तो टाळण्यात यावा.

५. तुषार व ठिंबक सिंचनाचा व्यापक प्रमाणात वापर व्हावा म्हणून शेतकऱ्यांना शासनाच्या पातळीवर प्रेरणा देण्यात याव्यात.

६. तुषार व ठिंबक सिंचनासाठी शासनाने १००% अनुदाने द्यावित.

७. तुषार व ठिंबक सिंचनासाठी शासनाकडून दिली जाणारी अनुदाने शेतकऱ्यांना वेळेवर मिळत नाहीत. त्यात होणारा विलंब थांबवावा.

८. चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद यांच्या माध्यमातून जलव्यवस्थापनाचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे.

९. लाभार्थी शेतकऱ्यांना विहिरीवर विद्युत पंप बसविण्यासाठी विद्युतमंडळाकडून सहकार्य मिळत नाही. याउलट अनेक अडथळे आणून विलंब लावला जातो. ही अडचण युध्द पातळीवरील समजून त्वरित दूर करण्यात यावी.

१०. शेती वापरासाठी कमी दाबाने विद्युत पुरवठा होतो. परिणामी शेतकऱ्यांचे विद्युत पंप वारंवार जळतात. त्यामुळे शेती वापरासाठी योग्य दाबाने विद्युत पुरवठा करण्यात यावा.

११. शेती वापरासाठी पुरविण्यात येण्याऱ्या विद्युत पुरवठ्याचे भारनियमन करण्यात येऊ नये. शेतीसाठी नियमित विद्युत पुरवठा करण्यात यावा.

१२. शेतकऱ्यांना स्वत: व रास्त व्याजदराने आणि नियमित कर्ज पुरवठा करण्यात यावा.

१३. मृद व जलसंधारण, पाणी अडवा, पाणी जिरवा मोहीम व्यापक प्रमाणात राबविण्यात यावी.

महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित विहिरी योजना व त्या योजनेअंतर्गत वितरित झालेल्या विहिरींमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. या विहिरी जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरल्या आहेत. मात्र या योजनेमध्ये काही त्रुटी आहेत. त्यासाठी उपरोक्त सुचनांची शासनाने दखल घेऊन या योजनेतील व्यापकता वाढविल्यास जळगाव जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना या विहिरी भविष्यातही वरदानच ठरतील. देशात औद्योगिक दृष्ट्या प्रथम क्रमाकांचे महाराष्ट्र हे राज्य शेती उत्पादनातही प्रथम क्रमांक मिळवेल आणि सर्वार्थाने देशातील एक अग्रगण्य व महान राज्य म्हणून महाराष्ट्रच असेल!

**संदर्भग्रंथ:**

१) *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* - संतोष दास्ताने,

२) *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* - कुरुलकर

३) *मेगा महाराष्ट्र* - सवदी

४) महाराष्ट्र शासन - वेबसाईट

५) जळगाव जिल्हा परिषद कार्यालय - उपरोक्त योजनांसंदर्भात माहिती

६) संबंधित जिल्ह्यातील पालकमंत्री, आमदार, जि.प.अध्यक्ष, सदस्य, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच व लाभार्थी शेतकऱ्यांच्या मुलाखती.

७) दैनिक सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रे.

(पीएच्.डी. प्रबंधाचा सारांश)

# शासकीय उपयोजनांचा अनुसूचित जमातीवरील आर्थिक-सामाजिक परिणामांचा अभ्यास

**चव्हाण सीमा रविंद्र**, श्रीरामपूर
रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, जि.अहमदनगर
आजीव सभासद क्र. १२०६
भ्रमणध्वनी: ९९२१२०९२७०

**प्रस्तावना:**

भारतीय समाज विविधतेने नटलेला मानव समाज आहे. वंश, भाषा, धर्म, संस्कृती इ. बाबतीत भारतीयांमध्ये विविधता आहे. प्रत्येक मानव समाजाच्या संस्कृतीमध्ये काही समानता व काही मतभेद असणे स्वाभाविक आहे. सर्वच मानव समाज संस्कृती विकासाच्या एकाच अवस्थेत नसतात. काही समाज आकाराने लहान, अप्रगत आणि संस्कृती विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत असलेले आढळतात. भारतात असे अनेक लहान मोठे मनुष्यगट आहेत. अशा आदिम किंवा आदिवासी लोकांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास प्रामुख्याने सामाजिक मानवशास्त्रात केला जातो. इंग्रजांच्या आगमनानंतर भारतातील आदिवासी समाजाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला चालना मिळाली.

आदिवासी जमात ही जगाच्या सर्वच भागात आढळते. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. उदा. अमेरिकत त्यांना 'रेड इंडियन्स' असे म्हणतात. ऑस्ट्रेलियात त्यांना 'अबोरिजन्स', युरोपिय देशात 'जिप्सी' तर अफ्रिकी आणि अशियायी देशात 'आदिवासी' या नावाने परिचित आहेत. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतामध्ये सर्वसाधारणतः त्यांना आदिवासी म्हणजे मूळ निवासी असे म्हटले जाते. तथापि भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.२ टक्के (२००१) लोकसंख्या असलेल्या

या समुहास भारतीय राज्यघटनेनुसार 'अनुसूचित जमाती' असे वर्गीकृत करण्यात आले आहे. हा शब्दप्रयोग त्या जनसमुदायाकरिता केला जातो, ज्यास भारतीय राष्ट्रपतींनी भारतीय संविधानाच्या कलम ३४२ अन्वये प्रमाणित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते. भारतीय समाजातील अत्यंत दुर्बल घटक म्हणून आदिवासींच्या अनुसूचित जमाती शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन त्यांचा विकास करण्यासाठी आणि त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध आहे. त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्राच्या तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्र सरकारने केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वे या भारताच्या संविधानातील राज्यधोरणाच्या निर्देशक तत्त्वांच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्य शासन आदिवासींच्या सर्वांगिण विकासाच्या उद्देशाने आदिवासी उपयोजना तयार करुन राबवित आहे. यानुसार महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातील ७३ तालुक्यातील ६७६७ गावांचा आदिवासी उपयोजनेत समावेश करण्यात आला. यामध्ये ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, नांदेड या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला.

## आदिवासी उपयोजनेचे स्वरुप:

आदिवासींच्या आर्थिक आणि भौतिक विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आदिवासी उपयोजना कार्यक्रम राबविण्यात आला आणि विकासखंडांना एकत्रित करुन त्यास एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प असे संबोधण्यात आले. जिल्ह्यापेक्षा लहान मात्र विकासखंडापेक्षा मोठा असा हा एकक असून त्यात तळागाळापासून लोकांच्या व क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन योजनांचे नियोजन करुन ते विकासखंड, विकास प्रकल्प, राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत जाईल अशी प्रक्रिया अपेक्षित होती. महाराष्ट्रात १९७४-७५ मध्ये ही योजना लागू करण्यात आली.

१. कोणत्याही घटक राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात आदिवासींच्या विकासासाठी व कल्याणासाठी योजना तयार करण्याचे कार्य हा राज्याच्या संपूर्ण योजनेचा एक भाग राहील, म्हणून त्यास उपयोजना म्हटले आहे.
२. उपयोजनेवर प्रायोजित निधी हा त्या राज्यातल्या आदिवासी लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणात असावयास हवा.
३. उपयोजनेत खालील कार्यनीतीची संकल्पना येते.
   अ) उपयोजना क्षेत्रासाठी संसाधने ठरविणे.
   ब) विकासासाठी मोठ्या प्रमाणात कार्यनीतीचा आराखडा तयार करणे.
   क) योजना कार्यान्वित करण्यासाठी योग्य ती प्रशासकीय संरचना निश्चित करणे.

## उपयोजनेची उद्दिष्टे:

१) राज्यातील आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्या विकासातील अंतर भरुन काढणे.
२) आदिवासींच्या राहणीमानाचा दर्जा सुधारणे.
३) त्यांना भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या समस्यांची सोडवणूक करणे आणि त्यांची पिळवणूक थांबविणे.
४) त्यांची सामाजिक व आर्थिक विकासाची

गती वाढविणे.

५) राज्याच्या एकूण योजनाबध्द आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या फळांच्या योग्य हिस्सा आदिवासींना मिळावा व त्या दृष्टीने योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा रास्त हिस्सा आदिवासी क्षेत्रासाठी व आदिवासींच्या विकासासाठी उपलब्ध व खर्च व्हावा, यासाठी आदिवासी उपयोजना राबवित आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives):**

''शासकीय उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास'', प्रस्तूत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. पारधी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे

२. पारधी समाजातील शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागासलेपणाची कारणे शोधणे.

३. पारधी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी शासन करत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

४. जळगांव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यात आदिवासी उपयोजनेअंतर्गत २००१-०२ ते २००९-१० या काळात करण्यात आलेल्या खर्चाचा अभ्यास करणे.

५. आदिवासी उपयोजनेवर केलेल्या खर्चाचे वर्षनिहाय आणि योजनानिहाय वाटप कशा पध्दतीने अभ्यास काळात करण्यात आले याचा अभ्यास करणे.

६. या योजनेची कार्यक्षम अंमलबजावणी होऊन परिणामकारक फलश्रुती निष्पन्न होण्यासाठी विश्लेषणात्मक निष्कर्षाच्या आधारे आवश्यक शिफारसी करणे.

**संशोधन पध्दती:**

अभ्यासाशी संबंधित माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

**अ) प्राथमिक साधन सामग्री:**

संशोधनासाठी आवश्यक प्राथमिक माहिती व आकडेवारी संकलित करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सर्वेक्षणासाठी स्तरीत, यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा (Stratified Random Sampling Method) अवलंब केला आहे. प्रथम स्तरावर धुळे, जळगाव आणि नंदुरबार या जिल्ह्यातील तालुक्यामधून आदिवासी उपयोजना कार्यक्षेत्र असणारे तालुके निवडले आहे. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील तीन तालुके (यावल, रावेर, चोपडा) धुळे जिल्ह्यातील दोन तालुके (शिरपूर व साक्री) आणि नंदुरबार जिल्ह्यातील सहा तालुके (नंदुरबार, तळोदा, अक्राणी, शहादा, अक्कलकुवा आणि नवापूर) असे एकूण ११ तालुके निवडले आहे.

द्वितीय स्तरावर सर्वेक्षणासाठी निवडलेल्या ११ तालुक्यामधून आदिवासी उपयोजनेचे पारधी समाजातील लाभार्थींची निवड केली आहे. अभ्यासकाळात आदिवासी उपयोजनेचे

पारधी समाजातील एकूण २१०० लाभार्थी कुटूंबे होती. त्यापैकी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने १० टक्के म्हणजेच २१० लाभार्थी कुटूंबाची सर्वेक्षणासाठी निवड केली.

**दुय्यम साधन सामग्री:**

अभ्यासासाठी आवश्यक द्वितीय माहिती व आकडेवारी महाराष्ट्र शासनाचे वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल (२००१-०२ ते २००९-१०) आदिवासी संशोधन केंद्राची संशोधन पत्रिका, महाराष्ट्र शासन जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांचे आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल २००१-०२ ते २००९-१० याव्यतिरिक्त विविध संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे आणि विविध संकेत स्थळांवरुन संकलित केली आहे.

जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी उपयोजना कार्यरत असणाऱ्या तालुक्यांची प्रामुख्याने सर्वेक्षणासाठी निवड केली आहे. २००१-०२ ते २००९-१० हा अभ्यासाचा कालखंड आहे.

**प्रमुख निष्कर्ष:**

१) सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येतील (८,४३,२६,२४०) पुरुषांचे प्रमाण (४,२६,४०, ९२९ म्हणजेच ५०.५७ टक्के) आणि स्त्रियांचे प्रमाण (४,१६,८५,४११ म्हणजेच ४९.४३ टक्के) आहे.

२) महाराष्ट्रातील एकूण पारधी जमातीच्या लोकसंख्येपैकी जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील २००१ च्या जनगणेनुसार अनुक्रमे पारधी लोकसंख्येचे प्रमाण १२.५४ टक्के ०.०७ टक्के व ०.०१ टक्के आढळून येते.

३) महाराष्ट्रातील योजनेचे सरासरी ८६.३७ टक्के वित्तीय लक्ष्य साध्य झाल्याचे निदर्शनास येते. सन २००१-२०१० या कालावधीत नियतव्यय आणि प्रत्यक्ष खर्चाचे वित्तीय लक्ष्य सरासरी ८६.३७ टक्क्यांनी साध्य झाले. सरकार जवळजवळ १४ टक्के खर्च साध्य करु शकले नाही. तर योजना काळात आदिवासी उपयोजनेचे वित्तीय लक्ष्य ७७.०३ टक्के म्हणजे कमी साध्य झाले आहे.

४) अभ्यास क्षेत्रातील नमुना कुटूंबाचे साक्षरता प्रमाण ४९.०७ टक्के एवढे आहे. नमुना कुटुंबातील स्त्री साक्षरता प्रमाण ३७.९६ टक्के आणि पुरुष साक्षरता प्रमाण ५९.१४ टक्के एवढे तुलनेने जास्त असल्याचे आढळले.

५) नमुना कुटुंबातील ४३.३३ टक्के भूमिहीन शेतमजुरांची कुटूंबे आहेत. ३२.८६ टक्के सीमांत शेतकऱ्यांची तर २३.८१ टक्के अल्पभूधारक शेतकऱ्यांची आहेत.

६) नमुना कुटुंबातील ९८ टक्के २०४ कुटुंबास आदिवासी उपयोजनेचे लाभ घेण्यासाठी अर्जासोबत लागणारी कागदपत्रे उपलब्ध करण्यासाठी जास्तीचे

प्रयत्न करावे लागतील. तर केवळ २ टक्के म्हणजे ६ कुटूंबास कागदपत्र सहज मिळाली आहेत. ही कागदपत्रे तयार करण्यासाठी कमीत कमी रु. १५० आणि जास्तीत जास्त रु. ३०० खर्च करावे लागल्याचे स्पष्ट होते.

७) नमुना कुटूंबांनी ज्या कार्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत (पारधी समाजासाठी) लाभ घेतला त्यापैकी केवळ १४.२९% कुटूंबांचा उद्देश साध्य झाला तर ११.९० टक्के कुटूंबांचा अल्प प्रमाणात उद्देश साध्य होऊ शकला तर ७३.८१ टक्के कुटुबांचे लाभ मिळविण्याचे उद्दीष्ट अपूर्णच राहीले आहे.

८) आदिवासी उपयोजनेमुळे ६४.२९ टक्के कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाल्याचे स्पष्ट होते. त्यात ६२.६४ टक्के भूमिहीन शेतमजूरांचा ६६.६७ टक्के सीमान्त शेतकऱ्यांचा तर ६४ टक्के अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. केवळ ३५.७२ टक्के कुटूंबांनाच याचा लाभ झालेला नाही. यामध्ये भूमिहीन शेतमजूर, सीमान्त शेतकरी आणि अल्पभूधारक शेतकरी यांचे कुटूंब अनुक्रमे ३७.३६ टक्के, ३३.३३ टक्के आणि ३६ टक्के प्रमाण आहे.

९) आदिवासी उपयोजनेबाबत माहिती नमुना कुटूंबातील ३४.७६ टक्के कुटूंबास ग्रामपंचायत पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झाली आहे; २४.२८ टक्के कुटूंबास नातेवाईक व मित्र मंडळी/स्थानिक नेते यांच्याकडून मिळाल्याचे स्पष्ट होते. १६.१९ टक्के कुटूंबास संबंधित कार्यालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळा व प्रशिक्षण शिबीरातून १८.८६ टक्के प्रसार माध्यमाद्वारे आणि ११.९१ टक्के कुटूंबांनी स्वतः आदिवासी उपयोजनेची माहिती जाणून घेतल्याचे आढळून आले.

१०) नमुना कुटूंबातील १४७ (७१ टक्के) कुटूंबांनी आदिवासी उपयोजनेचे अंतर्गत समाविष्ट घटक/बाबींचा लाभ घेण्यासाठी विविध संस्थांकडून कर्ज मिळाले तर (३० टक्के लाभार्थी कुटूंबास भौतिक सुविधा पुरविल्या आहेत.)

११) कर्ज मिळालेल्या कुटूंबापैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून ८० (५०.४२ टक्के) कुटूंबांना, प्राथमिक सहकारी पतसंस्थाकडून ३५ (२३.८१ टक्के) स्टेट बँक ऑफ इंडियाकडून २० (१३.६१ टक्के) आणि बँक ऑफ महाराष्ट्रद्वारे १२ (८.१६ टक्के) कुटूंबास कर्ज वाटप केल्याचे आढळून आले आहे.

१२) नमुना कुटूंबातील आदिवासी उपयोजनेचा लाभ मिळविण्यासाठी ९.५२ टक्के कुटूंबाना रु. १०००/-, १६.६७ टक्के कुटूंबांना रु. २०००/-, २४.२९ टक्के कुटूंबांना रु. ३,०००/- ३३.३३ टक्के कुटूंबांना रु. ४०००/-, १२.३८ टक्के कुटूंबांना रु. ५०००/- आणि ३.८१ टक्के कुटूंबांना रु. ६०००/- पेक्षा जास्त खर्च करावा लागला.

१३) आदिवासी उपयोजनेचे लाभ

मिळण्यासाठी केलेल्या एकूण खर्चाच्या सरासरी सर्वात जास्त म्हणजेच ४०.८९ टक्के मध्यस्थ व अधिकाऱ्यांना देण्यावर खर्च झाला. त्या खालोखाल ३८.०५ टक्के खर्च हा रोजगार बुडाल्यामुळे १८.३० टक्के खर्च प्रवास खर्चावर तर सर्वात कमी खर्च म्हणजेच ३.०९ टक्के एवढा कागदपत्र तयार करण्यासाठी नमुना कुटूंबांना करावा लागतो.

१४) आदिवासी उपयोजनेचा लाभ घेतल्यानंतर नमुना कुटूंबातील ६९.७ टक्के कुटूंबाच्या शेती उत्पादनात वाढ झाली आहे. तर ३०.०३ टक्के कुटूंबाच्या शेती उत्पादनात वाढ झाली नाही.

१५) आदिवासी उपयोजनेच्या लाभानंतर नमुना कुटूंबाच्या वर्षात मिळणाऱ्या रोजगारांच्या दिवसात वाढ झाल्याचे दिसून येते. आदिवासी उपयोजनेच्या लाभामुळे नमुन्यातील भूमिहीन शेतमजूरांच्या वर्षातील रोजगारांच्या सरासरीत १५ दिवसांची वाढ झाली. सीमान्त शेतकरी कुटूंबाच्या सरासरीत ११.३ दिवसांनी, अल्पभूधारक शेतकरी कुटूंबांच्या सरासरीत ३.१२ दिवसांची तर एकुण कुटूंबाच्या वर्षातील रोजगार दिवसात १०.८९ ने वाढ झाल्याचे दिसून येते.

१६) आदिवासी उपयोजनेमुळे ६४.२९ टक्के कुटूंबांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाल्याचे स्पष्ट होते. त्यात ६२.६४ टक्के भूमिहीन शेतमजूरांचा, ६६.६७ टक्के सीमान्त शेतकऱ्यांचा तर ६४ टक्के अल्पभूधारक शेतकऱ्यांचा समावेश आहे. केवळ ३५.७२ टक्के कुटूंबांनाच याचा लाभ झालेला नाही. यामध्ये भूमिहीन शेतमजूर, सीमान्त शेतकरी आणि अल्पभूधारक शेतकरी यांचे कुटूंब अनुक्रमे ३७.३६ टक्के, ३३.३३ टक्के आणि ३६ टक्के प्रमाण आहे.

१७) आदिवासी उपयोजनेचा नमुना कुटूंबाच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत बदल घडून आणू शकतो कारण अभ्यास काळात नविन शेतजमिनीची खरेदी करणारे १.९० टक्के कुटूंब होते. राहण्यासाठी नवीन प्लॉटची खरेदी ५.७१ टक्के कुटूंबांनी केली. पशुधन खरेदी १३.३३ टक्के कुटूंबांना केली. वाहनांची खरेदी २.६८ टक्के कुटूंबांनी केली. शेती सुधारण्यासाठी ६.१९ टक्के उद्योग/धंद्यात जास्त गुंतवणूक करणारे ८.५७ टक्के शिक्षणावरील खर्चात वाढ करणारे ३७.१४ टक्के कुटूंबे आहेत. विवाह/उत्सव यावरील खर्चात वाढ करणारे १०.४८ टक्के, औषध व आरोग्यासाठीच्या खर्चात वाढ करणारे ३.८० टक्के कुटूंबे आहेत. तर कुटूंबाच्या राहणीमानात व दृष्टीकोनात सुधारणा झालेले ५४.२९ टक्के कुटूंबे असल्याचे आढळून आले.

**शिफारसी:**

१) अनूसचित जमाती व पारधी समाजातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत सुधारणा आणि त्यांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ करुन त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी

सातत्याने उत्पन्न मिळवून देणाऱ्या रोजगार संधी उपलब्ध करुन देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षण व प्रशिक्षण देणारी विविध कार्यक्रम व योजना आदिवासी उपयोजनेत राबवाव्यात.

२) शासकीय उपयोजनांचे सुसूत्रीकरण करुन योजनांची वारंवारिता टाळणे आवश्यक आहे आणि आदिवासी उपयोजनांची पडताळणी करुन योजना मूल्यांकनाची गरज आहे.

३) भारत सरकारने 'कल्याणकारी राज्याचे' धोरण स्वीकारल्यामुळे संपूर्ण देशाचा, राज्याचा, गावाचा, तालुक्याचा विकास होणे आवश्यक आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक दुर्बल घटकाचा विकास होण्याच्या अनुषंगाने शासनाने अनुसूचित जमातीतील लोकांची भविष्यकालीन निकड विचारात घेऊन विकासाची खरी गरज त्याची आहे या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे.

४) अनुसूचित जमातीतील पारंपरिक व्यवसायातून लोकांचे इतर व्यवसायात स्थलांतर करण्यासाठी व्यवसायिक प्रशिक्षण देणाऱ्या तसेच माहिती व तंत्रज्ञान यासारख्या नविन क्षेत्रात त्यांना सहभागी करुन घेण्यासाठी शासकीय आदिवासी उपयोजनेत नवीन योजना तयार कराव्यात.

५) विशेषतः पारधी समाजातील लोकांवर जो गुन्हेगारीचा कलंक लागलेला आहे तो पुसून काढण्यासाठी त्यांना विविध क्षेत्रात शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सुरू केलेल्या योजनांवर भर देण्यात यावा. यामुळे देशात, राज्यात, गावात सर्व पातळीवर शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होण्यास मदत होईल.

६) आदिवासी उपयोजनेवरील खर्चाचे क्षेत्रनिहाय व योजनानिहाय वाटप करण्यासाठी योग्य निष्कर्षांची निवड करुन बदलत्या परिस्थितीत प्राधान्य क्रमाने वाटपाच्या प्रमाणात बदल केला जावा.

७) आदिवासी उपयोजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जासोबत अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. यासाठी लाभार्थींचा रोजगार, वेळ आणि पैसा खर्च होतो. कागदपत्रांची संख्या कमी करावी अथवा ती कागदपत्रे सुलभ रीतीने उपलब्ध होतील, अशी सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

८) आदिवासी उपयोजना ही केंद्र व राज्य सरकारच्या वेगवेगळ्या विभाग व खात्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना व कार्यक्रमांतर्गत त्यांच्याकडून राबविली जाते. त्यामुळे योजनेचे खरे स्वरुप व व्याप्ती लक्षात येत नाही. या विभागाच्या समन्वयाचा आणि पुरेशा प्रशासकीय यंत्रणेचा मोठा अभाव दिसून येतो. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना या योजनेची पुरेशी माहिती पुरविली जात नाही. योजनेच्या अंमलबजावणीत मोठी गुंतागुंत निर्माण होते. म्हणून आदिवासी उपयोजनेची कार्यक्षम अंमलबजावणी आणि

परिणामकारक फलश्रुतीसाठी स्वतंत्र व कार्यक्षम यंत्रणा स्थापन करावी.

९. आदिवासी उपयोजना निहाय घटक अनुदान व अर्थसहाय्य दिले जाते. या घटकांची बाजारातील किंमत विचारात घेऊन बाजारातील किंमत निर्देशांकानुसार अनुदान व अर्थसहाय्य निश्चित करावे.

१०) या सर्वेक्षणात असे दिसून आले की, आदिवासी उपयोजनेचा लाभ घेऊनही बऱ्याच कुटूंबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे शक्य झाले नाही. त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी नविन पुरवणी योजना सुरु कराव्या. तसेच अस्तित्वात असलेल्या काही योजनांचा विस्तार करावा.

## संदर्भग्रंथः


1. Accord, Report of *'The study on Tribal Land Allienation'* In the state of Tamil Nadu'.

2. Agrawal A. K. (1981) *Indian Agriculture Problem Progress & Prospects,* Vikas Publishing House Pvt. Ltd. Delhi.

3. Bose Nirmal Kumar (2002) *'Tribal Life in India'*, National Book Trust India' Delhi.

4. Dhebar, U. N. (1961) Report of the *'Scheduled Areas and Scheduled Tribes Commission'*, Publication Div. Govt. of India.

5. Mhaske B. S. (2000) *'The Financial Allocation Under Tribal Sub-plan in Maharashtra'* R. S. Solounke (Ed), Issues in Indian Economic Development Kailash Publication; Aurangabad.

6. Vidyarthy, L. P. & B. K. Rai (1977) *'Tribal Culture of India'*, Concept Publishing Company, Delhi.

7. Meanon, P. S. K. *'Tribal Development Policies, Plans and Programmer'*, Yojna, April 2002.

8. *Government of India Annual Report, 2001-02, 2002-03, 2004-05, 2005-06, 2007, 2008, 2009, 2010,* Ministry of Human Resource Development New Delhi.

9. *Govt. of India Annual Plan 2001-02 to 2009-10* Planning Commission, New Delhi.

10. *Govt. of India Report of the Steering Committee on*

*Empowering the Scheduled Tribes for the 10th five year plan (2002-2007)*, Planning commission, New Delhi.

*(संशोधिकेने ''शासकीय उपयोजनांचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास'' या विषयावर डॉ. वसुधा पुरोहित, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादित केली आहे.)*

---

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर २०११ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०११ ते ३१/१२/२०११ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१२ पर्यंत पाठवाव्यात.

अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

## ग्रंथ परीक्षण

# ज्ञानेश्वरीतील अर्थविचार

मंजुषा मुसमाडे, पुणे
नौरोसजी वाडिया कॉलेज
आजीव सभासद क्र. ९३१
भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२५

*(ग्रंथ लेखक म. रा. कुलकर्णी (२०११) स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.)*

**प्रस्तावना:**

अध्यात्म व अर्थशास्त्र या दोन विचारशाखांची सांगड घालणे तसे पाहता अवघडच नव्हे तर अशक्यच वाटते. किंबहुना या दोन विचारसरणीत विरोधाभासच आहे, अशी प्रचलित समजुत आहे. कारण भारतीय अध्यात्म हे गूढ, निवृत्तीपर व दैववादी असल्याची धारणा आहे. याउलट अर्थशास्त्र तर क्रियाशील, व्यवहारवादी व प्रमाणित सामाजिक शास्त्र आहे असे मानले जाते.

ज्ञानेश्वरीसारख्या मराठीतील आद्य अध्यात्मिक ग्रंथात आर्थिक स्वरूपाचे विचार असणे कल्पनेच्या बाहेर वाटते. परंतु वरील पुस्तकात या दोन विषयांची पद्धतशीर सांगड घालून अर्थविचारांचे नवे पैलू व आवाका दाखवून दिला आहे.

**प्राथमिक माहिती:**

पुस्तकाचे लेखक म. रा. कुलकर्णी हे मूळचे अर्थशास्त्राचे विद्यार्थी व प्राध्यापक. त्यांची मुख्य कारकीर्द नियोजन आयोगात अर्थतज्ज्ञ म्हणून झाली. निवृत्तीनंतर अध्यात्मिक वाचनाचा छंद जडला. त्यातूनच मूळ अभ्यासविषय अर्थशास्त्र व ज्ञानेश्वरीसारख्या अध्यात्मिक गीतेवरील समीक्षाग्रंथातील साम्यस्थळे दर्शवण्याचा स्तुत्य प्रयत्न त्यांनी केला आहे. सुमारे १६० पृष्ठांचे हे पुस्तक लहान लहान २६ प्रकरणात विभागले आहे. त्यात प्रामुख्याने ज्ञानेश्वरीचे सामाजिक आर्थिक विश्लेषण एक आढावा ॲडम स्मिथ व ज्ञानेश्वरी, अर्थशास्त्राची उद्दिष्टे व ज्ञानेश्वरी आणि सुवर्ण वैश्य, कृषी व आर्थिक व्यवहार, चलनपद्धती, काही संकीर्ण आर्थिक सिद्धांत, ज्ञानेश्वरांचा चराचरवाद अशी प्रकरणे उल्लेखनीय आहेत. ज्ञानेश्वरीच्या विविध अंगाने झालेल्या अभ्यासाचा जागोजागी औचित्यपूर्ण संदर्भ लेखकाने दिला आहे.

**परीक्षण:**

ज्ञानेश्वरीच्या सामाजिक, आर्थिक विश्लेषणाचा आढावा घेऊन लेखकाने १२ व्या शतकातील कालमानस्थितीचा उहापोह केला आहे. अर्थशास्त्रातील परंपरावाद, मार्शलचा समन्वयवाद यांच्या अनुषंगाने स्मिथ व ज्ञानेश्वरीतील साम्यस्थळे लेखकाने दाखवली आहेत. स्मिथच्या अदृश्य हात संकल्पनेला पूरक अशी उदाहरणे ज्ञानेश्वरीत आढळतात. हा एक आश्चर्यकारक योगायोग लेखकाने दाखवला आहे.

संपत्तीचा ज्ञानेश्वरीतील उल्लेख (१६-६६) महत्त्वाचा आहे. एकमेकांना पोसणारे असे पुष्कळ पदार्थ जेथे एका ठिकाणी मिळविले जातात. त्याला संपत्ती म्हणतात, अशा अर्थाची ओवी दिली आहे.

ज्ञानेश्वर कालीन जनजीवन व राहणीमान दर्शवणाऱ्या अनेक ओव्या एका स्वतंत्र प्रकरणात चर्चिल्या आहेत. ज्ञानेश्वर काळी महाराष्ट्रात सुबत्ता नव्हती. शहरे आणि खेडी यांच्या राहणीत तफावत होती. विषमताही होतीच. बलुतेदारी व शहरी सुखवस्तू राहणीमानाचीही जागोजागी आढळणारी उदाहरणे लेखकाने संदर्भासहित दिली आहेत. वर्णाश्रमधर्म व अर्थसाधना या महत्त्वपूर्ण विषयावर विवेचन करताना लेखकाच्या मते गुणकर्मानुसार व्यवहाराधिष्ठित व्यवस्थाही ज्ञानेश्वरांना अन्यायकारक वाटली व स्त्री शूद्रादिकांना मोक्षाचा घाट उतरणे सोपे व्हावे असाच ज्ञानेश्वरीचा प्रवास होता असे म्हटले आहे. लोकमान्य टिळकांच्या निष्काम कर्मयोगाच्या प्रखर आस्थेमुळे त्यांना ज्ञानदेवांच्या भक्तीयोगासंबंधी आशंका होती. हा प्रचलित समज खोडून काढताना दोन्हीतील साम्य व अद्वंद्व लेखकाने संदर्भासहित सिद्ध केले आहे.

त्या काळी कृषीव्यवस्था आजच्याप्रमाणेच हलाखीची होती व अतिवृष्टी / अनावृष्टी, कर्जाच्या ओझ्याखाली खचलेली होती. कुळांची दुरवस्था, शेतीची अनिश्चितता या गोष्टी या देशाच्या पाचवीला पूजलेल्या आहेत असे विधान लेखक करतो. त्यातच राज सत्तेने कृषीसाठी फारसे काही न करता शेतसाऱ्याची मात्र सक्ती करायची ही पद्धत असल्याचे नमूद करतो.

**ज्ञानेश्वरीतील अर्थविचार :**

ज्ञानेश्वरकाळी व्यापारउदीम बराच वाढला होता. विशेषत: शहरात चलनाचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होता. त्यामुळे तत्कालिन देशी व्यापाराचे स्वरूप बरेचसे आजच्या सारखेच होते असे म्हटले पाहिजे हे लेखकाचे विधान अतिशय महत्त्वाचे आहे. तत्कालिन मबोनीफ संकल्पना, आयात निर्यात व्यापार, बारा बलुतेदारी व्यवसायाबरोबरच वेश्याव्यवसाय व जुगार अशा अनैतिक व्यवसाय / व्यवहारांचाही सांगोपांग परामर्श लेखकाने घेतला आहे.

संस्कृतीत सोने धातूचे महत्त्व व स्थान अनादि काळापासून मोलाचे आहे. त्यादृष्टीने ज्ञानेश्वरांनी केलेल्या सुवर्णाचा वेगवेगळ्या संदर्भातला उल्लेख हा स्वतंत्र संशोधनाचा विषय झाला आहे असे लेखक म्हणतात. सोन्याचा कस व भाव याविषयी ज्ञानेश्वरीत आढळणारे संदर्भ, त्यावर इतरांचे विचार व स्वत: लेखकाने अभ्यासून ठरवलेले मत ही चर्चा / प्रकरण खरोखरच रंजक झाले आहे. चलनपद्धतीसंबंधात लिहिताना लेखकाने प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत चलन पद्धतीत झालेल्या बदलाचा मागोवा घेतला आहे. खोटी नाणी, सोन्याची नाणी, राजमुद्रा, चामड्याचे

चलन अशा अनेक मुद्यांनी हे प्रकरण रंगले आहे.

पुस्तकाच्या अखेरीला लेखकाने काही संकीर्ण आर्थिक सिद्धांत व ज्ञानेश्वरीतील पूरक उदाहरणे यांची सांगड घातली आहे. त्यात घटती सीमान्त उपयोगिता, ग्राहकाचे सार्वभौमत्व, ग्राहकहित, शुभलाभ संकल्पना, व्यवसायनीती, अनुदान, उत्पादन घनता व उत्पादन प्रक्रिया यावरील सुंदर विवेचन लेखकानेही तेवढ्याच समर्थपणे विशद केले आहे.

गीता हा ग्रंथ केवळ शब्दपांडित्याचे शास्त्र नसून व्यवहारात यशस्वी होण्याचा मंत्र व तंत्र शिकविणारा मार्गप्रदीप आहे, हा ज्ञानदेवांचा दावा सार्थ आहे याची प्रचिती लेखकाच्याही स्पष्टीकरणातून येते. साचारी बोलाचे नव्हे हे शास्त्र। पैं. संसारा जिणहें हे शस्त्र (१५-५७६). ज्ञानेश्वरीतील क्रमयोग (Doctrine of continuous approximation) व मार्जिनची संकल्पना यावरही लेखकाने मौलिक भाष्य केले आहे. अभ्यासयोग म्हणजेच सातत्य व कुशलता यावर ज्ञानेश्वरांनी केलेले विवेचन आजच्या काळातही व्यवहार्य ठरेल हे दिसून येते.

एकेश्वर का बहुदेवता अशा वादात न पडता ज्ञानेश्वरांनी *एकंम संतम बहुधा कल्पयंति* अशी भूमिका घेतली. *यत्न तो देव जाणावा* या प्रयत्नवाद प्रवृत्तीवर गीता आणि ज्ञानेश्वरीचा रोख आहे व ते जीवन जगण्याचे शास्त्र आहे. परखड स्वावलंबनावर त्यांचा भर आहे, असे लेखक निर्विवादपणे स्पष्ट करतात. *प्रत्येक व्यक्तीला दोन आयुष्य जगता येतात. एक जन्माने मिळालेले, दुसरे कर्तृत्वाने घडवायचे!* असे मौलिक विधान लेखक ज्ञानेश्वरीचा प्रयत्नवाद स्पष्ट करताना करतात.

ख्रिस्ती समाजवादी व उत्क्रांतीवाद बायबल, गूढवादी, टॉलस्टॉय व रस्किनचा विचारवाद, उदारमतवाद पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ व ज्ञानेश्वरी विचारांतील समान दुवे शोधताना मार्क्स व ज्ञानेश्वर यांना जोडणारे सूत्र न आढळल्याने पुस्तकात मार्क्सवादाचा उहापोह केला नाही, अशी स्पष्ट कबुली लेखक देतात. मात्र ज्ञानेश्वर व मार्क्स यांच्यात समान दुवा नाहीच असे नाही व मानवतावादाच्या आधारे हा दुवा मांडता येतो असे लेखक सांगतात.

**समारोप :**

पुस्तकाचे बाह्यरूप आकर्षक आहे. लेखकाची प्रवाही शब्दकळा व सहज साधी शैली उदाहरणे देऊन भाष्य करण्याची पद्धत यामुळे एका वेगळया विषयावरचे हे पुस्तक मराठी अर्थसाहित्यात महत्त्वाचे ठरेल यात शंका नाही.

# डोंगरी भागातील जनतेला सक्षम सार्वजनिक वितरण व्यवस्थेची गरज

**खोत मल्लू राजाराम, कोल्हापूर**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ.
आजीव सभासद क्र. १३३०
भ्रमणध्वनी ८६२३८७२५९२

**प्रस्तावना:**

'आवश्यक वस्तूचे वितरण सरकारी नियंत्रित किमतीनुसार स्वस्त धान्य दुकानामार्फत अथवा रेशनदुकानामार्फत देशातील गरीब जनतेला पुरवठा करणे म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्था होय.' भारत सरकारने सर्वप्रथम १९३९ साली सार्वजनिक वितरण व्यवस्थेची सुरुवात मुंबई शहरातून केली. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा महत्त्वाचा हेतू अन्नधान्याच्या कमतरतेच्या काळात उपभोक्त्याचे/ग्राहकाचे भाववाढीपासून संरक्षण करून किमती स्थिर ठेवणे हा होता. ज्या वस्तूची मागणी अलवचिक आहे. अशा वस्तूंचा पुरवठा काही कारणाने कमी झाल्यास त्या वस्तूच्या किमतीत भरमसाठ वाढ होते. विशेषत: अशा वस्तू या शेतीतील असतात. अशा वेळी सार्वजनिक वितरण व्यवस्था आपली महत्त्वाची भूमिका बजावून देशातील विशेषत: गरीब जनतेला योग्य दरात धान्य पुरविण्याचे काम करते. ज्या वस्तू अत्यंत आवश्यक आहेत अशा वस्तू उदा. गहू, तांदुळ, रॉकेल, साखर, खाद्यतेल, कापड, चहा, डाळी इ. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविल्या जातात. अशा वस्तूंच्या किमती बाजारातील किमतीपेक्षा कमी ठेवल्या जातात. कारण देशातील गरीब जनतेला अशा वस्तूंची खरेदी करणे शक्य व्हावे व देशातील कुपोषण व दारिद्र्याचे प्रमाण कमी व्हावे अशा पद्धतीने अन्नसुरक्षिततेसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेची उभारणी झालेली आहे. यासाठी खेड्यामध्ये मजुरीच्या स्वरूपातही अन्नधान्याचा पुरवठा केला जातो.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेची उद्दिष्टे:

**१. दारिद्र्य कमी करणे**

देशातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट घडवून आणण्यासाठी गरिबांना

कमी किमतीत अन्नधान्य पुरविले जाते तसेच साठवून ठेवलेले धान्य पुरविले जाते.

**२. दुष्काळावर मात करणे**

देशात विविध ठिकाणी पडणाऱ्या दुष्काळावर मात करण्यासाठी दुष्काळी भागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्य पुरविण्याची व्यवस्था केली जाते.

**३. कुपोषण कमी करणे**

देशातील कुपोषित लोकांना कमी किंमतीत अथवा मोफत अन्नधान्य पुरविण्याची खात्री देऊन कुपोषिततेचे प्रमाण कमी करण्यास सहाय्य करणे.

**४. आर्थिक विषमता कमी करणे**

देशातील गरीब आणि श्रीमंत यामध्ये वाढत चाललेली दरी श्रीमंतावर कर लादून गरिबांना अगदी अल्प किमतीत किंवा मोफत धान्य पुरवठा करून कमी करणे. थोडक्यात देशातील आर्थिक विषमता कमी करणे.

**५. रोजगार निर्मिती**

देशातील जनतेला विविध ठिकाणी कामासाठी धान्य देऊन रोजगार निर्मिती घडवून आणली जाते.

**६. अन्नसुरक्षा देणे**

देशातील जनतेला सक्रीय व स्वस्थ आयुष्यासाठी पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे आहे.

**७. आर्थिक व सामाजिक विकास**

देशातील गरीब जनतेला कमी किमतीत अन्नधान्य उपलब्ध करून दिल्यामुळे गरीबांची आर्थिक स्थिती व शारीरिक स्थिती सुधारली जाते. त्याचप्रमाणे समाजात चांगले वातावरण निर्माण होते. याच्या माध्यमातून आर्थिक विकास व सामाजिक विकास घडून येतो.

**अन्न सुरक्षाः**

अन्न व शेती संघटन (१९८३) : अन्न सुरक्षितता म्हणजे सर्व लोकांना सर्व वेळी भौतिक व आर्थिक या दोन्ही दृष्टीने आवश्यक मूलभूत अन्न मिळणे व त्याची खात्री देणे होय.

**अन्नसुरक्षेचे स्वरूप**

**१. भौतिक स्वरूप**

अन्नसुरक्षेसाठी देशातील जनतेच्या अन्नधान्याचे भौतिक मात्रा/परिमाणात्मक मात्रा पुरेशा प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक आहे. यासाठी अन्नधान्याचे राखीव साठे मोठ्या प्रमाणात असणे आवश्यक आहे.

**२. गुणात्मक स्वरूप**

केवळ परिमाणाच्या दृष्टीने अन्नधान्याची उपलब्धता असून चालणार नाही तर अन्नधान्यामध्ये पौष्टीक तत्त्वांचा समावेश असणे आवश्यक आहे. आहारातून प्रतिदिन प्रतिव्यक्ती २२५० कॅलरीज् मिळणे आवश्यक असते. थोडक्यात अन्नधान्य गुणात्मक स्वरूपात उपलब्ध असणे आवश्यक आहे, तरच त्याला अन्नसुरक्षा असे म्हणता येईल.

**३. वितरणात्मक स्वरूप**

देशातील सर्व लोकांना हव्या त्या प्रमाणात, योग्य त्या वेळी, योग्य त्या किंमतीत व योग्य त्या ठिकाणी अन्नधान्य उपलब्ध होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांपासून अंतिम ग्राहकापर्यंत योग्य पद्धतीने व समन्यायी वितरण होणे आवश्यक आहे.

**४. आर्थिक स्वरूप**

अन्नसुरक्षेच्या संकल्पनेत अन्नधान्याचे आर्थिक स्वरूप महत्त्वाचे आहे. देशातील अन्नधान्याच्या किमती वाजवी स्वरूपात असणे

आवश्यक असते. त्यात मोठ्या प्रमाणात चढ-उतार नसावे. देशातील जनतेचे उत्पन्न आणि अन्नधान्याच्या किमती यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. थोडक्यात देशातील जनतेकडे अन्नधान्य खरेदी करण्यासाठी आर्थिक कुवत निर्माण करणे आवश्यक असते.

**५. शाश्वत स्वरूप**

देशातील जनतेला भविष्यात कायम स्वरूपात अन्नधान्याची उपलब्धता होण्याची शाश्वती देणे व त्यानुसार उत्पादन पद्धतीत आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे. तसेच लोकसंख्या नियंत्रित ठेवणे देखील गरजेचे असते. थोडक्यात भविष्यात अन्नधान्य योग्य त्या प्रमाणात उपलब्ध होण्याची शाश्वती देणे याला अन्नसुरक्षा म्हणतात.

**निष्कर्ष:**

सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षम तसेच पूर्णपणे उपयोगी व्हावी सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार जास्तीत जास्त डोंगरी भागात तसेच आर्थिक व सामजिक मागास व्यक्तींकरता व्हावा यासाठी संशोधनात अधिक महत्त्वाचे निष्कर्ष जे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये आढळून आले ते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**अनियमित आणि अपुरा पुरवठा**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका पाहिली असता, विविध कार्डधारकांना वस्तूंचा केला जाणारा पुरवठा अनियमित आणि अपुरा आहे असे आढळून आले. प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला पुरवठा होत नाही. कधी महिन्याच्या सुरवातीला तर कधी मध्यंतरी तर कधी शेवटी त्यामुळे कार्डधारकास वाट पहावी लागते. तसेच दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय कार्डधारकांना गहू २० किलो व तांदुळ १५ किलो असे एकूण ३५ किलो धान्याचा कोटा मंजूर आहे. तसेच या कार्डधारकांना शासनाकडून मंजूर कोट्याच्या १०० टक्के धान्य मिळत नाही. काही ठिकाणी एकूण २५ किलो तर काही ठिकाणी एकूण ३० किलो, काही ठिकाणी ३२ किलो अशा दराने धान्य पुरविण्यात येते. तर केशरी कार्डधारकांना ५ किलो गहू आणि २ किलो तांदुळ असे धान्य पुरविले जाते. याबाबत सर्व रेशन धान्य दुकानदारांच्यात एकसमानता दिसून येत नाही. यावरून तांदळाचे आणि गव्हाचे कार्डधारकांना ठरवून दिलेले प्रमाण आणि सर्व कार्डधारकांना मिळणारे अन्नधान्य यामध्ये बरीच तफावत आढळून येते.

**रॉकेल वाटपाचे अल्प प्रमाण**

सार्वजनिक वितरणातील रॉकेलचे वितरण विचारात घेणे महत्त्वाचे आहे. सरकारकडून सर्व कार्डधारकांना प्रति व्यक्ति २ लिटर असे रॉकेलचे प्रमाण निश्चित केले आहे. प्रत्येक कुटुंबात सरासरी ४ ते ५ व्यक्ती असतात, त्यानुसार त्यांना ८ ते १० लिटर रॉकेलचा पुरवठा झाला पाहिजे. मात्र प्रत्यक्षात प्रति कार्डधारकास २ ते ३ लिटर रॉकेल पुरविले जाते. तर काही ठिकाणी ५ लिटर रॉकेलचा पुरवठा केला जातो. डोंगरी भागातील कोणत्याही कार्डधारकाला ५ लिटरच्या वर रॉकेल पुरविले जात नाही. येथील कार्डधारक प्रामुख्याने दारिद्र्य रेषेखालील कार्डधारक आपले दोन वेळचे जेवण बनविण्यासाठी स्टोव्हचा वापर करतात. त्यासाठी त्यांना रॉकेलची आवश्यकता

असते. याशिवाय गावात भारनियमनामुळे रात्रीच्या वेळी लाईट नसते, त्यावेळी त्यांना दिवा लावावा लागतो त्यासाठी रॉकेलची गरज असते. मात्र सार्वजनिक वितरणातून त्यांना मिळणारे रॉकेलचे प्रमाण फारच कमी असल्याने ते खुल्याबाजारातून व जादा किंमत देऊन आणण्याशिवाय पर्याय नसतो. काही वेळा जादा किंमत देऊनही रॉकेल मिळत नाही, त्यामुळे अभ्यास क्षेत्रातील डोंगरी भागात रॉकेलची तीव्र टंचाई जाणवते. संशोधनात ७५ टक्केहून जास्त कार्डधारकांनी त्यांना मिळणारा रॉकेलचा पुरवठा हा अपुरा असल्याने सांगितले आहे.

## अन्नधान्य/रॉकेल गळती आणि भ्रष्टाचार:

वरील दोन मुद्यांच्या आधारे तसेच सर्वेक्षणात ७२% कार्डधारकांकडून भ्रष्टाचार होतो असे सांगण्यात आले त्याप्रमाणे दूरदर्शनवरील, वृत्तपत्रातील आणि रेडीओवरील बातम्या यांच्या आधारे सार्वजनिक वितरणातील वाटपात केंद्रापासून स्थानिक पातळीपर्यंत कार्डधारकांच्या हातात धान्य मिळेपर्यंत पुरवठ्यात गळतीचे व भ्रष्टाचाराचे प्रमाण अधिक दिसून येते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत भ्रष्टाचार व अन्नधान्य खुल्या बाजारात विकणारी साखळीच निर्माण झाली आहे. त्यामुळे ***'आधळं दळतय आणि कुत्र पिठ खातय'*** अशी अवस्था सार्वजनिक वितरण व्यवस्थेची झाली आहे असे दिसून येते. यालाच गळती असे म्हटले जाते.

## अन्नधान्याचा असमाधानकारक दर्जा

संशोधनात ६६ टक्के कार्डधारकांनी सार्वजनिक वितरणातील धान्य निकृष्ट दर्जाचे आहे असे नमुद केले आहे. किडके, फुटाळलेले, कचरा असलेले, अनेक दिवस साठा केलेले, पिठाळलेले धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविले जाते असे पाच सरळ-सरळ कार्डधारक जनावरांना घालतात असे दिसून आले.

## कार्डधारकांचे सदोष वर्गीकरण

संशोधनामध्ये कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या डोंगरी भागातील कुटुंबांना दिली गेलेली रेशन कार्डे ही त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून आणि योग्य ती शहानिशा करून दिली जाणे आवश्यक आहे. मात्र अभ्यास क्षेत्रातील कार्डधारकांच्या वर्गीकरणात मात्र अशी परिस्थिती दिसून येत नाही. जे लोक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत अशा लोकांना देखील दारिद्र्य रेषेखालील पिवळे कार्ड दिलेली आढळतात. तर काही ठिकाणी असे आढळून आले की, जे लोक खरोखरीच दारिद्र्याचे जीवन जगतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे, खालावलेली आहे अशा लोकांचा दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या कार्डासाठी विचार केला गेलेला नाही. त्यामुळे त्यांचे जीवन अधिकाधिच हलाखीचे होत चालले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अंत्योदय योजनेअंतर्गत दिले जाणारे पिवळे कार्ड हे अशा व्यक्तींना दिले जाते जे लोक निराधार आहेत, महारोगी, कुष्ठरोगी, विधवा किंवा अपंग आहेत. मात्र अशी कार्डे देखील काही प्रतिष्ठीत व आर्थिकदृष्ट्या सधन आणि सक्षम कुटुंबांना दिलेली आढळून आली. यावरून ***'न्याय न्हाई गावाला जोगतीण जाती देवाला'*** अशी स्थिती सार्वजनिक वितरण व्यवस्थापनात दिसून येते. या तिन्ही जिल्ह्याच्या डोंगरी भागात कार्डधारकांचे अयोग्य वर्गीकरण झाले आहे असे दिसून येते.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका

कोल्हापूर, सांगली आणि सातारा

जिल्ह्यांच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका पाहिली असता, या व्यवस्थेत डोंगरी भागातील रहाणीमानाचा दर्जा उंचावला आहे असे दिसून येत नाही. फक्त *'बुडत्याला काठीचा आधार'* या उक्तीप्रमाणे सार्वजनिक वितरण व्यवस्थेने कार्य केल्याचे लक्षात येते. थोडक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेची भूमिका दारिद्र्य निर्मुलनामध्ये अकार्यक्षम आढळून आली.

**अपुरी साठवणूक सुविधा**

रेशनसाठी असणाऱ्या धान्याची साठवणूक कशी केली जाते आणि साठवण क्षमता किती आहे हे पहाणे गरजेचे आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागात एकूण ११ गोदामे (अनुक्रमे ६, १ आणि ४) असून त्यांची साठवण क्षमता ७१०० मेट्रीक टन इतकी आहे. यावरून डोंगरी भागात सरकारकडून मंजूर होणारे धान्य साठविण्यास व भविष्याचा विचार करून धान्य साठविण्यास ही व्यवस्था पुरेशी आहे असे दिसून येत नाही.

**रेशनवरील वस्तूचे प्रमाण कमी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मुळ हेतू दारिद्र्य कमी करणे व देशातील लोकांना अन्नसुरक्षा देणे हा आहे. मानवी जीवन जगण्यासाठी बऱ्याच गोष्टींची आवश्यकता असते. यामध्ये तृणधान्ये, कडधान्ये, डाळी, तेल, मसाले, गॅस, रॉकेल, कपडे, शिक्षण, राहण्यासाठी घरे इ. मात्र रेशनवरील वस्तूंचा विचार केल्यास फक्त गहू आणि तांदुळ या वस्तूंचाच पुरवठा होतो. तसेच रॉकेल व पामतेल अगदी अल्प प्रमाणात आहेत. यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा हेतू साध्य करण्यावर बऱ्याच मर्यादा पडतात. डोंगरी भागातील जनतेला सरासरी ८० टक्के धान्य बाहेरून आणावे लागते. थोडक्यात *'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला'* अशी अवस्था सार्वजनिक वितरणाची आहे.

**राजकारणाचे अस्तित्त्व**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागातील रेशन धान्य दुकानदारावर राजकिय पक्षाचे वर्चस्व आहे असे दिसते. १३.१५ टक्के कार्डधारकांच्याकडून याबाबत होकारात्मक मत नोंदवले गेले आहे. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील लोकांना योग्य तो न्याय मिळत नाही आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मूळ हेतू हा बाजूला पडत चालला आहे.

**भांडवलाचा अभाव**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या भागातील १७.१४ टक्के रेशन दुकाने ही भांडवलाअभावी तालुक्याहून संपूर्ण धान्याची उचल करीत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे डोंगरी भागातील कार्डधारकांना तेवढ्या अन्नधान्यासाठी मुकावे लागते. अर्थात शासन लोकांना धान्य देण्यास तयार असताना कार्डधारकांना रेशन दुकानदाराच्या चुकीमुळे (भांडवला अभावी) मिळत नाही.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे यश अपयश

दुसऱ्या महायुद्धापासून म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या सुरवातीपासून आजतागायत देशातील, उपासमार, दुष्काळ, कुपोषण, दारिद्र्य निर्मुलन यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेने गरीबांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे तरीही कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेला दारिद्र्य निर्मुलनात तसेच अन्नसुरक्षा देण्यामध्ये अपयश आलेले आहे.

समाजातील दारिद्र्य रेषेखालील लोकांना कमी दरात अन्नधान्याचा पुरवठा करून दारिद्र्य कमी करण्याऐवजी सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अन्नधान्याच्या वितरणात गळती, कार्डधारकांना अपमानास्पद वागणूक, कनिष्ठ प्रतिचे धान्य, अनियमित व अपुरा पुरवठा, कार्डधारकांचे अयोग्य वर्गीकरण अशाप्रकारे समस्यांचा डोंगर सार्वजनिक वितरणात दिसून येतो. गरीबांची या व्यवस्थेमार्फत एक प्रकारची चेष्टाच केली जाते असे दिसून येते. थोडक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्था गरिबांना अन्नसुरक्षा देण्यास अपयशी ठरली आहे असे म्हणावे लागेल.

**कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्था सक्षम होण्यासाठी महत्त्वाच्या उपाययोजना:**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेत प्रचंड प्रमाणात समस्या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट होण्यासाठी, कार्यक्षम होण्यासाठी, व्यवस्थेतील समस्या दूर करण्यासाठी डोंगरी भागातील जनतेला न्याय मिळण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी काही महत्त्वाच्या सूचना/उपाययोजना सुचविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे-

**योग्य पद्धतीने कार्डधारकांचे वर्गीकरण**

अलिकडे कार्डधारकांचे अयोग्य वर्गीकरण हा ज्वलंत व महत्त्वाचा प्रश्न सार्वजनिक वितरण व्यवस्थेसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागातील काही श्रीमंत वर्गाकडे तसेच आर्थिकदृष्ट्या सबळ व्यक्तींना दारिद्र्य रेषेखालील कार्ड असल्याचे आढळून आले आहे. म्हणून प्रत्येक कुटुंबाची आर्थिक कुवत/क्षमता पाहून कार्डाचे वाटप करण्यात यावे. यासाठी सार्वजनिक वितरणातील अधिकारी, ग्रामपंचायत, गावातील पुढारी, विविध मंडळे, स्वयंसेवी संस्था, तंटामुक्ती समिती इत्यादींनी पुढाकार घेऊन कार्डधारकांचे वर्गीकरण नव्याने करण्यात यावे. सध्या याबाबत उपाययोजना करण्यास प्रारंभ झाला आहे. मात्र अंमलबजावणीत गतिमानता आणणे गरजेचे आहे.

**खोट्या नकली कार्डांची तपासणी**

अलिकडील काळात कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागात खोट्या/नकली कार्डांची समस्या वाढत आहे. याचा अर्थ रेशन दुकानातून वस्तूंचा पुरवठा गरजू लोकांना अथवा मान्यता प्राप्त लोकांना होत नाही. त्यासाठी स्थानिक पातळीवर सरकारने खोटी रेशन कार्ड तपासणी करण्याची जबाबदारी स्विकारावी व बोगस रेशन कार्ड रद्द करण्यात यावीत. याबाबत सरकारने अलिकडे सरकारी संस्थात काम करणाऱ्या कामगारांना शुभ्र रेशन कार्ड करून घेण्यास भाग पाडले आहे व त्यासाठी आदेश देण्यात आले आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळित करण्यासाठी जुलै २००६ पासून शासनाने बोगस शिधापत्रिका विरोधात मोहीम सुरू केली आहे. गेल्या चार वर्षात १ कोटी ७८ लाख शिधापत्रिका शासनाने रद्द केल्या आहेत.

**कार्यक्षम व पारदर्शक व्यवस्थापन**

केंद्रापासून ते कार्डधारकांच्या हातात धान्य मिळेपर्यंत व्यवस्था कार्यक्षम व पारदर्शक होणे आवश्यक आहे. त्यामुळे जास्तीत जास्त कार्डधारकांना या व्यवस्थेचा फायदा घेता येईल. उदा. एक विशिष्ट तारीख निश्चित केली असता,

त्या तारखेला धान्य दिलेच पाहिजे म्हणजे कार्डधारक तयारीत राहील आणि त्याचा वेळ वाया जाणार नाही. कार्डधारकांचा वेळ वाया जाणे म्हणजे त्यांचे श्रम वाया जाणे आणि त्यांचे श्रम वाया जाणे म्हणजे देशाचे नुकसान आहे. तसेच नवीन रेशन कार्ड काढणे, कार्डावरील नोंदी कमी जास्त करणे इत्यादीसाठी वितरण व्यवस्थेत दिरंगाई दिसून येते. त्यासाठी योग्य ती व्यवस्था करून यामध्ये गती आणावी. त्याचप्रमाणे कार्डधारकांचे वर्गीकरण करीत असताना योग्य न्याय देऊन यात पारदर्शकता हवी. तरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा हेतू साध्य होईल.

**अन्नधान्य उत्पादन वाढविणे/दुसऱ्या हरित क्रांतीची गरज**

देशातील जनतेला अन्नसुरक्षा देण्यासाठी देशात एकूण अन्नधान्य उत्पादनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच उत्पादनात सातत्य ठेवणे आवश्यक आहे. देशात अन्नधान्याची उपलब्धता असेल तरच आपण देशातील नागरिकांना अन्नसुरक्षा देऊ शकतो. त्यासाठी देशातील उत्पादन नवीन तंत्र, यंत्र, बियाणे, खते इ. चा वापर करून सातत्याने वाढविले पाहिजे. केवळ अन्नधान्य आयात करून स्वदेशी जनतेला पोसणे भविष्यात धोक्याचे ठरू शकते. सन २०१०-११ सालाकरीता २३२ द.ल. टन उत्पादन होण्याची अपेक्षा आहे व ही बाब समाधानकारक आहे.

**साठवणूक सुविधांमध्ये वाढ**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेने कार्यक्षमरित्या काम करण्यासाठी व देशातील लोकांना अन्नसुरक्षा देण्यासाठी देशातील उत्पादन वाढीबरोबर साठवणुकीची सोय पुरेशा प्रमाणात होणे आवश्यक आहे. देशात सन २०१०-११ मध्ये ६३४८ टन अन्नधान्य साठवणुकीच्या अपुऱ्या व अयोग्य सोयीमुळे सडले आहे. तर भविष्यात वाढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी साठागृहे वाढविणे आवश्यक आहे. तरच आपण उत्पादन वाढीबरोबर ते अन्नधान्य योग्यरित्या साठवून भविष्यात जनतेला अन्नसुरक्षा देऊ शकतो. सध्या भारतात ५ कोटी टन अन्नधान्य साठविण्याची क्षमता आहे. येत्या ३ ते ४ वर्षात सुमारे दीड कोटी टनाने ही क्षमता वाढविण्यात येणार आहे. अशी माहिती खाद्यान्न मंत्री के. व्ही. थॉमस यांनी दिलेली आहे. भारताजवळ एकूण लोकसंख्येला १३ महिने पुरेल इतका अन्नधान्य साठा आहे. तरीही वाढत्या लोकसंख्येच्या मानाने अपुरेपणा दिसून येतो.

**दर माणसी अन्नधान्य प्रमाणात वाढ**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये सध्या दारिद्र्य रेषेखालील कार्डावर ३५ किलो धान्य वितरित केले जाते. मात्र काही कार्डधारकांच्या कुटुंबात दोनच व्यक्ती असतात. तर काही ठिकाणी फक्त एकच व्यक्ती असते. तर काही कार्डावर ८ ते १० व्यक्तींची नावे असतात. या सर्वांना प्रति कार्ड ३५ किलो इतके धान्य मिळते. यावरून असे लक्षात येते की, ज्या कुटुंबात एक किंवा दोनच व्यक्ती आहेत त्यांना ३५ किलो धान्य व ज्या कुटुंबात ८ ते १० व्यक्ती आहेत त्यांना देखील ३५ किलोच धान्य मिळते. ज्या घरात जास्त व्यक्ती असून व त्यांची गरज जास्त असून देखील त्यांना ३५ किलो धान्य मिळते तर ज्याच्या घरात एक किंवा दोनच व्यक्ती असतात त्यांना त्यांच्या गरजेपेक्षा जास्त धान्य मिळते. यामुळे वितरणात विषमता निर्माण झाल्याचे दिसून येते.

**फिरते रेशन दुकान/घरपोच धान्य योजना**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागाचा विचार केला असता कार्डधारकांना धान्य आणण्यासाठी एका गावाहून दुसऱ्या गावाला जावे लागते. कारण ३ ते ४ गावाकरीता एकच रेशन दुकान असते. काही ठिकाणी ४ ते ८ गावाकरीता एकच रेशन दुकान आढळून आले. त्यामुळे कार्डधारकांचा वेळ, श्रम व पैसा वाया जातो. तसेच कार्डधारकांना धावपळ करावी लागते. धान्याचे वितरण होण्याची निश्चित तारीख व वेळ नसल्याने त्यांना फेऱ्या माराव्या लागतात. या सर्व त्रासातून कार्डधारकांची सुटका करण्यासाठी फिरती रेशन दुकाने ठराविक वेळ निश्चित करून चालू केली गेली जावीत. जेणेकरून कार्डधारकांचा वेळ, श्रम व पैसा या सर्वांचीच बचत होईल.

**गळती किंवा भ्रष्टाचार कमी करणे**

सार्वजनिक वितरणातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अन्नधान्य वितरणातील गळती होय. ही धान्याची गळती थांबविण्यासाठी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. सार्वजनिक व्यवस्थेअंतर्गत दारिद्र्य रेषेवरील (APL) लाभार्थीसाठी असलेल्या ७० टक्के धान्याची वाटमारी होत असल्याची धक्कादायक कबुली केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा राज्यमंत्री के. व्ही. थॉमस यांनी दिली आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरणात अन्नधान्याची गळती थांबविण्यासाठी व भ्रष्टाचार कमी करण्यासाठी योग्य त्या उपाय योजना केल्या गेल्या पाहिजेत.

**धान्य वितरणात सहकारी चळवळीचा आधार घ्यावा**

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागात सहकारी चळवळ बळकट करून विविध सहकारी संस्थेमार्फत रेशन धान्य वितरीत करण्याची व्यवस्था करावी आणि त्यासाठी गावातील पुढारी व सहकारातील कार्यकर्ते यांनी पुढाकार घ्यावा.

**वस्तूचा चांगला दर्जा**

अन्नसुरक्षा म्हणजे देशातील जनतेला पुरेशा प्रमाणात, पौष्टिक, सकस अन्नधान्य मिळण्याची खात्री होय. यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पुरविले जाणारे धान्य चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. तसेच ते पुरेशा प्रमाणात कार्डधारकांना मिळणे देखील तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे कुपोषण, उपासमार, दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल. थोडक्यात, निरोगी जीवनासाठी सकस, चांगल्या दर्जाचे अन्नधान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविले जावे. यासाठी अलिकडील काळात देशातील तळातल्या ६८% जनतेला (५०% शहरी, ७५% ग्रामीण) कमी किंमतीत धान्य पुरवून अन्न सुरक्षा देण्यासाठी केंद्रीय मंत्री के. व्ही. थॉमस यांच्याकडून मंत्रालयात विधेयक मांडण्यात आले आहे ही गरिबांच्या दृष्टीने आशादायक बाब आहे.

**बायोमेट्रीक इम्प्रेशन, स्मार्ट कार्ड व संगणकांचा वापर**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेत संगणकीकृत यंत्रणेचा वापर करण्यात यावा. तसेच प्रत्येक रेशन दुकान इंटरनेटद्वारे जोडले जावे. त्यामुळे कोणत्या रेशन दुकानात किती माल शिल्लक आहे, किती विक्री झाली आहे याची माहिती ताबडतोब केंद्रीय व्यवस्थेला समजू शकेल व त्याआधारे नियोजन करण्यास मदत होईल.

बायोमेट्रीक थम्ब इंम्प्रेशनद्वारे कार्डधारकांचे ठसे घेऊन धान्य विक्री केली जावी

त्यामुळे कोणत्या कार्डधारकाला किती धान्याचे वितरण झाले हे लक्षात येईल, तसेच यामुळे बोगस कार्ड वापरण्यावर मर्यादा येऊन योग्य त्या कार्डधारकालाच धान्य मिळेल व रेशन दुकानदारांच्या काळ्या बाजारास देखील आळा बसेल.

**सार्वजनिक वितरण राजकारणातून अलिप्त ठेवावे**

स्थानिक पातळीवर ज्यावेळी कार्डधारकाचे वर्गीकरण केले जाते त्यावेळी राजकीय हस्तक्षेप होत असल्याचे दिसून येते. तसेच रेशन दुकान कोणाकडे चालविण्यास द्यावे याबाबत सुद्धा राजकारण केले जाते. मात्र असा राजकिय हस्तक्षेप खऱ्या गरीबाला सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेऊ देत नाही आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा हेतू साध्य होत नाही.

**गरिबांना अधिक फायदा द्यावा**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा मुळ हेतू गरिबांचे महागाईपासून संरक्षण करणे, देशातील जनतेला अन्नसुरक्षा देणे, देशातील दारिद्र्य कमी करण्यावर भर देणे हे आहेत. यासाठी समाजात अधिकाधिक गरीब व्यक्ती कोण आहेत हे विविध निकष लावून आणि कसून तपासणी करून त्यांची योग्य ती ओळख करून त्यांचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अधिकाधिक फायदा करून देणे आणि ज्या श्रीमंत व्यक्ती आहेत ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे अशा व्यक्तींना सार्वजनिक वितरण व्यवस्थेतून वगळले जावे.

**योग्य देखरेख, नियंत्रण व कडक कारवाई**

केंद्रापासून स्थानिक पातळीपर्यंत धान्य पोहचेपर्यंत योग्य देखरेख, व्यवस्था व नियंत्रण ठेवण्यात यावे. या व्यवस्थेमध्ये अवैध काम करणाऱ्यावर दबाव व भीती निर्माण होईल आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षमरित्या काम करेल. यासाठी गावातील निवृत्त शिक्षक, महिला मंडळे यांचे संयुक्त देखरेख मंडळ नेमण्यात यावे.

**धान्याऐवजी सबसिडी देण्याचा प्रस्ताव**

नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष अहलुवालिया यांच्या नेतृत्त्वाखाली समितीने सरकारसमोर प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गरीब लोकांना स्वस्त धान्य देण्यापेक्षा त्या लोकांना थेट पैसे देण्यात यावे आणि त्या पैशातून त्या लोकांनी बाजारातून त्यांना हवे ते धान्य खरेदी करावे, तसेच हे पैसे इलेक्ट्रॉनिक मशिन मधून देण्यात यावेत. असे ही या प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी हा उपाय सुचविण्यात आला आहे.

तथापि कोल्हापूर सांगली आणि सातारा जिल्ह्यांच्या डोंगरी भागातील सदर संशोधनात हा प्रश्न लाभार्थींना (धान्याऐवजी पैसे चालतील का?) विचारण्यात आला त्यावेळी ९८% लाभार्थ्यांकडून याच्याबाबत नकारार्थी उत्तर आले. कारण काही लोक रोख पैसा आपल्याकडे रहात नाही या ना त्या कारणाने संपून जातो, तसेच सरकारचा भरवसा नाही की, ते वेळेवर पैसे देईलच, तसेच काही स्त्रियांच्याकडून असे सांगण्यात आले की, आमचे नवरे रोख पैसे मिळाल्यावर ते दारू पिऊनच संपवतील आणि आमची पोरं उपाशी रहातील, त्यांना काय खायला द्यायचे?

वास्तविक पहाता सध्याच्या रेशन प्रणालीची अंमलबजावणी कठोरपणे आणि प्रामाणिकपणे झाली तर ही व्यवस्था गरीबांसाठी वरदानच ठरणारी आहे. विधवा पेन्शन सारख्या

योजना आपली उद्दिष्ट्ये गाठू शकलेली नाहीत, तसेच सरकारच्या कार्याची अकार्यक्षमता व दप्तरी दिरंगाई पाहिल्यास महागाई ज्या प्रमाणात वाढेल त्या त्या प्रमाणात रोख स्वरूपात दिल्या जाणाऱ्या अनुदानाची रक्कम वाढेलच असे नाही. कारण सरकारचे अनेक नियम वर्षानुवर्षे तसेच राहतात. त्यामध्ये बदल होत नाही. अशावेळी सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोषांचा आणि ते दोष का निर्माण झाले यांचा विचार न करता जर हा उपाय अंमलात आणला गेला तर **'रोगापेक्षा औषध भयंकर'** अशी अवस्था होण्याची शक्यता आहे. तसेच काही राज्यात ही व्यवस्था अगदी उत्तमरित्या काम करीत आहे. उदा. तामीळनाडू व छत्तीसगड या राज्यांमध्ये जास्तीत जास्त गरीबांपर्यंत धान्य पोहोचवले जाते. या व्यवस्थेने आपले काम या राज्यामध्ये कार्यक्षमरित्या चालू ठेवले आहे.

थोडक्यात सार्वजनिक वितरण प्रणालीवर नाहक प्रयोग करण्यापेक्षा आहे त्याच व्यवस्थेत परिस्थितीनुसार बदल घडवून आणले तर ही प्रणाली गरीबांच्या फायद्याची ठरू शकते, असे संशोधकाचे मत आहे.

**डोंगरी भागाच्या विकासासाठी काही उपाययोजना**

१. शेती पूरक/शेती आधारित उद्योगधंद्यात वाढ करणे
२. नवीन तंत्र, यंत्र यांच्या वापरास उत्तेजन देणे
३. लघु व कुटीर उद्योगांचा विकास करणे
४. वाहतुक व दळणवळण सुविधात वाढ करणे
५. पाणी पुरवठ्याच्या सोयीत वाढ करणे
६. आर्थिक विषमता कमी करणे
७. डोंगरी मत्तेवर आधारित उद्योगांचा विकास करणे
८. आरोग्य विषयक सुविधात वाढ करणे
९. शैक्षणिक सुविधांचा विकास करणे
१०. औषधी वनस्पती व फळझाडांच्या लागवडीवर भर देणे.

अशा पद्धतीने कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा केल्यास येथील जनतेला अन्नसुरक्षा मिळण्यास तसेच दारिद्र्य व कुपोषण कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भ:**

१. खोत एम. आर. यांनी पीएच्.डी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध. (कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या डोंगरी भागातील सार्वजनिक वितरण व्यवस्था)
२. महाराष्ट्र शासन निर्णय, सन १९९८, १९९९, २०००, २००३, २००५, २००८, २००९.
३. Economic Servey of Mahatrashtra 2010-11.

# भारतीय अन्नसुरक्षा - स्वरूप व उपाय

एम्.बी.अनंतकवळस, सातारा
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय.
आजीव सदस्य क्र. १०७३
भ्रमणध्वनी: ९४२०६५९०५६

**प्रस्तावना:**

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असून त्यातील अन्न ही सर्वात महत्त्वाची गरज आहे. अन्न हा जीवनशक्तीचा मुळ स्त्रोत आहे. अन्नाशिवाय मानव जगू शकणार नाही. प्राचीन कालखंडापासून मानव अन्नासाठी संघर्ष करीत आलेला आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यांवर मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकले असले तरी भुकेला अजूनही पर्याय शोधता आलेला नाही. भुकेला भय नसते तसेच अभयही नसते म्हणूनच ती कायम शमवावी लागते. व्यक्तीच्या अन्नविषयक किमान गरजा जोपर्यंत भागविल्या जात नाहीत तोपर्यंत व्यक्तीला आर्थिक नियोजनाचे महत्त्व, मानवी कल्याण, सामाजिक न्याय आणि लोकशाही या गोष्टी प्राप्त करुन घेणे अशक्य होईल. अन्नधान्याच्या पुरेशा उत्पादन वाढीबरोबरच ते समाजातील सर्व लोकांना पुरेशा प्रमाणात मिळणे आवश्यक आहे.

आधुनिक स्पर्धेच्या युगात भारत एक आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात असताना देशात अन्नसुरक्षेचा मूलभूत प्रश्नच एक चिंतनीय बाब ठरली असून ती आजची शोकांतिका आहे. ती सोडविणे सध्याचे मूलभूत आव्हान आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरु म्हणाले होते की, *'भारताने अन्नधान्याच्या बाबतीत इतर देशांवर अवलंबून राहणे ही बाब लाजीरवाणी तर आहेच, शिवाय ती धोकादायक आहे.'* कारण आपण इतर कोणत्याही गोष्टींसाठी प्रतिक्षा करु शकतो मात्र अन्नधान्यासाठी नाही. याची दखल घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वांसाठी अन्नधान्य सुरक्षा मिळविणे हे आपले राष्ट्रीय उद्दिष्ट ठरविले. तरीही साठ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर अन्नसुरक्षेचा ज्वलंत प्रश्न सोडविणे शक्य झालेले नाही. याचाच प्रस्तुत शोधनिबंधात उहापोह घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाचे महत्त्व:**

स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: १९६० नंतर भारतातील कृषि क्षेत्रात आमूलाग्र बदलातून हरित क्रांती घडून आली. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली. १९९१ मध्ये नविन आर्थिक धोरण स्वीकारुन जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभाग घेतल्याने १९९४ नंतर भारताच्या कृषि क्षेत्रावर परिणाम झाला. गॅट करारापूर्वी (१९९५ पूर्वी) निर्यातीवर आंतरराष्ट्रीय मर्यादा तितक्याशा नव्हत्या. परंतु गॅट करारानंतर कृषि क्षेत्राला खुल्या बाजारपेठेतील स्पर्धात्मक आव्हांनाना सामोरे जावे लागल्याने कृषि मालाच्या किंमती, उत्पादन व आव्हांनाना सामोरे जावे लागल्याने कृषि मालाच्या किमती, उत्पादन व ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम दिसून येऊ लागला. त्यामुळे कृषि विकासाबरोबर अन्नसुरक्षितता महत्त्वाची आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. अन्नसुरक्षा संकल्पना समजून घेणे.
२. भारतातील लोकसंख्या वाढ व अन्नधान्य उत्पादन यांचा अभ्यास करणे.
३. अन्नधान्याच्या दरडोई उपभोगावरुन अन्नसुरक्षेचे महत्त्व स्पष्ट करणे.
४. अन्नधान्य सुरक्षा कायद्यातील तरतुदींचा आढावा घेणे.
५. अन्नसुरक्षेसाठी काही महत्त्वपूर्ण सूचना / उपाययोजना करणे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्य संकलनावर आधारित असून यामध्ये विविध मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रातील लेख यांचा आधार घेतला आहे.

**अन्नसुरक्षा संकल्पना:**

१. अन्न आणि कृषी संघटना : *सर्व लोकांना सर्व काळी भौतिक व आर्थिक दृष्टिकोनातून आवश्यक असलेले महत्त्वाचे अन्न उपलब्ध होण्याविषयीची हमी म्हणजे अन्न सुरक्षितता होय.*
२. जागतिक विकास अहवाल (१९८६): *मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक अन्नाची भौतिक व गुणात्मक मात्रा सर्वकाळ उपलब्ध असणे म्हणजे अन्नसुरक्षा होय.*

यावरुन सर्व लोकांना पुरेशा प्रमाणात गरज असेल त्यावेळी आणि परवडणाऱ्या किमतीत अन्न मिळणे यालाच अन्न सुरक्षा म्हणतात.

भारत स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म्हणजे पहिल्या महायुद्धापर्यंत अन्नधान्याची निर्यात करणारा देश होता. १९३५ ला ब्रह्मदेश भारतापासून वेगळा होऊन अन्नसमस्येस सुरुवात झाली. त्यानंतर पडलेल्या अनेक दुष्काळात लाखो लोक उपासमारीने मृत्युमुखी पडले. तर १९४७ साली देशाची फाळणी होऊन अन्न समस्या अधिक गंभीर बनली.

पंचवार्षिक योजनेत १९६५ नंतर शेती व्यवसायास आधुनिकीकरणाची जोड मिळाल्याने शेती उत्पादन वाढले हे खरे असले तरी शेती उत्पादनातील वाढ ११% होती तर उपासमारीतील वाढ १२% होती. शेती उत्पादन ज्या प्रमाणात वाढले त्या प्रमाणात लोकांची क्रयशक्ती वाढली नाही. उलट ती घटत गेली. शेती व्यवसायात बाजारीकरण आल्याने एकाच प्रकारचे पीक प्रचंड प्रमाणात घेतले जाऊ लागले. बाजारात जे विकले जाते, विकले जाऊ शकते आणि बाजाराला जे हवे आहे तेच पिकविले जाऊ लागले. त्यामुळे पिकांमधील विविधता संपत गेली. नगदी पिकांमुळे

पाण्याची पातळी कमी झाली. जादा पिके घेण्याच्या हेतूने जादा रासायनिक खतांचा मारा झाल्याने जमीन झारपड, नापिक बनली. पारंपरिक शेतीतील प्रत्येक व्यक्तींच्या श्रमाची व पोटाची व्यवस्था वाहणारी साखळी नष्ट होऊन रासायनिक खते, बी-बियाणे यांच्या बहुराष्ट्रीय कंपन्या, अन्नाची वितरण करणाऱ्या संस्था किंवा व्यवस्था आणि जगभरातील राजकीय व्यवस्था यांचे एक अनिष्ट वर्तुळ तयार होऊन लोकांनी आपली अन्नसुरक्षा गमावली.

**तक्ता क्र. १ : भारताची लोकसंख्या व अन्नधान्य उपलब्धता**

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | अन्नधान्य (द.लक्ष टन) | दरडोई दरवर्षी अन्नधान्य (कि.ग्रॅम) | दरडोई दर दिवशी अन्नधान्य (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३६.११ | ५०.८२ | १४४.१ | ३९४.९ |
| १९६०-६१ | ४३.९२ | ८२.०१ | १७१.१ | ४६८.७ |
| १९७०-७१ | ५४.३३ | १०८.४२ | १७१.१ | ४६८.८ |
| १९८०-८१ | ६८.३३ | १२९.५८ | १६६.० | ५४५.८ |
| १९९०-९१ | ८४.४४ | १७६.३९ | १८६.२ | ४५०.१ |
| २०००-०१ | १०२.८७ | १९६.८० | १५१.२ | ४१६.० |
| २०१०-११ | १२१.३० | २४१.०० | १६३.१ | ४७३.९ |

*(संदर्भ: कुरुक्षेत्र आवृत्ती - ५९, मार्च - २०११, www.dacnet.nic.in)*

वरील तक्त्यावरुन भारताची १९५०-५१ पासून लोकसंख्या ३.३६ पटीने तर अन्नधान्य उत्पादन ४.७५ पटीने वाढले आहे. अन्नधान्य उत्पादन वाढ अधिक वाटत असली तरी त्यात अनेक वर्षात स्थित्यंतरे घडून आली आहेत. तसेच दरडोई दरवर्षी व दरडोई दरदिवशी अन्नधान्य उपलब्धता कमी आहे. कारण अन्नधान्याच्या वाढीच्या दरापेक्षा लोकसंख्येतील वाढ जास्त आहे. दरडोई उपभोगात अल्प प्रमाणात वाढ झाली आहे.

२०११ मध्ये इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इन्स्टिट्यूटने जागतिक भूक निर्देशांक प्रकाशित केला त्यात जगातील भुकेल्या ८१ देशाच्या यादीत भारत ६७ व्या स्थानी आहे. लोकांना पुरेसा सकस व नियमित आहार न मिळाल्यामुळे आरोग्यपूर्ण जीवन जगता येत नाही. (HUNGAMA - Fighting Hunter and Malnutrition) हंगामा या सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावर पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग म्हणाले, *'देशाच्या वार्षिक सरासरी उत्पादनात, उत्पन्नात वाढ होत असली तरी कुपोषण झालेल्या बालकांची ही आकडेवारी म्हणजे एक राष्ट्रीय लांच्छन (National Shame) आहे.* 'सर्वेक्षणात ४२% बालके कुपोषित आढळली.

भारतातील मानवाला संतुलित आहाराच्या दृष्टीने अन्नधान्य, प्रोटीनयुक्त घटक असणाऱ्या डाळींचा, दुध व दुग्धजन्य पदार्थ, फळे, भाज्या, अंडी- मांस इ. पौष्टीक घटकांचा समावेश होतो. मानवाला ३००० कॅलरीज् निर्माण करणाऱ्या संतुलित आहाराची गरज असते. परंतु भारतात केवळ २००० कॅलरीज् आहारात आढळून येतात.

यात बदल घडवून आणण्यासाठी अन्नधान्य पुरवठ्याचे नियोजन, नियंत्रण व व्यवस्थापन करणे म्हणजेच अन्नधान्य सुरक्षिततेची हमी देणे होय. भारत सरकारने जुलै २०११ मध्ये अन्नसुरक्षा कायदा केला असून त्याला केंद्रिय मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे.

## अन्नधान्य सुरक्षा कायद्यातील तरतुदी:

१. देशातील ग्रामीण भागातील ७५% आणि शहरातील ५०% गरीब जनतेला स्वस्त धान्य वाटप केले जाईल.

२. देशातील ६८% जनतेला अन्नधान्य स्वस्तात मिळण्याची हमी या कायद्यात आहे. त्यामुळे लाभार्थींना स्वस्त अन्नधान्य मिळणे हा कायदेशीर अधिकार मिळणार आहे.

३. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक व्यक्तिला दरमहा ७ किलो अन्नधान्य त्यात गहू प्रति किलो २ रु. व तांदूळ ३ रुपये दराने मिळणार आहे.

४. या विधेयकाची अंमलबजावणी करण्यामध्ये राज्य सरकारची भूमिका असून अन्नधान्य वितरण सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे होईल.

५. सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अनुदान देण्याची व बोगस शिधा पत्रिकांना आळा घालण्याची तरतूद आहे.

६. राष्ट्रीय अन्नसुरक्षा विधेयकामध्ये एकूण लोकसंख्येचे प्राधान्य गटातील कुटुंब व साधारण गटातील कुटुंब असे गट तयार केले जाणार आहेत.

७. राष्ट्रीय सल्लागार समितीच्या मते, प्राधान्य गटातील शहरी व ग्रामीण कुटुंबाला दरमहा ३५ किलो अन्नधान्य (१ रु. किलो दराने ज्वारी, २ रु. किलो दराने गहू व ३ रु. किलो दराने तांदूळ) पुरवठा केला जाईल. तर साधारण गटातील शहरी आणि ग्रामीण कुटुंबाना दरमहा २० किलो अन्नधान्य किमान आधार किंमतीच्या ५०% अधिक किमतीला पुरवठा करण्याची व्यवस्था केली जाणार.

८. राष्ट्रीय अन्नसुरक्षा विधेयकात निराधार लोकांची आहार व्यवस्था, माता व बालक पोषण, भूकग्रस्तांची समस्या सोडविणे व बहुव्यापक पोषक आहाराची हमी देणे यासाठी वापरण्यात येणार.

९. या विधेयकानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेबद्दल विकेंद्रित धान्य वसुली, विकेंद्रित धान्यसाठा, स्वयंसहाय्यता गटाचा वापर, सा. वि. व्यवस्थेतील खाजगी दुकानदारांचे प्रस्थ कमी करणे, सहकारी संस्थाचा वापर करणे, संगणकीकरण वापरणे, स्मार्ट कार्ड वापरणे, बायोमेट्रिक तंत्राचा वापर करणे.

१०. या विधेयकानुसार प्राधान्य व साधारण गटातील लोकांना स्वस्त व रास्त दराने अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारला १२ अब्ज डॉलर इतका खर्च येईल. हा खर्च एकूण सार्वजनिक खर्चाच्या ५% स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या १% इतका असेल.

भारतात अन्नधान्य सुरक्षा विविध तरतुदी करण्यात आलेल्या असल्या तरी त्याची होणारी अंमलबजावणी व प्रत्यक्ष लाभार्थी याबाबत योग्य व ठोस धोरण नसल्यामुळे त्याची कार्यवाही होण्यास अनेक अडचणी दिसून येतात. त्यातच यावर्षी महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ व त्यासाठीच्या उपाययोजनांची वास्तवता विचारात घेतल्यास होणारी आश्वासनांची फक्त खैरात या सरकारच्या अंमलबजावणीतील उणिवा स्पष्ट दिसून येतात.

## अन्नधान्य सुरक्षिततेची हमी देण्यासाठी उपाययोजना :

१. देशातील लोकसंख्येच्या वाढीच्या दरावर नियंत्रण ठेवण्याबरोबरच एकूण अन्नधान्य उत्पादन व दरडोई अन्नधान्य उपलब्धता यात वाढ होण्यासाठीचे धोरण राबवावे.
२. देशातील आर्थिक नियोजनाच्या साह्याने कृषी क्षेत्र विकासाचा दर वाढविणे.
३. देशातील रोजगार पातळी वाढविण्याबरोबर दारिद्र्य व आर्थिक विषमतेचे प्रमाण कमी करण्याबाबतचे धोरण राबवावे.
४. देशातील अन्नधान्य आयात कमी करणारे धोरण राबविण्याबरोबर कडधान्याचे उत्पादनात वाढ करणे.
५. देशातील अन्नधान्य साठा वाढविण्याबरोबर गोदामे वाढविणे.
६. अन्नधान्याची नासाडी थांबविण्याचे धोरण राबविणे.
७. शेतीला पाणी, वीज, औषधे, अवजारे, रस्ते, वाहतूक, दळणवळण, शिक्षण प्रशिक्षण, संशोधन विकास धोरणे राबवून उत्पादन वाढीस प्रोत्साहन देणे.
८. जमीन सुधारणा कार्यक्रम, सेंद्रिय शेती, जैवसेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती इ. मध्ये वाढ करणारी धोरणे राबविणे.
९. पडीक, क्षारपड, खडकाळ, नापीक, डोंगराळ या प्रकारच्या जमिनीचा वापर करुन विविध प्रकारची पिके विकसीत करण्याचे धोरण राबविणे.
१०. शेतीमालाला योग्य किंमत देण्याचे आणि शेतकऱ्याला शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण राबविणे.
११. शेतीपूरक आणि जोडव्यवसायांचा विकास करुन दुसऱ्या हरितक्रांतीच्या दिशेने उपाययोजना करणे.
१२. देशातील प्रत्येक नागरिकांना जगविण्याची जबाबदारी सरकारची आहे त्याबाबत धोरण राबविणे.
१३. सार्वजनिक ठिकाणच्या कार्यक्रमातील अन्नधान्याची नासाडी थांबविणे उदा. लग्न, मुंज, यात्रा, जत्रा इ.

## सारांशः

देशातील शेती विकासासाठी हरितक्रांतीचे धोरण यशस्वीपणे राबविल्यामुळे शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढले. त्यामुळे अन्नधान्याची सुरक्षितता निर्माण होण्यास प्रारंभ झाला परंतु नंतरच्या काळात कडधान्य, गळीत धान्य, फळे, पालेभाज्या, फळभाज्या इ. उत्पादनामध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ झाली नाही. त्या देशात सर्व लोकांना दोनवेळचे पोटभर अन्न मिळते त्या देशाचा विकास हा निश्चित असतो. आज भारत हा कृषीप्रधान देश असूनही अन्नसुरक्षिता साध्य करण्यात असमर्थ आहे. यासाठी सरकारने शेतीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना फक्त कर्जमाफी देऊन त्यांच्या समस्या सुटू शकत नाहीत तर सिंचनाच्या सोयी, स्वस्त कृषी अवजारे, वीज इ. सारख्या बाबीत गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दयावे. त्यामुळे शेती उत्पादन वाढेल व अन्नसुरक्षितता होण्यास मदत होईल. शेतीत दुसरी हरितक्रांती घडवून आणणे गरजेचे आहे त्यामुळे अन्नसुरक्षिततेचा प्रश्न सुटेल व देशातील लोक सुखी व समाधानी जगू शकतील.

**संदर्भ ग्रंथ:**


1. Datta, Sundaram, *Indian Economy*, 2008, 2009, S. Chand Publication, New Delhi.

2. Directorate of Economics and Statictics, Department of Agriculture and Co-operation.

3. *Economic Growth and Food Security*, by M.L. Narasaian, Discovery Publication, New Delhi.

4. *Indian Economic Survey* 2009-10.

5. उल्का महाजन-*अन्नसुरक्षा-की घातक वळण?* दैनिक लोकसत्ता, २ फेब्रुवारी २०१२

6. http:fci.nic.in/procurement-foodgrains

7. www.nfsm.gov.in


**मराठी अर्थशास्त्र परिषद**
**अर्थसंवादसाठी अनुदान**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून २०११-१२ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.२५,०००/- अनुदान प्राप्त झालेले आहे त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचा ऋणी आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी माजी संपादक जगन्नाथ पाटील यांचे सहकार्य लाभले.

- अविनाश निकम,
प्रमुख संपादक,
अर्थसंवाद

# अर्थ शब्दांची वाट पाहे : अंतर्प्रवर्तन

ज. फा. पाटील, कोल्हापूर
विश्वस्त व माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

**अंतर्प्रवर्तन:** (Intrapreneurship)

अंतर्प्रवर्तन मध्ये एका इंग्रजी व्यावसायिक नियतकालिकात Intrapreneur हा शब्द वाचनात आला. उद्योग वा व्यापारी संस्थेत उच्च किंवा मध्यम स्तरावर काम करणाऱ्या काही मोजके, कर्तबगार व महत्त्वाकांक्षी लोक उद्योगपतींच्या प्रोत्साहनाने किंवा स्वयंप्रेरणेने किंवा प्रोत्साहक वातावरणाने त्यांच्या कार्यक्षेत्रात काही नवीन (वस्तू, तंत्र, व्यवस्थापन, बाजार इत्यादी) करतात तेव्हा त्यांना Intrapreneur म्हणावे असे सूचित करण्यात आले.

मूळ इंग्रजी शब्द Entrepreneur असा आहे. त्याला उद्योजक, संघटक, प्रवर्तक असे प्रतिशब्द मराठीत दिले जातात. शुंपिटर या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने यालाच (Innovator) नवप्रवर्तक असा शब्द दिला.

१९ व्या शतकात व २० व्या शतकाच्या पहिल्या ४०-५० वर्षात विविध क्षेत्रात नवप्रवर्तक व त्यांच्या नाविन्याला भांडवल देणाऱ्या वित्तीय संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नातून आर्थिक विकासाची प्रक्रिया घडत राहिली. हळू हळू नवप्रवर्तन हे व्यावसायिक यशाचे गमक आहे त्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्योगसंस्था अंतर्गत पातळीवर संशोधन व विकास (R & D) खाते निर्माण करू लागले. त्यासाठी संशोधन संस्थांना निधी देऊ लागले. विकासासाठी सरकारनेही अनेक ठिकाणी विद्यापीठे व संशोधन संस्था स्थापन केल्या. औषध कंपन्या, मोटार कंपन्या, लष्करामध्ये असे संघटित संशोधन, त्यासाठी वित्तीय मदत अशी नवप्रवर्तनाची संस्थात्मक व्यवस्था निर्माण झाली.

देशी मोठ्या निगम संस्था, लष्करी संशोधन संस्था, बहुराष्ट्रीय निगम संस्था अशा अनेक ठिकाणी अंतर्गत नवप्रवर्तनाचे वातावरण अधिक सक्षम होत गेले.

उत्पादन, संघटन, विपणन, जाहिरात अशा अनेक क्षेत्रात संबंधित संस्थेत

काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी वर्गापैकी काही कल्पक, बुध्दिमान, प्रेरित, महत्त्वाकांक्षी व्यक्तींना या वातावरणात काही तरी नवे करण्याची स्वत:ची पात्रता सिध्द करण्याची, संस्थेत उच्चतम शिखरावर पोहोचण्याची जी उर्मी असते त्यातून ते नवप्रवर्तन करतात. ते मोठे होतात. उद्योग संस्था मोठ्या होतात. त्यांचे आदर्श इतरांसमोर राहतात. त्यातूनच अंतर्प्रवर्तनाचे (Intrapreneurship) अनेक प्रकार घडतात.

भारतीय तरुणांपैकी अनेकांनी अशा प्रकारचे यश मिळवले आहे. त्यामध्ये विक्रम पंडित, चंदा कोचर, दीपक पारेख, के. व्ही. कामत, इंदिरा नूयी अशी नावे घेता येतील. बँकींग, इन्शुरन्स, व्यापार, कारखानदारी अशा अनेक क्षेत्रात असे Intrapreneur = अंतर्प्रवर्तक आढळून येतात. नवप्रवर्तन पूर्णत: व्यक्तिगत असते. अंतर्प्रवर्तन मात्र काही प्रमाणात व्यक्तिगत व अधिक प्रमाणात संस्थात्मक प्रेरणा, प्रोत्साहन व पोषक वातावरण यांचा परिणाम असतो.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन
## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र पहिले
## प्रा. जगदीश नटवरलाल भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान

कैलास काशिनाथ पाटील, परभणी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय.

पीपल्स महाविद्यालय नांदेड येथील पहिल्या सत्राचा विषय ''प्रा. जगदीश नटवरलाल भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान'' हा होता दि. ७ नोव्हें. २०११ रोजी दुपारी २.३० वा. पहिल्या सत्रास सुरूवात झाली. एकूण ०७ शोधनिबंध प्राप्त झाले होते. प्रत्यक्षात ०५ शोधनिबंधांचे सादरीकरण झाले.

१) डॉ. मंजूषा मुसमाडे :

जगदीश भगवती - 'खुल्या बाजाराचे खंदे समर्थक' या लेखात त्या म्हणाल्यात - प्रा. भगवतींची विचारसरणी आर्थिक धोरणातून चांगला समाज निर्माण करण्यावर भर देते. आर्थिक धोरण लोकशाही पद्धतीचे सर्वांना सामावून घेणारे असावे. त्यांनी आपल्या शोधनिबंधात आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, स्थलांतर, बुद्धिवंतांचे स्थलांतर, संकीर्ण, समग्रलक्षी धोरण, दारिद्रयमूलक विकास ह्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. सॅम्यूएल्सनने यांची तुलना हेडेन या संगीतकाराशी केली आहे. ज्याने १०० हून अधिक सुरावटी केल्या व त्यातली प्रत्येक उच्च दर्जाची आहे. प्रा. भगवती एकाच वेळी प्रगत व विकसनशील देशांच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन करतात. नोबेल पुरस्कार समितीला एक ना एक दिवस माझे विचार पटतील हा प्रा. भगवतींचा विचार खूप काही सांगून जातो.

२) प्रा. धीरज कदम :

'सीमा किंमत निधीरण सिद्धांतात प्रा. जगदीश भगवती यांचे योगदान': भगवतींचे योगदान स्पष्ट करण्यासाठी सीमा किंमत निश्चितीचे बेनचे प्रतिमान व गणितीय बाजूने विषयाचे स्पष्टीकरण केले. ही मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या दृष्टीने आश्वासक बाब आहे. भारतीय बाजारपेठेतील विद्यमान स्थितीचा विचार

केला असता, दूरसंचार, पेट्रोकेमिकल, सिमेंट, स्टिल, मोटार विमा यासारख्या विविध अल्पाधिकारी उद्योगात रिलायन्स, अदित्य बिर्ला ग्रुप यासारख्या अनेक मोठ्या पेढ्यांचे आगमन भगवती यांच्या विचारांची यथार्थता स्पष्ट करते. भगवतींच्या विचारांनी किंमत सिद्धांताच्या भावी विकासाला नवीन दिशा देण्याचे कार्य केले आहे. मूल्य सिद्धांतासारख्या अर्थशास्त्राच्या सैद्धांतीक शाखेत सुद्धा त्यांची असणारी उच्च दर्जाची रूची अर्थशास्त्रातील त्यांच्या पांडित्याची ग्वाही देते.

३) प्रा. डी.डी. भोसले

'दारिद्र्यकारी अभिवृद्धीच्या संदर्भात प्रा. जगदीश भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान': दारिद्र्यकारी अभिवृद्धीच्या संदर्भात विचार व्यक्त करतांना अभिवृद्धी होण्यापूर्वीची परिस्थिती, अभिवृद्धी झाल्यानंतरची परिस्थिती याचे विश्लेषण गणितीय पद्धतीने केलेले आहे. शिवाय यथोचित आलेखांचा वापर केलेला आहे. एखाद्या देशात अभिवृद्धी झाल्यामुळे व देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापार अटी प्रतिकूल बनल्या तर त्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ होईल. पण निर्यातीच्या मोबदल्यात देशाला आयातीच्या रूपाने कमी वस्तू मिळतील. याचे राष्ट्राच्या उपभोगावर दोन बाजूने परिणाम होतील. परिणामी देशाच्या उपभोगात घट होईल. ज्यामुळे देशाच्या दारिद्र्यात वाढ होईल. या संकल्पनेत दारिद्र्याचा अर्थ त्यांनी उपभोगाच्या अनुषंगाने लावला.

४) डॉ. प्रशांत हरमकर:

दारिद्र्यकारी अभिवृद्धी निर्वचन आणि उपयोजन या शिर्षकाखाली निबंधाची मांडणी करीत असताना असे स्पष्ट केले की, आर्थिक विस्ताराचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर होतो. बहुतांश वेळा आर्थिक विस्तारामुळे लाभ प्राप्त होण्या ऐवजी नुकसान पोहचू लागले. विकसनशील देशात दारिद्र्यकारी अभिवृद्धीची संभाव्यता लक्षात घेतली तर संबंधीत देशानी संरक्षणात्मक व्यापार धोरण स्वीकारावे आणि उत्पादनाची अंतर्गत रचना बदलावी. यासाठी अभ्यासकाने वैज्ञानिक पद्धतीने लेखाची मांडणी केली.

५) डॉ. युगंधरा टोपरे:

प्रा. जगदीश भगवती यांचे जागतिकीकरणाबद्दलचे विचार व्यक्त करतांना वित्तीय सुधारणांचा प्रामुख्याने परामर्ष घेतला.

याशिवाय खुला व्यापार व जागतिकीकरण, प्रा. भगवतीच्या मते जागतिकीकरण समजुन घेताना होणारी गल्लत प्रसार माध्यमांचा प्रभाव या विविध घटकांचा शोध निबंधात आढावा घेण्यात आला. तसेच खुला व्यापार व जागतिकीकरण, अविकसीत देशाची भांडवलशाही बद्दलची मानसिकता, भारतातील आर्थिक सुधारणा विषयक प्रा. भगवतींचा दृष्टीकोन यासंदर्भात सखोल स्वरूपात आढावा घेण्यात आला. शेवटी त्या म्हणाल्या अर्थव्यवस्थेत स्थित्यंतरे आणण्याची गती ही राजकारण आणि आर्थिक अडथळे विचारात घेऊनच ठरवली पाहिजे. सदर शोध निबंधात भारत आणि चीन मधील वित्तीय सुधारणा बाबतचा वित्तीय दृष्टीकोन स्पष्ट केला आहे.

**चर्चासत्रातील सहभाग:**

१) डॉ. दि.व्यं. जहागीरदार:

प्रा. भगवती स्वत:ला जागतिक अर्थव्यवस्थेचा मानवी चेहरा म्हणून व्यक्त करताना

उद्योग व व्यापार या बाबतीत जरी उदारीकरणाचे धोरण स्वीकारले असले तरी सामाजिक कल्याणाच्या जबाबदारीतून शासन मुक्त होऊ शकत नाही. प्रगत देश विविध अटी लादून विकसनशील देशाकडून होणाऱ्या निर्यातीवर निर्बंध लादतात.

२) डॉ. विनायक देशपांडे:

दारिद्र्यकारी अभिवृद्धी या संदर्भात प्रा. भगवती यांनी दारिद्र्याचा अर्थ उपभोगाच्या अनुषंगाने घेतला आहे. समजा एखाद्या देशात उपभोगासाठी अधिक वस्तु उपलब्ध असतील तर देशातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट होईल. समजा एखाद्या देशात जर आर्थिक वृद्धी घडून आली व ही वृद्धी निर्यात क्षेत्राकडे झुकणारी असेल तर देशात उपभोगाकरीता कमी वस्तु राहतील व व्यापार अटींचा ऱ्हास झाल्यामुळे विशिष्ट वस्तुंच्या निर्यातीच्या मोबदल्यात मिळणाऱ्या आयात वस्तुचा पुरवठा देशात कमी होईल. ज्यामुळे उपभोगाकरीता वस्तुंचा तुटवडा निर्माण होऊन लोकांच्या उपभोगात पूर्वीपेक्षा घट होईल.

३) प्रा. सौ. मुक्ता जहागीरदार:

जागतिकीकरणावर अनेक देशातून टिका होत आहे. जरी काही अर्थतज्ज्ञ याबाबत सावध प्रतिक्रिया देत असतील तरी प्रा. भगवती म्हणतात जागतिकीकरणाशिवाय पर्याय नाही. सध्या समाजातील घटकाकडून जी चर्चा होत आहे. ती केवळ आर्थिक जागतिकीकरणाशी निगडीत आहे. तसेच प्रगत व अप्रगत देशांना मिळणारे आंतरराष्ट्रीय लाभाचे प्रमाण एकसारखे नसते. विकसनशील देशांनी क्रमाक्रमाने अडथळे दूर केल्यास जागतिकीकरणाची भीती हळूहळू कमी होईल.

या शिवाय या सत्रात डॉ. गौतम भोंग, प्रा. सुभाष दगडे, डॉ. जयवंत इंगळे, प्रा. पी.जी. गिते, डॉ. आबासाहेब कल्याणकर यांनी चर्चेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

पहिल्या सत्रात जागतिकीकरणावर अनुकूल व प्रतिकूल बाजूंनी विचार मंथन झाले. सूत्र संचालकांनी चर्चासत्रात सादर झालेल्या शोधनिबंधांचा आढावा घेऊन प्रा. भगवती यांच्या योगदानाची माहिती दिली. सदरील चर्चासत्रासाठी वृत्तसंकलनाचे काम डॉ. बबन खामकर यांनी पाहिले.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन
## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र दुसरे
## ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना

बाळासाहेब माने, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली.

अधिवेशनातील दुसऱ्या चर्चासत्राचा विषय ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभूत संरचना हा होता. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष आ. गो. पुजारी होते. अध्यक्षांनी चर्चासत्राचे प्रास्ताविक केले आणि प्रा. बाळासाहेब माने यांच्याकडे चर्चासत्राची सूत्रे सुपूर्द केली.

या चर्चासत्रामध्ये एकूण ४० शोधनिबंधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. सुरुवातीला सूत्रसंचालक बाळासाहेब माने यांनी महाराष्ट्रातील आधारभूत ग्रामीण संरचना या विषयावर आपले मत प्रदर्शन केले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून राज्याच्या ग्रामीण भागात उपलब्ध असणाऱ्या विविध प्रकारच्या पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. प्रामुख्याने शेती व शेतीसंलग्न व्यवसायाच्या अनुषंगाने या पायाभूत सुविधांचा कशा प्रकारे वापर होत आहे. रस्ते, राज्यमार्ग, जिल्हामार्ग, वीज व ऊर्जासाधने, जलसिंचन सुविधा,सबलीकरण, महिला व बालकल्याण आरोग्य सुविधा, पायाभूत सुविधासंदर्भात असणारा प्रादेशिक असमतोल, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रात उपलब्ध असणाऱ्या ग्रामीण पायाभूत सुविधा या विविध बाबींच्या अनुशंगाने आधारभूत संरचनेची मांडणी प्रास्ताविकाच्या स्वरुपात सूत्रसंचालक या नात्याने करण्यात आली.

चर्चासत्रात शोधनिबंध सादर करणाऱ्या शोधनिबंधकांनी आधारभूत संरचनेच्या संदर्भात व्यापक आणि अभ्यासपूर्वक आपल्या शोधनिबंधाची मांडणी केली. डॉ. विकास सुकाळे यांनी आपल्या शोधनिबंधात मराठवाड्यातील आधारभूत संरचनेचा असमतोल कसा आहे हे स्पष्ट केले. डॉ. अविनाश निकम यांनी सहकारी बँका व संस्थांनी केलेल्या योगदानाची सविस्तर मांडणी केली. प्रा. रत्नाकर कांबळे यांनी महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामध्ये असलेल्या अपुऱ्या सुविधांची चर्चा केली तर डॉ. दत्तात्रय बागडे, प्रा. आर.बी. भांडवलकर, प्रा. करमसिंग राजपूत यांनी भ्रष्टाचारामुळे रस्ते विकासामध्ये असणाऱ्या मर्यादा व्यक्त केल्या. डॉ.एल.एच. पाटील यांनी ग्रामीण आधारभूत

संरचनेसाठी थेट परकीय गुंतवणुकीचा आधार घ्यावा असे मत व्यक्त केले. प्रा. हिरालाल चव्हाण व डॉ. सुभाष पाटील यांनी सहकारी बँकींग मधून सामाजिक आणि कृषी विषयक परिवर्तन साध्य होवू शकते असे मत व्यक्त केले. डॉ. जयवंत इंगळे यांनी महाराष्ट्राच्या आदिवासी भागात असलेली सरकारी आरोग्य यंत्रणा कशी अकार्यक्षम आहे आणि त्यातून बालमृत्युप्रमाण यातील सहसंबंध दाखविला. आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी सरकारने विशेष योजना लागू करण्याची गरज व्यक्त केली. याचप्रमाणे प्रा. अशोक खाचणे यांनी आरोग्य सेवा केंद्रातील अकार्यक्षमतेवर मत प्रदर्शित केले. महाराष्ट्रातील वीज टंचाई, भारनियमन, विजेचा पर्याप्त वापर, वीज वापरातील व्यवहारिकता, वीज निर्मिती आणि वितरण, वीज निर्मितीमधील खाजगीकरण, वीज वापरातील गैरव्यवहारता, या अनुशंगाने प्रा. अश्विन हवा, डॉ. गोरुडे, प्रा. वैशाली देशमुख, प्रा. डी.आर. धेडे, प्रा.मोहन चौधरी, प्रा. एम.ओ. वर्तके या शोधनिबंधकांनी आपल्या शोधनिबंधात उपरोक्त विषयांचा उहापोह केला.

महाराष्ट्रातील जलसिंचन सुविधा हा आधारभूत संरचनेमधील महत्त्वाचा घटक आहे. जलसिंचनाच्या सुविधांमुळे शेती आणि शेतीसलंग्न व्यवसायांना चालना मिळू शकते. या अनुशंगाने प्रा.बी.एल. महाजन, प्रा.दि. मा. मोरे, प्रा. डॉ. शिवाजी भोसले, प्रा. हसीम वलांडकर, प्रा.बी.पी. पाटील, डॉ. अनिल वावरे, प्रा. रमजान मुजावर, प्रा. अनिल सत्रे, प्रा. एच.एस. रणवरे, प्रा. विष्णु कुटे, प्रा. जे.टी. पाटील या शोधनिबंकांनी जलसिंचन सुविधांच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील आधारभूत संरचनांचा आढावा घेतला. जलसिंचनामध्ये असणारा अनुशेष त्वरीत दूर व्हावा, पाणी अडवा पाणी जिरवा या माध्यमातून सिंचन व्यवस्था व्यापक करावी. पाण्याचे समन्यायी वाटप व्हावे. या अनुशंगाने विचार मांडण्यात आले. डॉ. राहुल म्होपरे यांनी महिला सरपंच ग्रामपंचायतीमधील नळपाणीपुरवठा खर्चाचे विश्लेषण केले.

प्रा. स्वाती आदक, डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्रमिला गायकवाड यांनी ग्रामीण विकासातील महिलांच्या योगदानाची सविस्तर मांडणी केली. डॉ.बी.ए. सुरवसे यांनी कोकणातील काजू प्रक्रिया व्यवसायाची संधी या विषयाची मांडणी केली. याशिवाय सुभाष दगडे, माणिक जाधव, यांनी महाराष्ट्रातील मानव विकास निर्देशांकातील तफावत यासंदर्भात मांडणी केली. याबरोबरच प्रा. नितीन जाधव, जयश्री वानखेडे, या शोधनिबंधकांनीही आपले शोधनिबंध सादर केले.

चर्चासत्रामध्ये डॉ. एम.एन. शिंदे, प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, डॉ. विनायक देशपांडे, लतीश देशमुख, डॉ.पी.आर. कुरुलकर, डॉ. संतोष दास्ताने, या ज्येष्ठ तज्ज्ञांनी आपली मते व्यक्त केली. याशिवाय डॉ. मारुती तेगमपुरे, डॉ.डी.के. मोरे, प्रा.अजय दरेकर, दि.मा. मोरे यांनी चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.

सदर चर्चासत्र व्यवस्थित पार पडण्यासाठी परिषदेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य इंगोले, स्थानिक कार्यवाह डॉ. विकास सुकाळे, यासह सर्वांनी सहकार्य केले. सदर चर्चासत्राचे सूत्रसंचालक म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेने मला दिलेल्या संधीबाबत परिषदेच्या ऋणामध्येच राहणे मला आवडेल. परिषदचे मनःपुर्वक आभार.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन
## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र तिसरे
## भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक महासत्ता बनण्याकडील वाटचाल

सुहास आव्हाड, संगमनेर
बी.एस. टी. महाविद्यालय

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक महासत्ता बनण्याकडील वाटचाल या विषयावरील चर्चासत्रात एकुण ३८ शोधनिबंध सादर करण्यात आले त्याचा संक्षिप्त अहवाल पुढील प्रमाणे आहे.

भारत २०२० पर्यंत आर्थिक महासत्ता होईल असे चित्र रंगवले जात असले तरी शोधनिबंधकांनी या संदर्भात बाजुने व विरूध्द बाजुने युक्तिवाद मांडले आहेत. प्रथम डॉ. माधुरी लेले यांनी, भारतातील शेतमजुरांची सध्यस्थिती आणि भवितव्य या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांनी शेतमजुरांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली. शेतमजुरांचे प्रश्न दूर झाले तरच भारत आर्थिक महासत्ता होण्यासाठी मदत होईल. शेतीची उत्पादकता वाढली तर शेतमजुरांचे भवितव्य आपोआप सुधारेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रा. मारूती तेगमपुरे यांनी जागतिकीकरण आणि दुर्बल घटक विचारात घेऊन शोधनिबंधाची मांडणी केली. प्रा. सागर कोंडेकर यांनी भारत महासत्ता होईल की नाही या बाबत आपले अनकुल व प्रतिकुल मते मांडली. तरूण लोकसंख्या भारताच्या महासत्ता बनण्याकडील वाटचालीस मदत करेल असा युक्तीवाद त्यांनी मांडला.

प्रा. डॉ. धनश्री महाजन यांनी भारताच्या व्यापार विषयक कामगिरीचा आढावा घेऊन भारताच्या महासत्तेच्या संदर्भात आपले मत व्यक्त केले. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटा अतिशय कमी आहे तो वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. प्रा. डॉ. सुहास आव्हाड व प्रा. डॉ. नितीन मुटकुळे यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या शोधनिबंधात ज्ञान अर्थव्यवस्थेची संकल्पना मांडली. शैक्षणिक गुणवत्ता या संकल्पेवर त्यांनी विशेष भर दिला आहे. डॉ. टी.एल. बारबोले यांनी भारताच्या बलस्थानांचा उल्लेख करून देश महासत्ता होण्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या. देशात संशोधन वृत्ती वाढविणे व कृति कार्यक्रम आखून देश महासत्तेकडे जाऊ शकतो असे प्रतिपादन केले. डॉ. संजय

वराडे व प्रा. मुरलीधर गायकवाड यांचे शोधनिबंध देशातील वास्तव परिस्थिती दर्शविणारे आहेत. देशातील युवकांच्या शक्तीचा योग्य वापर केला तरच देशाच्या विकासात फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्ती केली. प्रा. दिलीप महाजन यांनी भारतातील शेतमजुरांची सद्यस्थिती विशद केली. प्रा. रमेश कटके यांनी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता मांडली. प्रा. एस. वाय. माळोदे यांनी देशातील बलस्थाने मांडली त्याचबरोबर देशापुढील आव्हाने दुर करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

डॉ. दिपक भुसारे, डॉ.श्रीरंग कुडूक, आर. आर. गव्हाळे, प्रा. एस. टी. जनकवाडे, प्रा. सुदाम कोरडे, डॉ. शकुंतला पाटील, प्रा. सतीष पारधी, प्रा. कांचन मोरे, प्रा. पी. ई. विभुते, डॉ बी. डी. कोपलवार, प्रा.डॉ. एम. यु. मुलाणी, डॉ. टी.जी.गिते, डॉ. सौ. एस. यू मंडले, प्रा. विलास ठाकुर, प्रा. एन. टी. पाटील, डॉ. संजय तुपे, प्रा. होनश्री पाटील, प्रा. गजानन काळशेटी इत्यादी अभ्यासकांचे शोध निबंध साधारणतः एकाच गटात मोडणारे होते. या अभ्यासकांनी भारतापुढील विविध समस्या मांडून त्या दूर झाल्या तरच देश आर्थिक महासत्ता होवू शकेल असे प्रतिपादन केले. शेतीचा आकार, वाढती लोकसंख्या, भांडवलाचा अभाव, गोदाम सुविधा, पर्जन्यमान, भ्रष्टाचार, बेरोजगारी, विषमत्ता, गुन्हेगारी, पायाभूत सुविधांची कमतरत्ता, काळा पैसा, कुपोषण, परकीय गंगाजळीचा प्रश्न इत्यादी स्वरूपाचे प्रश्न वरील अभ्यासकांनी मांडून त्यावर उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला. यापुढे देशाने सुधारणात्मक उपाय अंमलात आणले नाही तर देश महासत्ता होणे अवघड आहे असे मत मांडले. देशापुढील आव्हाने दूर करण्यास आपण यशस्वी झालो तर नक्कीच भारत देश आर्थिक महासत्ता बनेल अशी आशा व्यक्त केली.

डॉ. गौतम भोंग, डॉ. मंगला भाटे, डॉ. डी. जी. धट, प्रा. आश्लेषा कुलकर्णी, प्रा. हेमंत मुजळगेकर, यांचे शोधनिबंध थोड्या वेगळ्या गटात मोडणारे होते. डॉ. भाटे यांनी आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संरक्षण क्षेत्र यांचा आढावा घेतला. त्यांनी लष्करी सामर्थ्य व संरक्षण रचनेत सुधारणा करणे आवश्यक आहे अशी अपेक्षा व्यक्त केली. सेनादलाचे आधुनिकीकरण करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. लष्करातून निवृत्त होणाऱ्या लोकांचा उपयोग देशविकासासाठी करता येईल असे त्यांनी सुचविले. प्रा. आश्लेशा कुलकर्णी यांनी स्त्रियांचे सबलीकरण झाल्याशिवाय देश महासत्ता होणे अवघड आहे. देशाचा मानव विकास सुधारण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

या सत्राचे अहवाल लेखनाचे काम प्रा.डॉ. आर. जी. रसाळ, पी.व्ही.पी. कॉलेज, प्रवरानगर यांनी केले. तर प्रा. डॉ. एस. वाय पाटील यांनी सत्राचे अध्यक्षस्थान भुषविले. शेवटी डॉ.आ. गो. पुजारी यांनी आपले मत मांडून हे सत्र संपले.

# ३५ वे वार्षिक अधिवेशन २०१०-११

## कार्यवाहांचा अहवाल

अनिल बाबूराव सूर्यवंशी,
कार्यवाह - खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दिनांक ०७ नोव्हेंबर ते ०९ नोव्हेंबर २०११ या तीन दिवसांच्या कालावधीत पीपल्स कॉलेज, नांदेड येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पुजारी, सांगोला (सोलापूर) यांनी अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भूषविले.

### अधिवेशन उद्‌घाटन सोहळा:

सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता उद्‌घाटन सोहळ्याचा प्रारंभ ईशस्तवन व दीप प्रज्वलनाने झाला. पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले यांनी लोकजीवनाशी संबंधित समस्यांवर विचारमंथन व्हावे या उद्देशाने प्रस्तुत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, असे मत आपल्या प्रास्ताविकात मांडले. या प्रसंगी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी म्हणाले, १९७७ मध्ये स्थापन झालेल्या परिषदेचे दिल्लीसह पाच राज्यात सदस्य आहेत. प्रतिवर्षी वार्षिक अधिवेशन व इतर विविध उपक्रमांद्वारे आर्थिक समस्यांवर चिंतन केले जाते. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील यांनी पुणे येथे परिषदेचे मध्यवर्ती कार्यालय व्हावे अशी योजना आहे यासाठी शासनाने सहकार्य करावे अशी विनंती केली.

संस्थेचे अध्यक्ष व अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे म्हणाले की, आज समाजाच्या प्रगतीसाठी मूलगामी संशोधन व विचारप्रवाह उंचावण्याची गरज आहे. विचारांच्या मंथनातून ज्ञान निर्माण होते. या अर्थशास्त्र परिषदेतून एक नांदेड पॅटर्न निर्माण व्हावा अशी इच्छा त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. नंतर अधिवेशनाचे उद्‌घाटक पालकमंत्री मा. ना. डी. पी. सावंत यांनी अर्थशास्त्र परिषदेच्या ३५ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटन झाल्याचे जाहीर करून आपल्या उद्‌घाटनपर भाषणात म्हणाले की, शास्त्र कुठलेही असो त्याच्या जोडीला अर्थशास्त्र शिकविले गेलेच पाहिजे, या मताचा मी आहे. अर्थशास्त्र व कायदा हे

दोन विषय शिकविले गेलेच पाहिजे. परिवर्तन हा संसाराचा नियम आहे. परिवर्तनाला सामोरे कसे जायचे याचे मंथन परिषदेत झाले पाहिजे. कृषी उद्योगांना प्राधान्य दिले तरच शेतकऱ्यांची आर्थिक कुवत वाढेल. आर्थिक महासत्ता होण्यासाठी ग्रामीण भाग सुधारला पाहिजे व सर्व क्षेत्रातील भ्रष्टाचार संपला पाहिजे. देशाला भ्रष्टाचाराने पोखरलेले आहे, अशी खंत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आ.गो.पुजारी यांनी महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण क्षेत्रासाठी पाण्याचा इष्टतम वापर या विषयावर महाराष्ट्रातील सिंचनविषयक धोरण, पाण्याची उपलब्धता, अवर्षण प्रवण भागातील पाण्याची स्थिती, पाण्याचे अर्थशास्त्र, सिंचनव्यवस्था आदी बाबींना स्पर्श केला.

उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती नार्बाडचे उपमहाप्रबंधक एल.एम. पालके, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्याध्यक्ष रत्नाकर महाजन तसेच नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष सदाशिवराव पाटील, सचिव ॲड. गोपाळराव औंढेकर, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. आ.गो. पुजारी, कार्याध्यक्ष डॉ. डी. के. पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ. अनिल सूर्यवंशी, 'अर्थसंवाद'चे प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम, माजी अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार, नूतन अध्यक्ष डॉ. कैलास पाटील, कॉलेजचे प्राचार्य तथा कार्याध्यक्ष डॉ. व्ही.एन. इंगोले स्थानिक कार्यवाह डॉ. विकास सुकाळे आदिंची उपस्थिती होती. 'अर्थविश्व' या स्मरणिकेचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभाच्या शेवटी स्थानिक कार्यवाह डॉ. विकास सुकाळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

**चर्चासत्रे:** अधिवेशन कालावधीत नेहमीच्या प्रथेप्रमाणे एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी दुपारी *' प्रा. जगदीश भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान '* या पहिल्या चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. कैलास पाटील यांनी यशस्वीरित्या केले. मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी *'भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल'* आणि *' ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभुत संरचना'* या दोन चर्चासत्रांचे सूत्रसंचालन अनुक्रमे डॉ.सुहास आव्हाड व डॉ. बो.के. माने यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले. बुधवार दिनांक ९ नोव्हेंबर २०११ रोजी सकाळी ९ ते ११ या दरम्यान **' महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक'** या आयत्या वेळेच्या विषयावर चौथे चर्चासत्र संपन्न झाले. प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले, डॉ. एम.एन. शिंदे, डॉ. र.पु. कुरुलकर, दी.बा. मोरे, कृष्णा भोगे, आदिंनी महाराष्ट्राचा मानवी विकास निर्देशांक या विषयाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण विवेचन केले. डॉ. आ. गो. पुजारी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

### प्रा. नी.वी. सोवनी स्मृती व्याख्यान-दुसरे पुष्प

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी.वी. सोवनी स्मृती व्याख्यान हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम ३४ व्या बदलापूर अधिवेशनापासून सुरु केलेला आहे. डॉ. रत्नाकर महाजन, उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ यांनी दुसरे पुष्प पीपल्स कॉलेज नांदेड सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर २०११ रोजी *' दारिद्रय निर्मुलन, सिद्धांत आणि व्यवहार'* या विषयावर गुंफले.

डॉ.महाजन यांनी या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन केले. गरीबी ही आपल्या सर्वांच्या जीवनातील वास्तव असले तरी त्याचे मोजमाप ही एक किचकट तांत्रिक व गणित प्रक्रिया आहे. गरीबीचे सूत्रबद्ध मोजमाप करुन एक ढोबळ अंदाज बांधण्याचे काम सर्वप्रथम वि.म. दांडेकर व नीळकंठ रथ यांनी १९७१ मध्ये केले. डॉ. महाजन यांनी १९८९ चा तज्ज्ञ गट, १९९१-९२ मधील दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे पहिले सर्वेक्षण, १९९३ साली दारिद्रय व दारिद्र्यरेषेचे पुनरावलोकन करण्यासाठी प्रा.डी.टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ गट, डिसेंबर २००५ मध्ये प्रा. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समिती, डॉ. अर्जुन सेनगुप्ता आयोग आदिबाबत विस्तृत विवेचन केले. दारिद्रय निर्मूलनांच्या विविध योजनांच्या परामर्ष घेतला. कोणतीही सरकारी योजना ही कागदावर आदर्श, गोंडस व सुंदरच दिसते. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारी यंत्रणा सुस्त, उदासीन व भ्रष्ट असल्याने या योजनांचा लाभ पात्र लोकांपर्यंत पोहचत नाही. राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणेला त्यांच्या सामाजिक कर्तव्याची व जबाबदारीची जाणीव निर्माण होईल तो सुदिन !

**वार्षिक सर्वसाधारण सभा:**

दिनांक ८ नोव्हेंबर २०११ रोजी सायंकाळी ६.०० वाजता डॉ. आप्पासाहेब पुजारी यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी दिवंगत माजी अध्यक्ष भ.ग. बापट, शशिकांत गंधे, स.ह. देशपांडे, उपसंपादक सु.गो. भानुशाली, सुरेश तेंडुलकर व दिवंगत आजीव सदस्य व मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वार्षिक सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे.

**३६ वे वार्षिक अधिवेशन:**

ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१२ मध्ये होणाऱ्या ३६ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी एकूण चार निमंत्रणे प्राप्त झाली होती. १) तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, २) आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे, ३) आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इंदापूर, ४) आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, भुसावळ. कार्यकारी मंडळाच्या शिफारसीनुसार सर्वसाधारण सभेने भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ. नहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ यांचे निमंत्रण एकमताने स्वीकारले.

३६ व्या वार्षिक अधिवेशनासाठी पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले. १) जोसेफ स्टिग्लीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान, २)भारतातील भाववाढीची चिकित्सा, ३) महाराष्ट्राचे जलधोरण.

**निवडणुका:**

३६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. कैलास पाटील, परभणी यांची बहुमताने निवड झाली. २०१२-१५ या तीन वर्षासाठी माजी अध्यक्ष डॉ. सूर्यकांत जगदाळे, वाशी यांची विश्वस्त म्हणून एकमताने निवड झाली. तसेच २०१२ ते १५ या तीन वर्षासाठी कार्याध्यक्ष म्हणून प्रा. चारुदत्त गोखले, जळगाव यांची बहुमताने निवड झाली.

२०१२-१५ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर प्राचार्य डॉ. रामकृष्ण टाले, नागपूर

विद्यापीठ आणि डॉ. तुकाराम मुंडे, नांदेड विद्यापीठ यांची अविरोध निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद ही जागा एकही अर्ज न आल्याने रिक्त राहिली.

**समारोप सोहळाः**

बुधवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता समारोप सोहळ्यास प्रारंभ झाला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे कृषिभूषण बुधाजीराव मुळीक, पुणे हे लाभले होते. व्यासपीठावर नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष सदाशिवराव पाटील, अधिवेशन अध्यक्ष डॉ. आ.गो. पुजारी, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ. अनिल सूयवंशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम, नाबार्डचे उपमहाप्रबंधक एल.एम. पालके, प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले, स्थानिक कार्यवाह डॉ. विकास सुकाळे, माजी अध्यक्षा डॉ. मुक्ता जहागिरदार आदि उपस्थित होते.

मुळीक म्हणाले की, मानवी विकासाचा दर ठरवित असताना शेतकरी केंद्रबिंदू न ठेवता व्यापारी, उद्योजकांकडे अधिक लक्ष दिले जाते. अर्थतज्ज्ञांनी कृषी उत्पादन, आयात, निर्यात यावर लिखाण करावे. त्यावरुन होणाऱ्या अर्थकारणावर प्रकाश टाकावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कापड उत्पादन करणारे, विक्री करणारे आत्महत्या करीत नाहीत तर कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करतात अशी खंत व्यक्त करुन यामागची कारणे शोधणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आ.गो. पुजारी, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, कार्यवाह डॉ. अनिल सूर्यवंशी यांनी अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल यजमान कॉलेजचे परिषदेच्या वतीने आभार व्यक्त केले. नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. कैलास पाटील, कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले, कार्यकारिणी सदस्य प्राचार्य डॉ. रामकृष्ण टाले व प्रा. तुकाराम मुंडे यांचा सत्कार करण्यात आला.

**परिषदेतर्फे विविध पारितोषिकांचे वितरणः**

म.अ. परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुणे व संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

१)डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक रु. ५०१/-.

आदिवासी समाजातील बालमृत्युची समस्याः प्रा. डॉ. जयवंत इंगळे, लोणंद, सातारा यांना देण्यात आले.

२) प्रा. मो.स. भावे पारितोषिक - रु. २५१/-

अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ट लेख, सातारा जिल्ह्यातील सौरउर्जा उपकरणांच्या घरगुती वापरासंबंधीच्या बाजारपेठेचे स्वॉट विश्लेषण या प्रा. उदय मारुती लोखंडे, कराड यांच्या लेखास देण्यात आले.

३)प्रा. रवींद्र सबनीस पारितोषिक रु. ४०००/-

डॉ. संजय तुपे, नाशिक यांच्या Gats and Indian Banking - Challenges Ahead या लेखास देण्यात आले.

४)प्रा. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कारः

अर्थशास्त्राच्या तरूण प्राध्यापकांनी

स्थानिक वृत्तपत्रातून सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेतून अर्थशास्त्रीय प्रश्नांवर लिखाण करावे या हेतूने प्रा. यशवंत राराविकर यांनी आपल्या पत्नीच्या नावाने हे पारितोषिक यावर्षापासून सुरू केले आहे.

१) प्रथम पारितोषिक : रु. १०००/- टोबिन टॅक्स - रोगापेक्षा उपाय भयंकर, या डॉ. विनायक गोविलकर, नाशिक यांच्या लेखास देण्यात आले.

२)द्वितीय पारितोषिक: रु. ५००/- द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले. २.१)डॉ. दि. व्य. जहागिरदार, अमरावती जागतिक वित्तीय संकटाचा भारताच्या बाह्य क्षेत्रावरील परिणाम.

२.२१) डॉ. ज.स. इंगळे, लोणंद, सातारा आदिवासी समाजातील बालमृत्यु : कारणे व उपाय

**अधिवेशन काळातील पारितोषिके:**

अधिवेशन काळातील चर्चासत्रात सादर होणाऱ्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधांना खालीलप्रमाणे पारितोषिके दिली जातात.

१) कै. ग.प्र. पिंपरकर व कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ.अमर्त्य सेन पारितोषिक रु.५०१/- प्रा. धीरज कदम, नांदेड यांच्या सीमा किंमत निर्धारण सिद्धांतात प्रा. जगदीश भगवती यांचे योगदान या शोधनिबंधास देण्यात आले.

२) पद्मजा गंधे पारितोषिक रु. १००१/-
परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात महिला सदस्याने सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास हे पारितोषिक प्रतिवर्षी दिले जाते. यावर्षी डॉ. श्रीमती युगंधरा एस. टोपरे, औरंगाबाद यांच्या *प्रा. जगदीश भगवती यांचे जागतिकीकरणाबाबतचे विचार* या शोधनिबंधास देण्यात आले.

३)डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक रु. ११११/-

प्रतिवर्षी वार्षिक अधिवेशनात विद्यार्थी सभासदाने सादर केलेल्या उत्कृष्ट शोधनिबंधास हे पारितोषिक दिले जाते. भारतीय स्त्रियांची वंचितता अधोरेखित करणार निर्देशांक G II या कु. आश्लेषा कुलकर्णी, नाशिक यांच्या शोधनिबंधास पारितोषिक देण्यात आले.

समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले आणि डॉ. विकास सुकाळे, स्थानिक कार्यवाह यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ. बी.आर. सोनवणे व डॉ. एल. एम. घाटगे यांनी प्रतिनिधींच्या वतीने मनोगत व्यक्त केले.

या अधिवेशनासाठी डॉ. डी.के. मोरे, इस्लामपूर, प्राचार्य डॉ. एस.बी. मंडले, मालवण, डॉ. अशोक हळ्ळी, सोलापूर, डॉ. श्रीराम पेडगांवकर, पुणे, डॉ. बी.एच. दामजी, सोलापूर, डॉ. व्य.सु. पाटणकर, पुणे, डॉ. मुक्ता जहागिरदार, अमरावती, डॉ. गौतम भोंग, पुणे यांनी तज्ज्ञ परीक्षक म्हणून मानद सेवा दिली. डॉ. कैलास पाटील, परभणी, डॉ. बाळासाहेब माने, इस्लामपूर, डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर यांनी अधिवेशन काळातील सूत्रसंचालन यशस्वीरित्या पार पाडले. तसेच डॉ. ज्ञानोबा मोरे यांनी डॉ. दत्तात्रय बागडे व प्रा. गणपतराव कलशेट्टी यांच्या सहकार्याने निवडणूक प्रक्रिया अत्यंत शिस्तबद्ध व शांततेने पार पाडली त्या सर्वांचे मी परिषदेच्या वतीने आभार व्यक्त करतो.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल
## २०११-१२ (खंड ३५, अंक १ ते ४)

अविनाश रामलाल निकम
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या 'अर्थसंवाद' त्रैमासिकाचा २०११-१२ या वर्षाचा ३५ व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा प्रथम अहवाल. अर्थसंवादचे ३५ खंड अखंडपणे प्रकाशित झाले. सन २०११-१२ या वर्षात अर्थसंवादचे चार अंक प्रकाशित झाले. अर्थसंवाद ISSN क्रमांक प्राप्त जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीतील प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिक ठरले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळेच परिषदेला हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थांनी अनुदान मंजूर करुन मोलाचे सहकार्य दिले आहे, त्याबद्दल मी या संस्थांचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन २०११-१२ च्या पस्तिसाव्या खंडात परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण, स्वतंत्र लेख, पी.एच्.डी. प्रबंधाचे सारांश, १ ग्रंथ परीक्षण, परिषदेच्या ३५ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा वृत्तांत, ४ संपादकीय, ४ अर्थ शब्दांची वाट पाहे, अर्थसंवाद २०११-१२ चा अहवाल, ३५ व्या राष्ट्रीय अधिवेनातील सत्रांचा अहवाल, ३६ व्या अधिवेशनातील चर्चासत्रांतील विषयांच्या रूपरेषेचे टिपण अशा विविधांगी मजकुराचा समावेश करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त अर्थतज्ज्ञ डॉ. सुरेश तेंडुलकर, डॉ. सु. गो. भानुशाली, डॉ.श्री. आ. देशपांडे यांच्या दुःखद निधनानंतर त्यांच्या कार्यकर्तृत्वासंबंधी श्रद्धांजलीपर लेख समाविष्ट करण्यात आले आहेत.

सन २०११-१२ या वर्षात प्रकाशित झालेल्या चारही अंकांची मिळून एकूण ४२२ पाने झाली. वर्षभरात ज्या ज्या लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले त्या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. अर्थसंवादच्या प्रमुख संपादकपदी माझी निवड परिषदेच्या कार्यकारिणीने एकमताने केली. तसेच बदलापूर येथील राष्ट्रीय अधिवेशनात उपस्थित सन्माननीय समस्त सभासदांनी

एकमताने संपादकपदाची धुरा माझ्यावर सोपविली त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. संपादक पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व माजी प्रमुख संपादकांनी आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोणत्याही लेखकाचे एकापेक्षा जास्त लेख गेल्या वर्षात अर्थसंवादमध्ये समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे अर्थसंवादच्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३५ व्या खंडात आहे. जास्तीत जास्त सभासदांना अर्थसंवादचे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह शोधनिबंधाच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने लेखांच्या संख्येने नवा उच्चांक गाठला आहे. त्याच बरोबर अंकाची गुणवत्ता कायम राखण्याचा प्रयत्न देखील केला आहे.

२) महाराष्ट्राच्या सर्व भागातून शोधनिबंध मागवून आलेल्या शोधनिबंधाचा समावेश करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

३) अर्थसंवादसाठी नवीन फॉण्टची निवड करुन त्याचबरोबर अंक अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला आहे.

४) गेल्या वर्षातील ४ पैकी ३ अंकांची मुखपृष्ठ व मुखपृष्ठाचे आतील पृष्ठ रंगीत छापले. यापुढे अर्थसंवादचा प्रत्येक अंक रंगीत आणण्याचा मानस आहे.

५) अंकाचे पाकीट या आधी परंपरेने खाकी रंगाच्या कागदाचे होते. सन्माननीय सभासदांपर्यंत पोचेपर्यंत बऱ्याच वेळा ते फाटत असे. अंक सर्वांपर्यंत सुरक्षित पोहोचावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिका प्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट प्रथमच आणत आहोत.

६) कागदाच्या किमती गेल्या दोन वर्षात दीड पटीने वाढल्या आहेत. महागाईच्या काळात देखील जळगाव येथील सातपुडा ऑफसेट लाठी परिवाराच्या सहकार्याने किफायतशीर किमतीत अंक तयार केले आहेत.

७) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या नांदेड येथील वार्षिक सर्वसाधारण सभेत मी महाविद्यालय व ग्रंथालयाच्या वर्गणी वाढीचा प्रस्ताव सादर केला. *अर्थसंवादची वार्षिक वर्गणी आधीच्या रु.६००/- वरून रु.१०००/- करावी, पंचवार्षिक वर्गणी आधीच्या रु.१०००/- यात वाढ करून रु.१५००/- करावी* या प्रस्तावाला नांदेड सभेतील उपस्थित सर्व आजीव सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे अर्थसंवादच्या उत्पन्नात भरीव वाढ झाली आहे. कागदाच्या वाढत्या किमती पाहता ही वाढ केली आहे.

८) पृष्ठ संख्येचे नियोजन केल्याने सर्व अंकांमध्ये एकही पृष्ठ कोरे सोडलेले नाही.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अर्थसंवाद आपापल्या महाविद्यालयात घेतला जाईल याकडे परिषदेच्या सर्व सदस्यांनी लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी कार्यकारिणी सदस्य व सन्माननीय सभासदांनी आपापल्या परिसरातील एखादी पूर्ण

## अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिति

| अ.क्र. | तपशिल | २०१०-११ | २०११-१२ |
|---|---|---|---|
| १ | चार अंकातील एकूण लेख | २८ | ३९ |
| २ | चार अंकातील स्वतंत्र लेखांचे एकूण लेखक | ३५ | ५० |
| ३ | चार अंकाच्या एकूण प्रती | ६८०० | ६८६० |
| ४ | चार अंकाची एकूण पृष्ठे | ४३६ | ४२२ |
| ५ | चार अंकातील रंगीत अंकसंख्या | ०१ | ०३ |
| ६ | चार अंकाचा एकूण खर्च (रु.) | २०९६९६ | २२७५०३ |
| ७ | दर नगाचा सरासरी खर्च (रु.) | ३०.८३ | ३३.१६ |
| ८ | दर पानाचा सरासरी खर्च (रु.) | ०.२८ | ०.३१ |
| ९ | जाहिराती पासून उत्पन्न (रु.) | ४१००० | ४३००० |

*टीप: २०११-१२ या वर्षाची आकडेवारी देताना अर्थसंवाद खंड ३५ चे चार अंक विचारात घेतले आहेत.*

पानाची जाहिरात उपलब्ध करुन दिल्यास अंक वेळेत निघणे तसेच अर्थसंवादची तुट कमी होण्यास मदत होईल. अर्थसंवाद त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाच्या १७०० पेक्षा अधिक प्रती छापल्या जात आहे. आजीव सदस्य व वर्गणीदार यांच्या संखयेत सातत्याने वाढ होणे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे. चारही अंकांची एकूण पृष्ठसंख्या ४२२ इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक सामान्यपणे १०० पृष्ठांच्या जवळपास ठेवण्याची परंपरा कायम राखली आहे. अर्थसंवादच्या ३५व्या खंडात जाहिरातीपासून एकूण उत्पन्न रु.४३०००/- मिळाले आहे. हे उत्पन्न मिळविण्यासाठी चारुदत्त गोखले, संतोष कदम, कैलास पाटील, आ.गो. पुजारी, विकास सुकाळे यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळात विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींपैकी एकाही सदस्याने वर्षभरात अनेकदा विनंती करुन देखील एकही जाहिरात दिलेली नाही हे सदस्य पुढील वर्षी प्रत्येकी एक जाहिरात देऊन सहकार्य करतील अशी अपेक्षा बाळगू या. ३५ व्या खंडातील चारही अंकांचा एकूण खर्च रु.२२७५०३/- इतका झाला. गेल्या दोन वर्षात कागदाच्या किमती दीडपटीने वाढल्या आहेत. तरी देखील अर्थसंवादचा खर्च काटकसरीने केला आहे ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,

मुंबई यांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेने २०११-१२ मध्ये अर्थसंवाद प्रकाशनासाठी रु.७०,०००/- अनुदान दिले आहे. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने २०११-१२ साठी रु.२५०००/- अनुदान दिले आहे. दरवर्षी या दोन्ही संस्था अनुदान देतात. या दोन्ही संस्थांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी कार्यवाह अनिल सुर्यवंशी व माजी संपादक जगन्नाथ पाटील यांचे सहकार्य लाभले.

भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी चालू घडामोडींवर आधारित लेख देण्याची परंपरा कायम राखली. स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, तसेच शेती क्षेत्र उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आदिवासी विकास या विषयावरील लेख अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले.

बऱ्याच वेळी ठरलेल्या फॉण्टमध्ये व पेजमेकरमध्ये टाईप करून लेख न येणे, पाकीटात सीडी तडा पडून प्राप्त होणे किंवा आलेली सीडी ओपन न होणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे विजेचे भारनियमन अशा कारणांनी अर्थसंवादचा अंक त्या-त्या तिमाहीच्या अखेरीस देण्याची इच्छा पूर्ण झाली नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात जाहिरात देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्या करिता कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी अर्थसंवादला मदत करण्याची गरज आहे. पीपल्स कॉलेज, नांदेड येथे संपन्न झालेल्या पस्तिसाव्या वार्षिक अधिवेशनात ६ नोव्हेंबर २०११ रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या प्रसंगी पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना केल्या.

अर्थसंवादच्या ३५ व्या खंडाची जडण घडण करण्यासाठी अनेकांनी मला मोलाची मदत केली. आदरणीय नवनियुक्त कार्याध्यक्ष चारुदत्त गोखले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. जळगाव येथे अंकाची छपाई होत असताना ज्या ज्या वेळी अडचणी आल्या त्या त्या वेळी गोखलेसर मदतीला उभे राहिले. लेखक, जाहिरातदार, कार्यकारी मंडळ सदस्य, माजी संपादक जगन्नाथ पाटील, माजी अध्यक्ष ज. फा. पाटील, विनायक भिसे, विनायक देशपांडे, दि. व्यं. जहागीरदार, संतोष दास्ताने, कार्यवाह खजिनदार अनिल सुर्यवंशी, नवनियुक्त अध्यक्ष कैलास पाटील, अध्यक्ष आ.गो. पुजारी, कार्याध्यक्ष दिलीप पाटील, विश्वस्त मधुकर शिंदे, एस.डी. जोशी, बी.के. शिंदे, प्रशांत काटोले, सुरेश ढाके, राहुल म्होपरे, विजय भोपाळे यांचे मार्गदर्शन व योगदान महत्त्वाचे ठरले. सर्व अंकांची कॉम्प्युटरमध्ये जडण घडण करण्यासह प्रूफ रीडींग करणारे सुनिल भांडारकर व सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या मित्रांच्या सहकार्याशिवाय मी अंक आणू शकलो नसतो. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. अर्थसंवादचे सहाय्यक संपादक शंकर पवार, सल्लागार मंडळ सदस्य संतोष कदम, लालासाहेब घाटगे, मोहन चौधरी, शिवाजी अंभोरे यांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. राष्ट्रीय पातळीवरील त्रैमासिक अर्थसंवाद अधिक दर्जेदार बनविण्यासाठी आपण सर्व जण यथाशक्ती प्रयत्न करु या !

# निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

## जोसेफ स्टिग्लीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान

**आप्पासाहेब पुजारी, सांगोला**
प्राचार्य, सांगोला महाविद्यालय, जिल्हा सोलापूर
भ्रमणध्वनी: ९९६०१२५०१५

जोसेफ स्टिग्लीश हे थोर अर्थशास्त्रज्ञ असून त्यांनी अर्थशास्त्राच्या अनेक पैलूंवर आपले स्वतंत्र असे विचार मांडले आहेत. त्यात आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय धोरण, जागतिकीकरण, बँकींग रोजगार उपलब्धता, कल्याणकारी अर्थव्यवस्था इत्यादी संदर्भात आपली मते मांडली आहेत. त्यांनी जागतिक बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ आणि उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. अशा विविध पदांवर काम करीत असताना अर्थशास्त्राच्या अनेक मुद्द्यांवर आपली परखड मते मांडली आहेत. त्यातील काही विचार शोधनिबंध तयार करण्यासाठी पुढील प्रमाणे देत आहे.

जागतिकीकरण व त्या विषयीची नाराजी या विषयीच्या त्यांच्या परखड मतावर पुढील मुद्द्यांच्या सहाय्याने शोधनिबंध तयार करता येईल. कोणत्या पार्श्वभूमीवर जागतिकीकरणाचे आगमन झाले? या कालावधीत अर्थव्यवस्थेला निवडीचे स्वातंत्र्य लाभले का? या संदर्भात रशियाचा आढावा घेता येईल. व्यापार तोलातील समस्यांचा आढावा घेता येईल. सक्षमपणे जागतिकीकरणाचे धोरण राबविण्यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची भूमिका स्टिग्लीश यांच्या दृष्टिकोनानुसार स्पष्ट करावी.

स्टिग्लीश यांनी सार्वजनिक आयव्ययावर देखील भाष्य केले आहे. त्यात सरकारची भूमिका या प्रक्रियेमध्ये कुटूंब या घटकाचे निर्णय आणि श्रमाचा पुरवठा, अर्थव्यवस्थेवर दीर्घ काळात कराचे, बचतीचे आणि निर्णय प्रक्रियेचे होणारे परिणाम, करधोरण आणि उद्योग संस्था, कराघात आणि *सिंगल कॉम्पीटेटीव्ह इक्वीलीब्रीयम मॉडेल,* विकसनशील अर्थव्यवस्थेतील कर आणि कर्जधोरण या विषयीचा सैध्दान्तिक दृष्टिकोन इत्यादी विषय शोधनिबंधासाठी हाताळावे.

*फेअर ट्रेड फॉर ऑल* या त्यांच्या पुस्तकातील पुढील मुद्द्यांच्या सहाय्याने शोधनिबंध सादर करता येईल. यामध्ये व्यापाराचे विकासातील योगदान व महत्त्व, दोहा परिषदेचे यश, अनुकूल कराराची तत्त्वे, विकसनशील राष्ट्रासाठी विशेष योजना, विकसित देशासाठी व्यापाराचे मुख्य लक्ष्य, खुली अर्थव्यवस्था कशी

निर्माण करता येईल? व्यापारातील उदारीकरण आणि समायोजनाचा खर्च इ.

*मेकींग ग्लोबलायझेशन वर्क* या त्यांच्या पुस्तकातील पुढील मुद्यांच्या सहाय्याने शोधनिबंध सादर करता येईल. यामध्ये विकासाची वचनबध्दता, अनुकूल व्यापार कसा करता येईल? पेटंट, नफा आणि समाज, संसाधनाच्या शापापासून मुक्ती, वसुंधरेचे संरक्षण, बहुराष्ट्रीय कंपन्या, कर्जाचे ओझे, जागतिक राखीव निधीचे संवर्धन, लोकशाहीकृत जागतिकीकरण इत्यादी बाबींवर चर्चा करता येईल.

जोसेफ स्टिग्लीश यांच्या *व्हेदर सोशॅलिझम* या पुस्तकातील पुढील मुद्यांच्या सहाय्याने शोधनिबंध सादर करता येईल. सामाजिक सिध्दान्त आणि आर्थिक संकल्पना, बाजाराधिष्ठीत समाजवाद, कल्याणकारी अर्थशास्त्रातील मूलभूत सिध्दान्तावरील टीका, लॅंग, लर्नर आणि टेलर यांच्या सिध्दान्ताचे मूल्यमापन, स्पर्धात्मकता, नवोन्मेषन, खासगीकरण, भांडवली बाजारपेठेतील सुधारणा इत्यादी.

त्याचप्रमाणे त्यांच्या *स्टॅबिलीटी वुईथ ग्रोथ* या पुस्तकातील विनिमय दराचे व्यवस्थापन, खुल्या अर्थव्यवस्थेतील आव्हाने, भांडवली बाजारपेठ आणि उदारीकरण इत्यादी विषयांवर शोधनिबंध सादर करता येईल. शोधनिबंध तयार करण्यासाठी जोसेफ स्टिग्लीश यांच्या काही काही ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.


1) *Whether Socialism?*, The MIT Press, Cambridge, Massachutatts, England.
2) *Stability With Growth, Macroeconomics, Liberalisation and Development*, Oxford University Press,
3) *The Collected Scientific Papers of Samuelson*, Edi. Joseph Stigliz, The MIT Press.
4) *Globalization and India's Ist Discontents*, Allen Lane an imprint of Penguin Books.
5) *Making Globalization Work*, Penguin Books.
6) *The Economics Role of the State*, Basil Blackwell.
7) Lectures on Public Economics* Anthony B. Atkinson* Joseph Stigliz, Mac Grow-Hill International Edition, Economics Series.
8) *Fair Trade for All - How Trade can Promot Development*, Joseph Stigliz* Andrew Charlton.
9) *Economics of the Public Sector*, 3rd Edition.

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा

## भारतातील भाववाढ

**शर्मिष्ठा सातव - मतकर, पुणे**
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९४२३५६८६४३

भाववाढ ही आर्थिक घडामोड इतिहासात नवीन नाही. टंचाई, पुरवठ्यातील मागणीसापेक्ष तुटवडा उद्भवला की कोणत्याही वस्तूच्या किंमतीला चढती कळा येते. परंतु सामान्यत: एखाद्या दुसऱ्या नव्हे तर सरसहा बव्हंशी वस्तू सेवांची किंमतपातळी सातत्याने चढत राहण्याची प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या विशेष समजली जाते. विशेषत: गेल्या शतकामध्ये ही प्रक्रिया सर्वंकषपणे व दीर्घकाळ चिवटपणे टिकलेली आढळते.

किंमतपातळी (भारित सरासरी किंमत पातळी) मधील या चालणुकीचे सैध्दांतिक विवेचन करणाऱ्या अनेक विचारशाखा आहेत. आर्थिक संरचनेतील ठेवणीमुळे क्षेत्राक्षेत्रांची (intersectoral) सापेक्ष किंमत निर्धारित करण्याची कुवत भिन्न असते. क्षेत्रीय (sectoral) सापेक्ष किंमतींची परस्पर सौदा प्रक्रिया व ताकद यामुळे किंमत व पातळीची ठेवण व चढती कमान अवतरते असे म्हणणारा एक विचार प्रवाह आहे. अशाच धाटणीने निरनिराळ्या उत्पादन घटकांतील सौदाशक्ती नुसार घटक किंमतीच्या वाढीचे व बदलाचे विश्लेषण देखील केले जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर घटकांच्या बदलत्या सापेक्ष वाट्याचा आणि किंमत वाढीचा परस्पर संबंध असतो. किंमतवाढीचा उत्पन्न वाटपावर व उत्पन्न वाटपाचा किंमत पातळीवर असा दुहेरी चक्राकार संबंध असू शकतो.

किंमत पातळीला सापेक्ष व केवळ अशा दोन्ही पध्दतीने निरखता येते. सामान्य किंमतपातळी, एकूण मागणी व एकूण पुरवठा आणि त्यांची विनिमयाद्वारा परस्पर सांगड घालणारी चलन / पैसा पध्दती यांच्या आधारेच किंमत पातळीचे विश्लेषण केले पाहिजे अशी विचारधारा देखील मोठी दृढ आणि प्रबळ आहे. किंमत वाढीचे मुद्रा (monetary) किंवा पैसात्मक विश्लेषण या ढोबळ शीर्षकाखाली या विचार परंपरेतील विवेचनाचा उल्लेख केला जातो.

गेल्या काही दशकात (विशेषत: १९२० नंतर) सरकारी व सार्वजनिक खर्च / कर्ज / वित्त या आर्थिक प्रजातीचा वापर जगभर बळावला आहे. सार्वजनिक वित्ताने वस्तू / सेवांच्या एकूण मागणी पुरवठ्यावर प्रभाव पडतोच परंतु त्याच

ओघामध्ये पैशाचा/कर्जाचा पुरवठा, तुटवडा यावर देखील जाणता तर कधी अजाणता असा आपसुक असर होतच असतो. परिणामी सरकारी खर्च/कर्ज व वित्त यांचाही किंमतवाढीच्या प्रतीशी/गतीशी व धाटणीशी संबंध येतो.

सार्वत्रिक टिकाऊपणे अध्याहृत चालणाऱ्या सरासरी किंमतवाढीच्या या सैध्दांतिक आकलनानुसार निरनिराळ्या देशात झालेल्या किंमतवाढींचे विश्लेषण केले जाते. विशेषत: मध्यवर्ती बँकांच्या धोरणाची आखणी किंमतवाढ काबूत ठेवणे या ध्येयावर शक्यतोवर विसंबली जाते. सैध्दांतिक पातळीवर आर्थिक वृध्दी आणि किंमत वाढ यामध्ये एक प्रकारची रस्सीखेच असते. वृध्दी पाहिजे तर थोडी तरी किंमतवाढ सोसायला पाहिजे आणि किंमतवाढ रोखायची तर वृध्दीचा बळी घेतला जाणार अशा प्रकारची ही दुविधात्मक खेचाखेच मानली जाते. वृध्दीचे माप रोजगाराच्या रूपात धरले तर ही दुविधात्मक खेच फिलिप्स वक्र या नावाने ओळखली जाते.

या सैध्दांतिक प्रवाहाचे पार्श्वसंगीत गृहीत धरून भारतातील भाववाढ (विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळातील) या घडामोडीचे विश्लेषण करणारे शोधनिबंध मुख्यत: या चर्चासत्रात अभिप्रेत आहेत. कुठल्याही ऐतिहासिक व संख्यात्मक तथ्यावर आधारलेल्या विश्लेषणामागे एक वा अनेक सैध्दांतिक धारणा आपसूकच प्रचलित व अध्याहृत असते. त्या धारणांमधील फरकामुळेच एकाच तथ्यांचा विविध अन्वय शक्य होतो. इतकेच काय कोणती धारणा हाती असलेल्या तथ्यांचा अधिक यथार्थ उलगडा करते अशा तुलनात्मक संशोधनाचे शोधनिबंध देखील या चर्चांमध्ये स्वागतार्ह असतील. उदाहरणार्थ भारतातील किंमतवाढीचे स्वरूप निरनिराळ्या कालखंडात एकाच जातकुळीचे आहे का? की बदलत्या आर्थिक स्थित्यंतराबरोबर किंमतवाढीची घडण, गती, परिणाम यांच्यामध्ये लक्षणीय बदल दृग्गोचर होताना दिसतात? मुद्रा / पैसावादी दृष्टीकोनातून पाहिल्यास भारतीय किंमत वाढ व ती आटोक्यात राखण्याचे धोरणात्मक यत्न कधी, किती अवधीनंतर, किती प्रमाणात यशस्वी होताना दिसतात? सार्वजनिक / सरकारी कर्ज तूट, पैशांचा पुरवठा यांच्यामधील थेट व अप्रत्यक्ष संबंध लक्षात घेता किंमतवाढ नियंत्रणाची मुद्रा, वित्तीय आणि वार्षिक वित्तीय धोरणाची आखणी कशी आहे? कशी असावी? किंमत नियंत्रण (वस्तू-वस्तू नुसार बेतलेले किंमत नियंत्रण किती काळापर्यंत प्रभावी असू शकते? उदा. खनिज तेल व तेलजन्य वस्तू) असे वस्तू / सेवांवर असणारे किंमत नियंत्रण दीर्घ काळ चालू ठेवल्याने किंमत वाढ रोखता येते की तसा आभास तयार होतो? विविध क्षेत्रांतील किंमत वाढीमागचे लक्षणीय घटक एकसारखे आहेत काय? किंमत वाढीच्या हाताळणी करिता वापरण्यात येणाऱ्या धोरणात्मक हत्यारांचे सापेक्ष / तुलनात्मक मूल्यमापन अथवा भारतातील काही भाववाढ ही अर्थातच अन्य जागतिक भाववाढीशी संबंधित आहे. आर्थिक हद्दींमधील खुलेपणा वाढला की, वेगवेगळ्या अर्थव्यवस्थांमधील किंमतपातळी देखील परस्परावलंबीपणे फेरजुळणी करू लागतात. १९९७ पासून वस्तू व भांडवल व्यापारातील खुलेपणा धीमेपणाने वाढत चालला आहे. त्याचे प्रतिबिंब किंमत वाढीच्या प्रक्रियेशी किती निगडित आहे, या पैलूवर देखील प्रकाश टाकणारे शोधनिबंध पाठवावेत.

**निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयांची रूपरेषा**

# महाराष्ट्राचे जलधोरण

दी. मा. मोरे, पुणे

भ्रमणध्वनी: ९४२२७७६६७०

जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील शाश्वत विकासासाठी पाणी या नैसर्गिक साधन सामग्रीचे अनन्य साधारण महत्त्व आहे. भारताची आजची लोकसंख्या १२० कोटीच्या आसपास आहे. जगाने ७०० कोटींचा आकडा ओलांडला आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या १० कोटींच्या वर आहे. येत्या ४० वर्षात म्हणजे २०५० पर्यंत जग ९०० कोटींच्या आसपास पोहोचेल. भारताने १५० कोटींचा आकडा ओलांडला असेल तर राज्याची लोकसंख्या १३ कोटींचा आकडा ओलांडेल. वाढणाऱ्या लोकसंख्येमध्ये विकसित देशांचा वाटा नगण्य राहणार आहे आणि होणारी वाढ ही प्रामुख्याने अविकसित आणि विकसनशील देशाच्या शहरी भागातच होणार आहे. काळानुरूप जगाच्या राहणीमानात सुध्दा बदल होणार आहे. त्याच्या ताटामध्ये प्राणीजन्य खाद्य पदार्थांची वाढ होणार आहे. या सगळ्यांच्या परिणामस्वरुप अन्न-धान्याची गरज वाढणार आहे.

भारतातील उपखंडावर पावसाद्वारे दरवर्षी ४००० अ.घ.मी. इतके पाणी उपलब्ध होते. त्यापैकी सुमारे १८६९ अ.घ.मी.सरासरीने दरवर्षी नद्यांद्वारे वाहते. यापैकी ११२३ अ.घ.मी. पाणी वापरता येते. यातील ४३२ अ.घ.मी. पाणी भूजलाच्या स्वरुपात आहे. महाराष्ट्रात नद्यांद्वारे वाहणारे पाणी १६५अ.घ.मी. च्या जवळपास आहे. यातील भूजल ३२ अ.घ.मी. आहे. नदी लवादाच्या निर्णयानुसार नद्यांमधून वाहणाऱ्या पाण्यापैकी १२५ अ.घ.मी. पाणी वापरता येऊ शकते. पाण्याचा वापर प्रामुख्याने शेती, घरगुती वापर, उद्योग, उर्जा, पर्यटन मत्स्यपालन, नौकायन, पर्यावरण संरक्षण यासाठी केला जातो. यापैकी पहिल्या चार गरजा आवश्यक घटकामध्ये समाविष्ट होतात. पाण्याशिवाय शेती होत नाही. भारताने १९८७ मध्ये पाण्याचे धोरण निश्चित केले त्याला *राष्ट्रीय जल नीती* संबोधले जाते. सर्व राज्यांनी त्यांच्या प्रदेशाला अनुरूप अशी राज्यांची जल नीती ठरवावी असे पण निर्देश दिले गेले. महाराष्ट्राने २००३ साली राज्याची जल नीती तयार केली. २००२ साली राष्ट्रीय जल नीती मध्ये सुधारणा करण्यात आल्या. २०१२ मध्ये परत *राष्ट्रीय जल नीती* मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. जल नीती मध्ये पाणी विकासाच्या दृष्टीबद्दल भाष्य करण्यात येते. या धोरणाला अनुसरून वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी व वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठी पाण्यासंबंधी कायदे केले जातात. कायद्याच्या

अंमलबजावणीसाठी नियम लागतात. थोडक्यात पाणी विकासाचे धोरण ठरविण्यासाठी जलनितीची निर्मिती आणि जलनितीची धोरणे अंमलबजावणीसाठी कायदे आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियम अशी ही उतरंड आहे. महाराष्ट्राने २००५ मध्ये राज्याच्या जलनितीत सिंचनाचा विकास, सिंचनाचे व्यवस्थापन, पाणी वापराचे हक्क, पाण्याचे दर इत्यादी बाबींच्या अंमलबजावणीसाठी दोन कायदे तयार केले आहेत. भूजल-नियमनाचा कायदा नुकताच विधानसभेमध्ये मंजूर झाला परंतु त्याचे कायद्यात रुपांतर होण्यास अवकाश आहे. पाणी विकासाच्या धोरणाची बैठक राज्याच्या जलसिंचन आयोगाच्या (१९६२ चा बर्वे आयोग आणि १९९९ चा चितळे आयोग) अहवालात स्पष्ट केले आहे. पाण्याचा विकास पाणलोट, उपखोरी, खोरी या नैसर्गिक घटकांना विकासाचे क्षेत्र समजून केला पाहिजे.

पाण्याचे प्रदुषण हे देशापुढे फार मोठे आव्हान उभे ठाकले आहे. तंत्रज्ञान आहे, पैसा आहे, मनुष्यबळ आहे पण विचारांची दिशा नाही म्हणून प्रदुषणाचा हा राक्षस देशाचे मनुष्य व प्राणी जीवांसमोर भयप्रद स्थिती निर्माण करत आहे. अल्पावधीत या प्रश्नावर देशाला मात करावयाची आहे. नद्या कोरड्या नकोत, पाणलोटाचे वाळवंटात रुपांतर नको यासाठी पाणी वापरामध्ये विवेक आणावयाचा आहे. महाराष्ट्र राज्य वैविध्यतेने नटलेले आहे. राज्यात विकासाचा असमतोल निर्माण झाला आहे. काही भागात १०० वर्षांपासून नको तितके पाणी वापरून सुध्दा लोकांचा पाण्याचा लोभ कमी होत नाही. जमिनी क्षारपड झाल्या आहेत. उत्पादकता घटत आहे. वैचारिक परिवर्तनास उशीर होत आहे. या दिशेने समाजमन बनविण्याची मोठी जबाबदारी आहे.

महाराष्ट्रात नैसर्गिक साधन संपत्ती प्रामुख्याने जमीन व पाणी यांच्या उपलब्धतेमध्ये कमालीची विषमता आहे. तुटीच्या खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता व उत्पादकतेत वृध्दी करणे गरजेचे आहे. या दोन्ही बाबतीत आपण फार मागे आहोत असेच म्हणावे लागते. पाणी वाचविणे आणि पाणी अधिक उत्पादक करणे हे त्या अर्थाने पाण्याची उपलब्धता वाढविणेच ठरते. पाण्याच्या विपुल प्रदेशातून तूटीच्या प्रदेशात पाण्याचे संक्रमण करणे देखील महत्त्वाचे असते. पाण्याचे संक्रमण, पाण्याचे विस्तारीकरण, पाणलोट क्षेत्र विकास, जलाशय निर्मिती, पाण्याचे वाटप, पाण्याची किंमत, पाण्याची मोजणी, पाण्याचे प्रदुषण, पीक पध्दती, शेती पध्दती, सिंचन पध्दती, आधुनिक सिंचन प्रणाली, फळबागा, कृषि-आधारित उद्योग, पाण्याचे खासगीकरण, पाणी आणि पर्यावरण, उर्जेसाठी पाणी, उद्योगासाठी पाणी, पाण्याचा पुनर्वापर, पाण्याची काटकसर, पाण्याच्या उपशाचे अर्थशास्त्र ह्यांसारख्या अनेक जिव्हाळ्याच्या विषयांवर समाज बांधणीसाठी सातत्याने विचार मंथन घडण्याची गरज आहे. पाणी वापरातील अधाशीपणा पर्यावरणीय प्रश्नाच्या निर्मितीस कारणीभूत ठरत आहे. तंत्रज्ञानाचा वापर आणि त्यासाठी मानसिकतेत बदल यातून प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत. आगामी अर्थशास्त्र परिषदेत पाणी या विषयावर समाजाला व देशाला पोषक ठरेल अशी चर्चा घडून यावी, ही अपेक्षा आहे.

**संदर्भ:**

१) राष्ट्रीय सिंचन आयोग - १९७२ आणि १९९९
२) महाराष्ट्र जल व सिंचन आयोग - १९९९,
३) राष्ट्रीय जल निती - २००२,
४) महाराष्ट्राची जल निती - २००३.

## सन २०११-१२ या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | नाव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| १ | निमले शीतल संपत | १४६६ |
| २ | राजपुत करमसिंग आर. | १४६७ |
| ३ | मोरे साहेबराव बाबाराव | १४६८ |
| ४ | गायकवाड प्रमिला मारुती | १४६९ |
| ५ | परहर वाल्मिकी दगडू | १४७० |
| ६ | फापाळे अनिता शंकर | १४७१ |
| ७ | म्हात्रे रमेश पदू | १४७२ |
| ८ | सूर्यवंशी अमृता अनिल | १४७३ |
| ९ | भोसले दिगंबर दत्तराव | १४७४ |
| १० | चव्हाण जयश्री सदाशिव | १४७५ |
| ११ | कोल्हे रुपेश सुरेश | १४७६ |
| १२ | तायडे पंकज मारुतीराव | १४७७ |
| १३ | कोंडेकर सागर संतोष | १४७८ |
| १४ | भुसारे दीपक विठ्ठल | १४७९ |
| १५ | भोपाळे विजय नागोराव | १४८० |
| १६ | कदम संभाजी किसन | १४८१ |
| १७ | मोहदरे संतोष देविदास | १४८२ |
| १८ | मोहिकार हरिहर शिवदास | १४८३ |
| १९ | जमनुके रामदास शंकर | १४८४ |
| २० | वानखेडे रामा संभाजी | १४८५ |
| २१ | कांबळे रत्नाकर रामराव | १४८६ |
| २२ | कसबे सुजित मनोहर | १४८७ |
| २३ | साबळे किशोर विनायकराव | १४८८ |
| २४ | वंगरवार हरि पंढरी | १४८९ |
| २५ | वशेणीकर प्रफुल्ल पांडुरंग | १४९० |
| २६ | महाते विलास शांताराम | १४९१ |
| २७ | चव्हाण कैलास रतिलाल | १४९२ |
| २८ | कार्शिदे रमेश तुकाराम | १४९३ |
| २९ | चौधरी हेमराज डोमाजी | १४९४ |
| ३० | लभाणे राहूल मोरेश्वर | १४९५ |

| अ.क्र. | नाव | सभासद क्रमांक |
|---|---|---|
| ३१ | पाटील शिवाजी रामराव | १४९६ |
| ३२ | मडावी अण्णाजी दयाराम | १४९७ |
| ३३ | डॉ.पोतनूरवाड शरयू मनिष | १४९८ |
| ३४ | रिठे महादेव आसाराम | १४९९ |
| ३५ | पाटील उषा एन. | १५०० |
| ३६ | पवार सचिन नामदेव | १५०१ |
| ३७ | जाधव कैलास दिलीप | १५०२ |
| ३८ | कदम शालिनी उत्तमराव | १५०३ |
| ३९ | कांबळे शिलादेवी पांडुरंग | १५०४ |
| ४० | गायकवाड अनिल लक्ष्मण | १५०५ |
| ४१ | जाधव सतीष रामराव | १५०६ |
| ४२ | सूर्यवंशी ज्ञानेश्वर नारायणराव | १५०७ |
| ४३ | साळी आर. पी. | १५०८ |
| ४४ | धोंडे संजय विठ्ठल | १५०९ |
| ४५ | पवार विजय अर्जुन | १५१० |
| ४६ | घाटगे प्रमोद रघुनाथराव | १५११ |
| ४७ | पवार धोंडीराम भोजू | १५१२ |
| ४८ | नांदुरे विजय लक्ष्मण | १५१३ |
| ४९ | प्रधान अस्मिता मिलिंद | १५१४ |
| ५० | बळिराम दादाराव उंदरे | १५१५ |
| ५१ | जवळगावकर श्रीकांत | १५१६ |
| ५२ | सोनवणे मनिषा रमेशराव | १५१७ |
| ५३ | तापस पौर्णिमा | १५१८ |

## अर्थसंवाद (खंड ३५, २०११-१२)

### (अ) लेख सूची:


| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील व्यापारी बँकाच्या थकीत कर्जाचा तुलनात्मक अभ्यास | १-१८ |
| २ | मुद्रा परिमाण सिद्धांत आणि किन्सचे पुनर्निर्माण | १९-२४ |
| ३ | किसान क्रेडिट कार्ड योजनेची प्रगती आणि भवितव्य | २५-३८ |
| ४ | महाराष्ट्र आणि खानदेशच्या पीकरचनेतील बदलांचा तौलनिक अभ्यास | ३९-४९ |
| ५ | शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा तौलनिक अभ्यास | ५०-५९ |
| ६ | स्त्री सबलीकरणासाठी महिला आरक्षण: एक प्रभावी मार्ग | ६०-७० |
| ७ | परभणी जिल्हा परिषदेने कृषिक्षेत्रावर केलेल्या खर्चाचा अभ्यास | ७१-७६ |
| ८ | महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत शेतीचे स्थान | ७७-८४ |
| ९ | सोलापूर जिल्ह्यातील मुस्लिम शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती | ८५-९९ |
| १० | अर्थ शब्दांची वाट पाहे (लोकसंख्या लाभांश: समज व अपसमज) | १००-१०३ |
| ११ | २०१० चा वैश्विक भूक निर्देशांक व भारत | १०७-११७ |
| १२ | किमान वेतन व असंरक्षित माथाडी कामगार | ११८-१२९ |
| १३ | मराठवाड्यातील तेलबिया पिकांची संपादणुक | १३०-१३९ |
| १४ | आठवडा बाजार - ग्रामीण व्यापाराचे केंद्र | १४०-१४८ |
| १५ | सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेचे मूल्यमापन | १४९-१६१ |
| १६ | महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतींचे योगदान | १६४-१७३ |
| १७ | महाराष्ट्राच्या औद्योगिक संरचनेतील संक्रमण | १७४-१८५ |
| १८ | जागतिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | १८६-१९२ |
| १९ | बुलढाणा जिल्ह्यातील विविध योजनांचे विश्लेषण | १९३-१९७ |
| २० | अर्थ शब्दांची वाट पाहे | २०५-२०७ |
| २१ | स्थलांतरीत श्रमिकांचे आर्थिक अध्ययन | २१३-२२२ |
| २२ | आदिवासी विकास: एक दुसरी बाजू | २२३-२२६ |
| २३ | आदिवासी विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका | २२७-२३३ |
| २४ | पेठ तालुक्यातील आदिवासी विकास योजनांचा अभ्यास | २३४-२४१ |
| २५ | आर्थिक वृध्दी व रोजगारातील बदल:एक तौलनिक अभ्यास | २४२-२४८ |
| २६ | पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची कामगिरी | २४९-२५९ |
| २७ | भारतातील जमीन सुधारणा: एक दिशा दर्शन | २६०-२६७ |
| २८ | औष्णिक विद्युत केंद्राचे सामाजिक आर्थिक परिणाम | २६८-२७४ |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीतून श्रमिक कल्याण | २७५-२८२ |
| ३० | ग्राहक हितसंवर्धनार्थ ग्राहक न्यायमंचाची भूमिका | २८३-२९१ |
| ३१ | महाराष्ट्रातील स्त्रियांचे विवाहवय, प्रसुती निर्देशक व साक्षरता | २९२-३०५ |
| ३२ | अर्थ शब्दांची वाट पाहे (वडापावार्थशास्त्र) | ३०६-३०७ |
| ३३ | भारतातील दारिद्र्य: एक ऐतिहासिक दृष्टिकोन | ३३२-३३८ |
| ३४ | मानव संसाधन विकासातील आधुनिक प्रवाह | ३३९-३४३ |
| ३५ | दारिद्र्याचे प्रतिबिंब: चिकित्सा | ३४४-३५० |
| ३६ | अनुदानित विहिरींचे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात योगदान | ३५१-३५८ |
| ३७ | डोंगरी भागातील जनतेला सक्षम सार्व. वितरण व्यवस्थेची गरज | ३७१-३८० |
| ३८ | भारतीय अन्नसुरक्षा: स्वरूप व उपाय | ३८१-३८६ |
| ३९ | अर्थ शब्दांची वाट पाहे: अंतर्प्रवर्तन | ३८७-३८८ |
| | **भाषणे** | |
| १ | आ. गो. पुजारी | ३११-३३१ |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| १ | ठाणे जिल्ह्यातील आदिवासींचा आर्थिक-सामाजिक अभ्यास | १९८-२०४ |
| २ | शासकीय उपयोजनांचा अनुसूचित जमातीवरील आर्थिक-सामाजिक परिणामांचा अभ्यास | ३५९-३६७ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | ज्ञानेश्वरीतील अर्थविचार | ३६८-३७० |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | अर्थतज्ज्ञ डॉ.सुरेश तेंडुलकर: एक दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व | ४-८ |
| २ | डॉ. सु. गो. भानुशाली: एक व्यासंगी अर्थतज्ज्ञ | १६२-१६३ |
| ३ | अर्थतज्ज्ञ डॉ.श्री.आ.देशपांडे-एक कृतार्थ जीवन | २११-२१२ |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **३५ व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| १ | प्रा.जगदीश भगवती यांचे अर्थशास्त्रातील योगदान | ३८९-३९१ |
| २ | ग्रामीण महाराष्ट्रातील आधारभुत संरचना | ३९२-३९३ |
| ३ | भारताची महासत्ता बनण्याकडील वाटचाल | ३९४-३९५ |
| ४ | पस्तिसावे वार्षिक अधिवेशन | ३९६-४०० |
| ५ | अर्थसंवाद वार्षिक अहवाल | ४०१-४०४ |
| | **३६ व्या अधिवेशनातील विषयांची रूपरेषा** | |
| १ | जोसेफ स्टिग्लीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान | ४०५-४०६ |
| २ | भारतातील भाववाढीची चिकित्सा | ४०७-४०८ |
| ३ | महाराष्ट्रातील जलधोरण | ४०९-४१० |

# अर्थसंवाद (खंड ३५, २०११-१२)

## (अ) लेखक सूची:


| अ.क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | गजानन भाकरे, व्ही.एम्.चव्हाण, कोल्हापूर | १-१८ |
| २ | सुषमा देशमुख, अमरावती | १९-२४ |
| ३ | भागचंद शंकरराव खुरूद, राहुरी संदिप बाबुराव अभंग, अमरावती | २५-३८ |
| ४ | महेश मोहनीराज बडवे, जळगाव | ३९-४९ |
| ५ | सुरेश ढाके, अशोक खाचणे, जळगाव | ५०-५९ |
| ६ | धर्मा रानबा धेडे, कोल्हापूर | ६०-७० |
| ७ | योगेश अ. पाटील, परभणी | ७१-७६ |
| ८ | करमसींग राजपूत, यवतमाळ | ७७-८४ |
| ९ | संतोष कदम व बी.एम्.भांजे, सोलापूर | ८५-९९ |
| १० | शि. ना. माने, सातारा | १००-१०३ |
| | | २०५-२०७ |
| ११ | नंदकुमार विश्वनाथ मेटे, यवतमाळ | १०७-११७ |
| १२ | शेंडगे दत्तात्रय भगवानराव, सातारा | ११८-१२९ |
| १३ | बी.के.शिंदे, एम.एस.साबळे, परभणी | १३०-१३९ |
| १४ | सुनिता एस. राठोड, कोल्हापूर | १४०-१४८ |
| १५ | जितेंद्र दगडू तलवारे, धुळे | १४९-१६१ |
| १६ | जे. एस. पाटील, कराड; बी. जे. कदम, कापशी | १६४-१७३ |
| १७ | डी.सी.तळुले, एम.एच.शिंदे, अहमदनगर | १७४-१८५ |
| १८ | मुरलीधर पंडीत गायकवाड, मुरुड जंजिरा | १८६-१९२ |
| १९ | जे. डी. सांगोडे, अमरावती | १९३-१९७ |
| २० | संजय तळतकर, बीड; रामकृष्ण सोळुंके, औरंगाबाद | २१३-२२२ |
| २१ | मारोती तेगमपुरे, जालना | २२३-२२६ |
| २२ | एस. के. पगार, नाशिक | २२७-२३३ |
| २३ | डी. आर. बच्छाव, नाशिक | २३४-२४१ |
| २४ | डी. जी. धट, कुरुंदवाड | २४२-२४८ |
| २५ | सुभाष पाटील, पुणे | २४९-२५९ |
| २६ | राहूल शं. म्होपरे, कोल्हापूर | २६०-२६७ |
| २७ | श्रीराम दे. जोशी, जळगाव; विनोद झा. मोरे, यावल | २६८-२७४ |
| २८ | एस.एस.नाईक, अमरावती | २७५-२८२ |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | मुलाणी एम. यू., बारामती | २८३-२९१ |
| ३० | दीपक एम. भारती, बीड; विजय एन.भोपाळे, परभणी | २९२-३०५ |
| ३१ | ज.फा.पाटील, कोल्हापूर | ३०६-३०७ |
| ३२ | रावसाहेब जाधव, गुहागर | ३३२-३३८ |
| ३३ | शरच्चंद्र छापेकर, जळगाव | ३३९-३४३ |
| ३४ | तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर | ३४४-३५० |
| ३५ | नितिन वना जाधव, अमळनेर, राजेंद्र सरोदे, भुसावळ | ३५१-३५८ |
| ३६ | खोत मल्लू राजाराम, कोल्हापूर | ३७१-३८० |
| ३७ | एम. बी. अनंतकवळस, सातारा | ३८१-३८६ |
| ३८ | ज.फा.पाटील, कोल्हापूर | ३८७-३८८ |
| | **भाषणे** | |
| १ | आ. गो. पुजारी, सांगोला | ३११-३३१ |
| | **पीएच.डी. प्रबंधाचा सारांश** | |
| १ | जयंवत शंकरराव इंगळे, सातारा | १९८-२०४ |
| २ | चव्हाण सिमा रविंद्र, श्रीरामपूर | ३५९-३६७ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | मंजुषा मुसमाडे, पुणे | ३६८-३७० |
| | **श्रध्दांजलीपर लेख** | |
| १ | संजय तुपे, नाशिक | ४-८ |
| २ | बी. आर्. जोशी, पुणे | १६२-१६३ |
| ३ | दि. व्यं. जहागिरदार, अमरावती | २११-२१२ |
| | **३५ व्या अधिवेशनाचा वृत्तांत** | |
| १ | कैलास पाटील, परभणी | ३८९-३९१ |
| २ | बाळासाहेब माने, इस्लमापूर | ३९२-३९३ |
| ३ | सुहास आव्हाड, संगमनेर | ३९४-३९५ |
| ४ | अनिल सूर्यवंशी | ३९६-४०० |
| ५ | अविनाश निकम | ४०१-४०४ |

| अ.क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **३६ व्या अधिवेशनातील विषयांची रूपरेषा** | |
| १ | आप्पासाहेब पुजारी, सांगोला | ४०५-४०६ |
| २ | शर्मिष्ठा सातव/मतकर, पुणे | ४०७-४०८ |
| ३ | दी. मा. मोरे, पुणे | ४०९-४१० |
| | **अंकांचा तपशील** | |
| १ | एप्रिल-जून २०११ | १०४ |
| २ | जुलै-सप्टेंबर २०११ | १०४ |
| ३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०११ | १०० |
| ४ | जानेवारी-मार्च २०१२ | ११४ |



हे त्रैमासिक अनिल सूर्यवंशी यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## अर्थसंवादसाठी अनुदान

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांचेकडून २०११-१२ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.७०,०००/- चे अनुदान प्राप्त झालेले आहे त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी ऋणी आहे.

- अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## निवेदन
## डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्टपूर्वी कार्यवाह, म.अ.प., बार्शी यांच्याकडे पाठवावेत. २०१२ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- अनिल सूर्यवंशी, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## 'अर्थसंवाद' (जुलै-सप्टेंबर २०१२)अंकासाठी
## त्वरित लेख पाठवा !
### फक्त एवढच करा...

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. कागदाचा आकार 7 X 9.5 इंच घेऊन टॉप, लेफ्ट व राईट मार्जीन 0.8 व बॉटम मार्जीन 1.0 इंच याप्रमाणे सोडाव्यात. टेबलची संख्या दोन पेक्षा जास्त नसावी. लेखातील टेबल्स सामान्यपणे अर्धा ते पाऊण कागद आकारापेक्षा मोठे नकोत.

- MS-Word **मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.** PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा.

- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरीत पाठवावी.

- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, मोबाईल क्रमांक लिहावा.

- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.

- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा.

- लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## छत्तीसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे छत्तीसावे वार्षिक अधिवेशन भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, जि.जळगाव येथे २२, २३ व २४ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. परभणी येथील डॉ.कैलास पाटील हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनाच्या स्थानिक कार्याध्यक्षा प्राचार्या डॉ. मिनाक्षी वायकोळे, स्थानिक कार्यवाह प्रा. व्ही.डी.पाटील (भ्रमणध्वनी: ९९२२२५१८९७) हे आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

*१) जोसेफ स्टिगलीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान*

*२) भारतातील भाववाढीची चिकित्सा*

*३) महाराष्ट्रातील जलधोरण*

वरील विषयांचे टिपण सूत्रसंचालकांनी ***अर्थसंवाद*** च्या या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

निबंध लेखकांनी जास्तीत जास्त २००० शब्दात विषय मांडावयाचा असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. निबंध **Shree-Dev7-2336** या फॉन्टमध्ये **PageMaker 6.5** या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ **14** असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रसिध्द केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

प्रत्येक निबंधलेखकाचा केवळ एकच निबंध (स्वतंत्र वा संयुक्तपणे लिहिलेला) अधिवेशनासाठी स्वीकारला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. दि.३१ ऑगस्ट २०१२ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**कैलास काशिनाथ पाटील,**
सप्तशृंगी, पार्वती मंगल कार्यालयासमोर, त्रीमुर्ती नगर,
परभणी-४३१४०१. भ्रमणध्वनी : ९४२३१०२८६३.

- अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

## छत्तीसावे वार्षिक अधिवेशन

# निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करु नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये कारण ते सर्वांना माहित असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय / प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक - सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या *'अर्थशास्त्र परिभाषा कोश'* आणि *'शासन व्यवहार कोश'* यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करुन वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरीत नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दात गोषवारा द्यावा.

## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकांच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

**मराठी अर्थशास्त्र परिषद आणि**
**जयहिंद शैक्षणिक संस्थेचे झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे**
**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**❋ धुळे व्याख्यानमाला ❋**
**दिनांक - २२/०७/२०१२**

**❋ व्याख्यानाचा विषय ❋**
**महाराष्ट्रातील कृषी विकासात खान्देशचे योगदान**

**प्रमुख वक्ते : डॉ. श्रीराम जोशी** (एम.जे.कॉलेज, जळगांव)
**प्रमुख अतिथी : ॲड. आय.जी.पाटील** (चेअरमन, जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट, धुळे)
**अध्यक्ष : डॉ. कैलास पाटील** (अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद)

**स्थळ: महाविद्यालयाचे सभागृह वेळ: सकाळी १० वाजता**
**आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.**

डॉ. कैलास पाटील
(अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद)
❋
**डॉ. अनिल सूर्यवंशी**
(कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद)
❋
**प्राचार्य डॉ. पी.एच. पवार**
(झेड. बी.पाटील महाविद्यालय, धुळे)

**प्रा. चारूदत्त गोखले**
(कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद)
❋
**डॉ. अविनाश निकम**
(प्रमुख संपादक- अर्थसंवाद)
❋
**प्रा. ए.वाय.बच्छाव**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)

# मराठी अर्थशास्त्र परिषद
# छत्तीसावे वार्षिक अधिवेशन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे छत्तीसावे वार्षिक अधिवेशन भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओं.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, जि.जळगाव येथे २२, २३ व २४ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविण्यात येईल. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.८००/- आहे. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) जोसेफ स्टिगलीश यांचे अर्थशास्त्रातील योगदान

२) भारतातील भाववाढीची चिकित्सा

३) महाराष्ट्रातील जलधोरण

वरील विषयांचे टिपण सूत्रसंचालकांनी अर्थसंवाद च्या या अंकामध्ये दिले असून आजीव सदस्यांना शोधनिबंध पाठविण्यास विनंती आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

| | |
|---|---|
| **डॉ. कैलास पाटील**<br>अध्यक्ष | **प्रा. चारुदत्त गोखले**<br>कार्याध्यक्ष |
| **प्राचार्या डॉ. मिनाक्षी वायकोळे,**<br>स्थानिक कार्याध्यक्षा | **अनिल सूर्यवंशी**<br>कार्यवाह-खजिनदार |
| **प्रा. व्ही. डी. पाटील**<br>स्थानिक कार्यवाह | **डॉ.अविनाश निकम**<br>संपादक, अर्थसंवाद |